म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १५१८
IRBK-0101518
IRBK-0101518

# छाया आणि पडछाया

[ विनोदी आणि भावकथांचा संयुक्त संग्रह. ]

९५१
७२१
IRBK-0101518

## द. वि. गुप्ते

प्रस्तावना लेखक

प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे, बी. ए., एम्. एस्. सी.

किंमत १ रुपया

मुद्रक :—
श्री. वि. ग. शेंबेकर,
सद्भक्ति-प्रकाश प्रिंटिंग प्रेस,
३७३, हॉर्नबी रोड, कोट, मुंबई.

ह्या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, व इतर सर्व प्रकारचे हक्क लेखकाकडे आहेत.

प्र थ मा वृ त्ति.
१८ आगस्ट १९३८

प्रकाशिका :—
सौ. कलावती गुप्ते,
रंगाऱ्याची चाळ, खडा माटुंगा,
मुंबई. १९

तीर्थरूप कैलासवासी

# आई व आण्णा

यांच्या

## पवित्र स्मृति-समाधीवर—

# कथानुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | १२ नंबरची खोली ! ... ... ... | १ |
| २ | सौभाग्याचा कलंक ! ... ... ... | ७ |
| ३ | अनोळखी अध्यक्ष ! ... ... ... | २३ |
| ४ | जीवनाधार ! ... ... ... | २७ |
| ५ | भयंकर भोपळ्या रोग ! ... ... ... | ३९ |
| ६ | बाहुलीचें लग्न ! ... ... ... | ४७ |
| ७ | फोनोवर फिर्याद ! ... ... ... | ५२ |
| ८ | निराशेंतील समाधान ! ... ... ... | ५८ |
| ९ | राजाभाऊंचा राजिनामा ! ... ... ... | ६३ |
| १० | मावळती तारा ! ... ... ... | ७० |
| ११ | नानांची निळी ट्रंक ! ... ... ... | ८५ |
| १२ | तुटलेला चित्रपट ! ... ... ... | ९१ |
| १३ | आजींचें औषध ! ... ... ... | १०० |

# श्री. द. वि. गुप्ते यांचीं लवकरच प्रसिद्ध होणारीं नवीन पुस्तकें

पुराण पुरुषांच्या अडचणी

[ सचित्र विनोदी लेखमाला ]

जीवन सरिता

[ कवन संग्रह ]

बुडबुडे

[ लघु निबंध व विनोदी लेख ]

कुन्दकळ्या

[ विनोदी कवितांचा संग्रह ]

कल्पलतेचें कुंज

[ विनोदी व भावकथांचा दुसरा संग्रह ]

---

# छायेवर प्रकाश ?

हा कदाचित् एकच अपवाद असेल. पण या वेळीं प्रस्तावना-लेखकाची भूमिका केवळ लेखकाची ओळख करून देण्याची किंवा दोषस्थळें दाखविण्याचें काम टीकाकारांवर सोंपवून विनय व निःपक्षपातीपणा दाखवीत भरपूर स्तुति करण्याची नाहीं. माझी भूमिका कथासंग्रहाच्या पहिल्या फुकट्या वाचकाची ! टंक जुळविणाऱ्या जुळाऱ्यांनीं एक एक अक्षर लावून कष्टांनीं गोष्टी वाचल्या. मुद्रितें तपासणारानीं डोळ्यांत तेल घालून वाक्यांतील रस व अर्थ, मनावरील परिणाम, वाङ्मयीन योग्यता, यांकडे लक्ष न देतां 'तशास तसें' तपासलें. बांधणी करणारानीं फर्मे उलट सुलट व पृष्ठें मागें पुढें लागलीं नाहींत एवढी काळजी घेतांना व या पुस्तकांत दुसऱ्या पुस्तकांचे फर्मे येणार नाहींत एवढी दक्षता घेतांना जे काय दोन चार शब्द नजरेखालून घातले असतील व गोष्टींचा धागा उलगडला असेल तेवढेंच वाचन केलें असेल. पण या सर्वांचें वाचन 'अर्था' साठीं. वाचनासाठीं पंदरमोड न करतां पदरीं दोन पैसे बांधण्यासाठीं त्यांचें वाचन. पण पदरास खार लावून न घेतां सच्च्या वाचकांनीं वाचावयाच्या अगोदर, फिरत्या किंवा मोफत वाचनालयाच्या वर्गणीदारांनीं किंवा पुस्तकें धुंडाळण्याच्या मिषानें फूटपाथवरच्या ढिगाऱ्यांतील पुस्तकांतील सबंध गोष्ट वाचणाऱ्या चलाख वाचकांनीं चाळण्याच्या अगोदर, वाचणाऱ्या फुकट्या वाचकाची माझी भूमिका. अशा वाचकाचें, पुस्तक वाचतांना उत्पन्न झालेलें विचारचक्र म्हणजेच ही प्रस्तावना !

कथासंग्रहांत तेरा गोष्टी असून त्यांतील सर्व गोष्टी प्रकाशित असून सात विविधवृत्त साप्ताहिकांत येऊन गेलेल्या दिसल्या.

दैनिकांतील गोष्टींवर मी वरवरही नजर टाकण्याचें टाळतों; पण विविधवृत्तांतील गोष्टींवर रविवारचे चहाचे तीन कप संपेपर्यंत माझी नजर

खिळून रहाते, ही गोष्ट मी कबूल करतों. गोष्टी वाचण्याची मनाची तयारी करण्यासाठीं एकदां प्रसिद्धीचे सन पाहिले. शेवटची अगदीं नुकतीच फाल्गुनाच्या अखेरीस प्रसिद्ध झालेली! तर पांच गेल्या वर्षींच प्रसिद्ध झालेल्या! पुस्तक आणि डोळे मिटून मी विचार करीत बसलों. प्रकाशित झालेल्या गोष्टींचा संग्रह लेखक केव्हां प्रसिद्ध करतो? कां करतो? दाता भेटला किंवा बुद्धीत खर्च करण्याची हुक्की आली म्हणजे. पुष्कळसें लेखन प्रसिद्ध होऊन वृत्तपत्रांच्या किंवा सचित्र मासिकांच्या रद्दींत तें 'नामशेष' राहण्याचाहि संभव नाहीं असा भीतीचा गोळा पोटांत उभा राहिला म्हणजे. गोष्टी बऱ्यापैकीं आहेत अशी मित्रांची ग्वाही व शत्रूंची निमूट कबूली मिळाली म्हणजे. एकदां ग्रंथ प्रसिद्ध झाला म्हणजेच लेखकाचें एकमेव नांव ग्रंथकारांच्या यादींत एका ओळींत छापलें जातें. दोन चार ओळींचे अभिप्राय किंवा पोंचवजा उल्लेख येतात. इतर ठिकाणीं नाहीं तरी सरकारी दप्तरांत आणि निदान दोन मराठी ग्रंथसंग्रहालयांत त्यांच्या प्रती कपाटांत सुरक्षित राहतात. ब्रिटिश म्यूझियममधील मराठी विभागांत त्याला स्थान मिळालें आहे ही रमणीय कल्पना कोणा लेखकाला निराशेंत किंचित् काल सुख देणार नाहीं?

कथा पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्या ही गोष्ट आवडल्यावर लेखकाच्या नांवाकडे किलकिल्या डोळ्यांनीं नजर फेकली. गुप्ते? गुप्ते या आडनांवाचे किती थोडे लेखक आहेत? एक पुराण-वस्तु संशोधक होते. Bee प्रसिद्ध कवि आहेत. द. वि. गुप्ते! माझें वृत्तपत्री वाचन बेताचें असल्यामुळें हें विचारचक्र कागदावर उतरण्याच्या अगोदर मी माझ्या गुप्त खात्याकडून माहिती मिळविली. या द. वि. गुप्त्यांनीं सात वर्षे एक हस्तलिखित मासिक व चार महिने 'सुधाकर' मासिक संपादित केलें. १९२८ सालापासून म्हणजे एक तब्बल दशक, 'काव्यकुसुमानंद' या नांवाखालीं महाराष्ट्रांतील प्रसिद्ध अशा निदान पंधरा मासिकांतून कविता प्रसिद्ध केल्या असून, विनोदी लेख, लघुकथा, लघुनिबंध, शब्दचित्रें व हास्यकथा निदान

सात आठ नियतकालिकांतून प्रसिद्ध केल्याचें समजलें. इतक्या विविध-प्रकारचें लिखाण गेल्या दहा वर्षांत, अनेक संपादक-महात्म्यांच्या गळीं उतरविणारा लेखक, ग्रंथकार म्हणून पुढें येण्यास धजला ही गोष्ट योग्यच झाली असें वाटतें. समाजांतील लहान मोठ्या व्यक्तींचीं टिपणें लिहिणारा चित्रगुप्त गुप्त रहावा, विनोदाची गुप्ती शस्त्रवैद्याच्या कुशलतेनें चालविणारा गुप्ते गुप्त रहावा ही गोष्ट बरी नव्हती. कथासंग्रह प्रकाशित झाला याबद्दलची शंका दूर झाल्यावर मी कथांचीं शीर्षकें पाहिलीं.

वा ! मोठीं चटकदार शीर्षकें आहेत. आजींचें औषध, बारा नंबरची खोली, भयंकर ओपळ्या रोग, मावळती तारा, सौभाग्याचा कलंक ! एक ना दोन ! वाचनाची उत्सुकता वाढून गोष्ट शेवटपर्यंत मनावर पगडा बस-वते कीं नाहीं याचा संशय येऊन मधलीच एक गोष्ट ‘ बाहुलींचें लग्न ’ वाचली. शाबास ! अशाच सगळ्या गोष्टी असतील तर ! गोष्ट शोकपर्य-वसायी नाहीं तर सर्वच परिस्थिति शोककारक आढळली. पुन्हा एकदां संग्रह चाळतां उर्दू नाटकांतील प्रवेशांप्रमाणें हास्यरस व शोकरस ‘ अहोरात्रा ’ प्रमाणें धावतांना दिसले. वास्तविक या रचनेंचें कांहीं प्रयोजन नव्हतें. कारण असलें पुस्तक एका बैठकीस संपवावयाचें नसतेंच मुळीं. फावल्या वेळीं पुन्हां पुन्हां पुरवून वाचण्यासाठीं हे कथासंग्रह. अनोळखी अध्यक्ष हा एक लांबविलेला चुटका वाटला. प्रसंग मार्मिक तसाच कित्येकदां सत्य सृष्टींत लेखकानें पाहिलेलाही असेल. सात गोष्टी विनोदी तर आठ शोकरसाच्या दिसल्या. पुन्हा एक संशय आला. विनोदी गोष्टी उत्कृष्ट आहेत. पण त्यांत लेखकाचें डोकें किती ? उसनवारी किती ? मध्यवर्ती कल्पना, प्रमुख प्रसंग, व्यक्तींचें स्वभावचित्रण, कांहीं प्रमुख विनोदकारक कल्पना व शब्द-प्रयोग परभाषेंतील नामांकित लेखकांचे घेऊन त्यांत थोडी पदरची भर घालून, स्वसमाजास रुचणारे फेरफार करून लिहिलेल्या तर या गोष्टी नव्हत ? एका अमेरिकन गोष्टीचें मी केलेलें रूपांतर पाहून एक

मित्र हेटाळणीनें म्हणाला ' अरे हा तर तूं एका प्रसिद्ध विनोदी लेखकाच्या मराठी अस्सल गोष्टीचा तर्जुमाच केलास ! ' माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. मी ती गोष्ट वाचली. वाचकांना अप्रतिम वाटेल अशी ती गोष्ट होती. पहिल्या प्रतीच्या इंग्रजी लेखकाच्या उत्कृष्ट गोष्टीचें, खंद्या मराठी लेखकानें केलेलें बेमालुम रूपांतर तें ! उगीच नाहीं आम्ही त्या मराठी लेखकाला पट्टीचा विनोदी लेखक म्हणत तें !

मी तातडीचें बोलावणें गुप्त्यांना पाठविलें. त्यांनीं प्रस्तुत कथा स्वतःच्या अनुभवाच्या, निरीक्षणाच्या किंवा कल्पनेच्या अशी ग्वाही दिली. माझा जीव भांड्यांत पडला.

वास्तविक वाचकाला काय ! त्याला उत्कृष्ट असेल तेंच पाहिजे. मनाची करमणूक झाली, कांहीं तरी नवीन कळलें कीं झालें त्याचें समाधान ! परभाषेंतील, परसमाजांतील कल्पना व दृश्यें रूपांतर–भाषांतराशिवाय त्याला कोठून मिळणार ? हे वाद टीकाकारांचे ! लेखकाचें मौलिक स्थान ठरवितांना त्याचा उपयोग या दृष्टीनें पाहतां वर उल्लेखिलेल्या गोष्टींशीं या संग्रहाची तुलना करताना कथा एक वेळ दुय्यम दर्जाच्या वाटल्या तरी लेखकाचें वाङ्मयांतील स्थान मला तरी वरच्या दर्जाचें खास वाटलें !

मनाचा धडा करून गोष्टी तर दोन रात्रीं जागून वाचून काढल्या. शोककथांतील एकजात सर्व गोष्टी विवाहाच्या कां ? आणि त्यांतले नायक एकजात निष्क्रिय कां ? असा प्रश्न उभा राहिला. लेखकांची व वाचकांची हल्लींची मनःस्थितीच अशी आहे, समाजाची हल्लींची घडणच अशी असली पाहिजे, याशिवाय कांहीं दुसरें कारण सांपडलें नाहीं. न जाणों दुसऱ्याही उत्तम निराळ्या प्रकारचा शोककथा या वाङ्मय-जादूगाराच्या पोतडींत असतील आणि कालावकाशाप्रमाणें प्रसिद्धही होतील. यांनीं लिहिलेल्या विनोदी

व नर्मक (satiric) 'पुराणपुरुषांच्या अडचणी' अशाक बाजूस राहिल्या, नाहींत काय ? गोष्टींत मराठी, इंग्रजी काव्याचें सूचक चिथाणेंही जागोजाग विखुरलेलें दिसलें. शहर व कोंकण, तरुण तरुणी, टकले वृद्ध, आजी, कारकून, डॉक्टर, नर्स, लेखक, कवी, पोलिस, मोटार, आगगाडी, बाहुली, फोनो असले मासलेवाईक जिन्नस या पोतडींतून बाहेर पडले आहेत.

या कथासंग्रहांत टीकाकारांना दोषस्थळें आढळतील पण रसिकांना रसपरिपोषक प्रसंग, कल्पना व वाक्यें मनमुराद मिळतील यांत शंका नाहीं. टीकाकारांचें श्रेय हिरावण्याची माझी इच्छा नाहीं व वाचकांना स्वयंभू–सेकंडह्यांड नव्हे–रसास्वाद उपभोगण्याची संधी देण्याची माझी इच्छा आहे. प्रसिद्ध पुस्तक म्हणजे बाजारांतला माल. वाटेल तसा चिरडावा किंवा लाथाडावा, नाकें मुरडावीं किंवा आवडीनें घेऊन आनंद लुटावा. या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड मी कां यावें ! स्वतः वाचक या नात्यानें मला अत्यंत रमणीय स्थळें आढळलीं तर त्यांचा उल्लेख करून मी प्रस्तावनेची जाहिरात कां बनवावी ! उलट फुकट वाचावयास मिळालें याचे उपकार न स्मरतां मी कृतघ्नपणें असें म्हणेन, "कीं एके ठिकाणीं प्रचारांतील 'शिंक्याचें तुटलें व बोक्याचें पटलें' या म्हणीचें 'शिंक्याचें तुटलें व बोक्यास डसावयाचे' हें रूप कसें झालें ? ज्यूनियर बी. ए. च्या कॉलेजां-तील जुजबी परीक्षेंत नापास झालेला पण चलाख विद्यार्थी त्याच वर्गांत वर्षभर रखडवणारा हा खुनशी प्रिन्सिपॉल कोणत्या एडवर्ड कॉलेजचा ? "सौभाग्याचा कलंक" या गोष्टींतील पहिल्या ओळींतील 'दोनच दिवसांपूर्वी' याबद्दल 'कालच' हा शब्द घालून कालतंत्र बिनचूक राखण्याची दक्षता लेखकानें कां घेतली नाहीं ? पहिल्या गोष्टींतील दुसरा परिच्छेद चाणाक्ष वाचकांना शेवटाची अंधुक कल्पना देऊन विरस करतो हें तंत्र कुशल लेखकाकडून कसें चुकलें !" प्रण असें उघड मी म्हणत नाहीं असें खुशाल

मात्री टीकाकारांनीं समजून हे दोष वाटल्यास ठळक प्रकाशांत आणावे. टीकाकाराच्या प्रच्छन्न ग्रहणाच्या (Penumbra) अंधुक दुय्यम छायें-तील हें मनोगत आहे.

छाया ? आतां लक्षांत आलें कीं जें कांहींतरी नवीन व चमत्कारिक गूढ या पुस्तकासंबंधीं वाटलें तें पुस्तकाचें नांव. 'छाया आणि पडछाया'. काय या नांवाचा गर्भितार्थ ? नांव एक व चित्रपट निराळा, नांव एक व हातीं वाळा असा प्रकार लेखकानें खास केला नसेल. पुस्तकाच्या अंतरंगासंबंधीं विचार संपल्यावर चक्र बाहेरच्या कक्षेंत वेगानें फिरूं लागलें.

छाया ! पडछाया ! इसापाच्या हावऱ्या कुत्र्याची ही पडछाया खास नव्हे. छाया–सावली. व्यक्तीमागें लागलेली, प्रकाशाच्या प्रखरतेप्रमाणें स्पष्टा-स्पष्ट होणारी, लहान मोठी होणारी सावली, मूळ वस्तूचें यथार्थ ज्ञान कसें करून देणार ? मलपृष्ठावरील चित्रांतील तरंगित जलपृष्ठावर पडलेलें कंपित चित्र–पडछाया–तरुणीच्या देहसौष्टवाची सुद्धां नाहीं तर तरल मनोभाव-नांची कशी कल्पना आणून देणार ? आपल्या गोष्टींचें दुर्बलत्व दाखविणारें, प्रतिभाप्रकाशानें मूळ वस्तू दाखविल्या असूनही त्या काळ्या छाया आहेत असें दाखविणारें नांव देण्यांत ग्रंथकारानें कोणतें औचित्य दाखविलें ? दुसऱ्या एकाद्यानें (Miniatures) लघुचित्रें, Cameo, Photo, Sketches, पेंटिंग, बोलपट, असें कांहीं तरी नांव देऊन हुबेहुब व्यक्तींचें दर्शन मी करवतों असा दिमाख मिरविला असता मग ही गूढ विनयी वृत्ती कशी आली ? वास्तविक पाहतां, प्रतिबिंबांतही डावें उजवें होतें, चित्रांत नैसर्गिक रंग दाखविणें अशक्यच होतें. मूर्तींत नाजूकपणा नष्ट होतो; जीवन गतिमान् असल्यामुळें चित्रांत गती कुंठते तर बोलपटांत कृत्रिमता येते. नक्कल ही मूळ अस्सलासारखी कशी होणार ? कोणतेंहीं नांव दिलें तरी गोष्टीचा अंतरात्मा त्यावरून पूर्णपणें कसा समजणार ?

लेखकाच्या वृत्तीचें मूळ शोधावयास फार दूर जावयास नको. शेक्सपीयर म्हणतो, "छायेप्रमाणें आम्हीं येतों व जगांतून प्रयाण करतों" 'Come like shadows, so depart.' शलें म्हणतो, 'आमचीं वैभवें या केवळ सावल्या, खऱ्या वस्तू नव्हत' 'The glories of our blood and state are shadows, not substantial things.' बर्कसारखा राजकारणी पुरुषही उद्वेगानें म्हणतो, 'आम्हीं छायाकृति असूनही कसल्या धावत्या छायांमागें धावतों आहोंत!' 'What shadows we are and what shadows we pursue.'

मग जेथें आपणच छाया, तेथें आपली छायाचित्रें, तरंगित किंवा लघु भग्नपृष्ठावरची अंधुक क्षणमात्र प्रतिबिंबित होणारीं दृश्यें, दुर्बल शब्दांत पकडलेलीं, कालोदरांत मग्न होणारीं चित्रें, छाया आणि पडछाया नव्हेत तर काय! छायेच्या छाया त्या!

उमर खय्याम म्हणतो:—

अन् आपण छायाऽऽकृति ज्या येती जाती
आकाशदिव्यामाधि रविज्योति भवताली

[माधव ज्यूलियनकृत अनुवाद]

मग बोलणेंच खुंटलें! आपण छाया, कवि छाया, या छायेचा झोत आपणावर पडून छायारूपी वाङ्मयावर पडलेल्या छाया व पडछाया आणि भावी वाचक व हा फुकटा वाचकही छाया! छाया आणि पडछाया. अगदीं अन्वर्थक नांव!

एकदम वाचकाची, प्रच्छन्न टीकाकाराची व रसिकाची भूमिका लुप्त होऊन (Amateur) 'हौशी' शास्त्रज्ञाची शंका जागृत झाली. या विचार-

चक्राचा प्रकाश या छायेवर व पडछायेवर आपण पाडतों ही केवढी चूक ! छायेवर प्रकाश पाडून ती अंधुक किंबहुना नाहींशी करून लेखकाला पुनश्च अंधारांतच ठेवण्याचें व वाचकांच्या हातीं कोरीं पृष्ठें राहूं देण्याचें महत्पातक आपण करीत आहोंत अशी जाणीव झाली. आपण या छाया पहा, लेख-काला प्रकाशांत राहूं द्या, हें विचारचक्र विसरा अशी वाचकांना विनंति करणार तोंच सुदैवानें झरणींतील शाईच संपली.

ता. १५-८-१९३८,
पुर्णेवाडी, दादर, मुंबई.

श्रीधर बाळकृष्ण रानडे

# आत्मकथन

माझ्या आजवर निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या कांहीं विनोदी आणि निवडक भावकथांचा हा संयुक्त संग्रह **'छाया आणि पडछाया'** या नांवानें रसिकांस सादर करतांना मला एक प्रकारचा अननुभूत आनन्द वाटत आहे.

**'पुराण पुरुषांच्या अडचणी'** ही माझी 'विविधवृत्तां'तून क्रमशः प्रसिद्ध झालेली विनोदी लेखमाला पुस्तकरूपानें रसिकांस सादर करण्याचें जाहीर होऊनहि कांहीं अपरिहार्य कारणांमुळें ती तूर्त बाजूस ठेवावी लागत आहे; त्यामुळें माझ्याप्रमाणें माझ्या अनेक वाचकांचीहि निराशा होणार आहे याची मला जाणीव आहे. तथापि या पुस्तकानंतर लवकरच त्या 'अडचणी' रसिकांच्या हवालीं करण्याचें आश्वासन मी आज देऊं इच्छितों.

प्रस्तुत संग्रहांतील कथांतून रेखाटलेले प्रसंग व व्यक्ति केवळ स्वतंत्र व काल्पनिक असून त्यांत कोणत्याही दिवंगत अगर विद्यमान व्यक्तीचें शब्दचित्र रंगविण्याचा उद्देश नाहीं; तथापि व्यवहारी जगाच्या रहदारींतून नित्यशः आढळांत येणाऱ्या भिन्न भिन्न व्यक्तींच्या स्वभावचित्रांच्या 'छाया आणि पडछाया' त्यांतून कोठें कोठें उमटलेल्या दिसल्यास त्याबद्दल कुणाला विषाद मानण्याचें कारण नाहीं.

पुस्तक प्रकाशनाच्या कामीं मला अनेक प्रेमळ मित्रांचें साहाय्य झालें आहे. विशेषतः माझे नागपूरचे वकील मित्र श्री. **माधवराव गणेश देशमुख** व श्री. **सदाशिवराव श्रीकृष्ण चिटणीस** यांच्या हार्दिक सहानुभूतिमुळेंच मला माझी ही अल्पकृति रसिकांपुढें ठेवण्याचें भाग्य लाधलें आहे.

'विविधवृत्ता' चे सहकारी व माझे जिवलग मित्र श्री. **चन्द्रकान्त विष्णु बावडेकर** यांचें प्रेमळ प्रोत्साहन, 'बहर' कर्ते माझे स्नेही श्री. **वसन्त**

वैद्य यांची संग्रहाच्या प्रकाशनाबद्दलची कळकळीची निकड, कवि दत्त-प्रसन्न कारखानीस, वा. रा. टिपणीस, रा. का. जोशी (रुईकर), **अनन्त दामोदर कर्णिक** आदिकरून सुहृदांचें सौहार्द या सर्वांचें दृश्य फळ म्हणजेच '**छाया आणि पडछाया**' होत असें म्हणणें वावगें होणार नाहीं.

अन्धेरीच्या इस्माइल कॉलेजचे रसज्ञ प्राध्यापक **श्रीधर बाळ-कृष्ण रानडे**, यांचा माझा केवळ नांवापुरताच परिचय असतांहि त्यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन "छायेवर प्रकाश" पाडण्याचें काम अगदीं अल्पावधींत व अत्यंत अभिनव आणि मार्मिकपणें करून मला उपकृत केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

मुंबईचे सुप्रसिद्ध तरुण चित्रकार आणि माझे जुने स्नेही श्री. **विना-यक बाळकृष्ण पाठारे** यांनीं पुस्तकाच्या वेष्टणावरील अत्यंत कलापूर्ण मोहक चित्र काढून देऊन मला ऋणी केलें आहे.

'सद्भक्ति-प्रकाश' मुद्रणालयाचे सुविद्य व्यवस्थापक श्री. **वि. ग. शेंबेकर** यांनीं छपाईचें काम अगदीं अल्पावधींत व मनपसन्त करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

माझ्या या प्रथम कृतीचें महाराष्ट्रीय रसिकवृन्दाकडून योग्य स्वागत होईल अशी मला अपेक्षा असून ती पूर्ण झाल्यास माझ्या पुढील कृति त्यांस लवकरच सादर करण्यास मला उत्तेजन मिळणार आहे हें नव्यानें सांगणें नकोच.

रसिकांचा नम्र,

**द. वि. गुर्से.**

रंगाऱ्याची चाळ, खडा माडंगा,
मुंबई १९
श्रीकृष्ण जन्माष्टमी, शके १८६०.



द. त्रि. गुप्ते

# १

## १२ नंबरची खोली !

पंतांनीं पत्र पूर्ण करून आपल्या टक्कल पडलेल्या डोक्यावरून हात फिरविला व डोळ्यांवरचा चष्मा काढून खालीं ठेवीत काकूंना हांक मारून म्हटलें, "बाबूला पत्र लिहिलंय् बरं कां?"

काकू हातांतील काम तसेंच ठेवून पंतांच्या खोलींत आल्या व म्हणाल्या, "पण त्याचं बिऱ्हाड त्याच ठिकाणीं आहे ना? मुंबईचीं माणसं आणि त्यांचा संसार म्हणजे 'विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर' म्हणतात तशींच!"

पंतांनीं पुनश्च डोळ्यांवर चष्मा चढवून म्हटलें, "अग, पण गेल्या वर्षींच तर जाऊन आलों ना मुंबईला! दादर कुंभारवाड्यांत शामराव शेट्यांची चाळ, दुसरा मजला, खोली नंबर बारा; सारं कांहीं अगदीं तोंडपाठ आहे माझ्या. अगदीं डोळे बांधून जाईन मी बाबूकडे!"

पंतांचें उत्तर ऐकून काकू आंत जाऊं लागल्या. त्यांना थांबवून पंत म्हणाले, "एवढा हा शेवटचा मजकूर तुला वाचून दाखविण्यासाठीं बोलावलं होतं मीं."

पंतांनीं चष्म्याची जरा चाळवाचाळव केली व पत्रांतील शेवटचा पॅरिग्राफ वाचण्यास सुरवात केली.

"बाबू, गेल्या सालीं तुझ्या बिऱ्हाडीं आलों तेव्हां तुझ्या राणीसाहेब माहेरीं गेल्यामुळें त्यांना पाहण्याचा योग आला नाहीं. आतां तर म्हणे तूं एका मुलाचा बाप झाला आहेस! तेव्हां लग्नाचे लाडू व पेढे एकाच बैठकींत वसूल करावयास हरकत नाहीं!

पेढीच्या जरूरीच्या कामामुळं जरी मी स्वतःच मुंबईला येत आहें, तरी मला मुंबईत एकच दिवस राहण्यास सवड सांपडेल. दुसऱ्या दिवशींच्या बोटीनें मला परत फिरलेंच पाहिजे. तेव्हां तुला जो पाहुणचार करावयाचा असेल, तो एकाच दिवसांत आटोपून घे."

पंतांनीं पाकिटावर पत्ता लिहिला व त्याच दिवशीं पंतांचें पत्र रत्नागिरीच्या पोस्टाचा शिक्का खाऊन मुंबईच्या मार्गाला लागलें.

रत्नागिरीला पंतांची अडतीची पेढी आज केक वर्षे मोठ्या भरभराटींत चालली होती. मधून मधून त्यांचें मुंबईत काम निघे; परंतु वृद्धत्वामुळें त्यांना अलीकडे ती दगदग सोसवेनाशी झाल्यामुळें त्यांचे दिवाणजीच मुंबईचीं कामें उरकीत.

पंतांचा 'बाबू' म्हणजे त्यांच्या जिवलग मित्राचा—तात्यासाहेबांचा—मुलगा. त्याच्यावर पंतांचें अपत्यवत् प्रेम असे.

तात्यासाहेबांच्या पश्चात् पंतांनीं बाबूला कोणत्याच गोष्टीची उणीव पडूं दिली नाहीं; तथापि योगायोग असा कीं, पंतांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांना ऐन वेळीं बाबूच्या लग्नाला मात्र हजर राहतां आलें नाहीं. अगर नोकरींत गुंतलेल्या बाबूलाही पत्नीला घेऊन कोंकणचा प्रवास करण्यास सवड झाली नाहीं.

गेल्या वर्षीं पंत पेढीच्या कामासाठीं मुंबईस आल्यावेळीं 'सूनबाई'ला कांहीं अहेर करावा म्हणून मुद्दाम बाबूच्या बिऱ्हाडीं उतरले; परंतु याच वेळीं 'सूनबाई' पुण्याला माहेरीं गेल्यामुळें त्यांचा विरस झाला!

आंब्यांचा मोसम असल्यामुळें पंतांनीं आपल्या मालकीच्या वाडींतील अस्सल हपूसचे आंबे आणवून बाबूसाठीं एक भली मोठी करंडी भरून बरोबर घेतली.

बाबूच्या छोट्या मुलाला काय द्यावयाचें याविषयीं उभयतां पतिपत्नींत बरीच वाटाघाट झाली. तथापि पंत व काकूंत मतभेद उत्पन्न झाल्यामुळें ऐन वेळीं मुंबईतच कांहीं तरी वस्तु घ्यावयाची असें पंतांनीं ठरविलें.

"बाबूराव देशमुख इथंच राहतात ना?"

पंतांनीं खोली नंबर बाराची खात्री करून घेत खोलीच्या तरुण मालकिणीला विचारलें.

"हो इथंच, पण सकाळींच 'हपिसा'च्या कामासाठीं कलकत्त्याला जाणं झालंय्!"

अठरा-एकोणीस वर्षांच्या तरुणीनें कडेवरील आपल्या लहानग्याला सांवरीत उत्तर दिलें.

"अरेरे ऽ थोडक्यांत चुकामूक झाली तर" असें म्हणून पंतांनीं हमालाला सामान आंत ठेवण्यास सुचविलें व दारावरील 'वसंत देशमुख' ही पाटी न्याहाळीत ते स्वतः आंत शिरले.

"माझं पत्र नाहीं मिळालं का बाबूला?" आपल्या आगंतुक आगमनापुळें विस्मयचकित मुद्रेनें उंबरठ्यांत घुटमळणाऱ्या सूनबाईला पंतांनीं विचारलें.

विचार केल्यासारखें दर्शवून सूनबाई म्हणाल्या, "काल कुणाचंसं पाकीट आलं खरं; पण हपिसच्या गडबडींत तें तसेंच खिशांत टाकून बाहेर पडले!"

"चू, चू!" पंत चीत्कारले, "बाबूचा हा धांदरट स्वभाव अजून कायम आहे तर?"

पंतांनीं कपडे उतरून खुंटीवर ठेवले व सूनबाईनें खालीं सोडलेल्या चिमुरड्याला उचलून घेत म्हटलें,

"अगदीं थेट बापाचाच तोंडवळा घेऊन आलाय् गुलाम—काय नांव ठेवलंय् बाबूनं याचं?"

"अरुण" सूनबाई उद्गारल्या व आजोबांशीं कानगोष्टी करणाऱ्या बाळ्याकडे कौतुकानें पाहत त्या चहाच्या तयारीला लागल्या.

पंतांनीं हळूहळू बाबूचे व आपले स्नेहसंबंध किती निकटचे आणि जिव्हाळ्याचे आहेत त्याची सूनबाईंना साद्यंत माहिती करून दिली; आणि पंतांच्या आगमनामुळें उत्पन्न झालेलें संकोचाचें वातावरण लवकरच निवळून सूनबाई पंतांशीं अगदीं घरांव्याच्या अदबीनें बोलूं लागल्या.

सायंकाळीं चार वाजतां पंत पेढीच्या कामासाठीं बाहेर पडले.

पेढीचें काम उरकून साडेसहा वाजतां ज्या वेळीं पंत बाबूच्या बिऱ्हाडीं आले, त्या वेळीं त्यांनीं बाबूच्या मुलासाठीं एक छोटीशी सायकल-वजा मोटरगाडी आणली होती आणि सूनबाईसाठीं सोळा रुपयांचें सुंदर जरीचें लुगडेंही खरेदी केलें होतें.

पंतांच्या औदार्यानें दिपून गेलेल्या सूनबाईनींही पंतांसाठीं रात्रीं बासुंदी-पुरीचा चमचमीत बेत ठेवला होता.

दुसऱ्या दिवशीं सूनबाईंचा निरोप घेऊन बाहेर पडण्यापूर्वीं पंतांनीं बाबूच्या छोट्या मुलाच्या गळ्यांत दीड-दोन तोळ्यांची एक सोन्याची सांखळी अडकवली.

मुंबईचा प्रवास संपवून पंत घरीं येतांच त्यांनीं काकूजवळ सून-बाईच्या गोड स्वभावाचें आणि प्रेमळ सत्काराचें अगदीं रसभरित वर्णन केलें.

दुपारीं वामकुक्षी करून पंत पेढीवर जाण्यासाठीं बाहेर पडणार तोंच एक लाल सायकल त्यांच्या कंपाउंडमध्यें शिरली आणि तारवाल्यानें पंतांच्या हातीं एक पिवळें पाकिट दिलें !

घाईघाईनें चष्मा चढवून पंतांनीं कागदावर सही केली व अधीरपणें तारेचें पाकिट फोडलें. उत्तराचे आगाऊ पैसे भरलेली तार होती ती.

"Miss-addressed letter reached to-day. Anxious why not arrived. Reply.

—Baboo."

(चुकीच्या पत्त्यावर पाठविलेलें पत्र आज पोंचलें. न येण्याचें कारण कळवावें. काळजींत आहें.—बाबू)

---

विविधवृत्त ४ जुलै १९३७.

# २

# सौभाग्याचा कलंक!

'**ना**ताळच्या रजेंत गांवीं येतों' म्हणून दोनच दिवसांपूर्वीं वडिलांस पाठविलेल्या पत्राला पुरवणी पत्र पाठवून आपल्या जाण्याचा बेत तहकूब करावा असा सुधीरनें निश्चय केला; तथापि एकदां आपल्या आगमनाचा दिवसही निश्चित कळविल्यानंतर नकाराचें पत्र पाठवून घरांतील मंडळींची निराशा करणें योग्य होईल काय व सबब तरी कोणती पुढें करावी या विचाराच्या आन्दोलनांत सुधीर कालपासून गिरक्या खात होता.

काल सायंकाळीं आपल्या सामानाची निरवानिरव करीत असतां लेडीज हॉस्टेलच्या मोलकरणीनें त्याला एक लहानसें चिटोरेवजा पत्र आणून दिलें होतें. 'आपला गांवीं जाण्याचा बेत नसल्यास मजबरोबर नगरला याल काय? ज्या किल्ल्यावर इतिहासप्रसिद्ध शूर रमणी चांदबिबी निकरानें लढून पतन पावली त्या पुण्यस्थळाचें दर्शन घेतल्यास आपल्या-

सारख्या लेखकाला त्याचा कोठें तरी उपयोग करून घेतां येईल,' अशा आशयाचा त्रोटक मजकूर पत्रांत होता.

तें पत्र 'इन्टर आर्टस्' मधील सुधीरची नूतन परिचित मैत्रीण मीनाकडून आलेलें होतें. अर्ध्या तासाचीच घडामोड; परंतु त्यामुळें सुधीरला मोठा पेंच पडला! हें पत्र अर्ध्या तासापूर्वीं हातीं आलें असतें तर आपल्या वडिलांच्या पत्रामध्यें आपण अगदीं विरोधी अर्थाचा मजकूर लिहिला असता असें त्यास वाटूं लागलें परंतु आतां बाण सुटला होता!

अलीकडे सुधीर व मीना यांच्या स्नेहाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें प्रेमाचें स्वरूप येऊं पाहत होतें. सुधीरचे कॉलेज मॅगेझिनमधील व इतर नियतकालिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध होणारे लेख मीना कौतुकानें व मनःपूर्वक वाचीत असे. त्याचे उच्च व उदार विचार वाचूनच तिला त्याच्याविषयीं आदर वाटूं लागला; व गतवर्षीच्या कॉलेज संमेलनाच्या प्रसंगीं प्रसंगोपात् त्यांचा प्रत्यक्ष परिचय घडून आला, व हळुहळु स्नेहग्रंथी जुळली.

मीनेच्या सुप्त आशावल्लरीला याच वेळीं अंकुर फुटला.

अलीकडे सुधीर व मीनाची दुकल कॉलेजमध्यें 'रोमिओ–ज्युलिएट' म्हणून प्रसिद्ध पावूं लागली; तथापि सुधीरनें किंवा मीनानें त्याबद्दल विरोध दर्शविला नाहीं किंवा त्यांच्या स्नेहांत सुतराम् बिघाड उत्पन्न झाला नाहीं.

अशा वेळीं मीनेच्या विनंतिवजा इच्छेची पायमल्ली करण्याची कल्पनाहि त्याला दुःसह वाटली!

ती सारी रात्र त्यानें जवळ जवळ अंथरुणावर तळमळून घालविली होती. पहांटे त्याचा कांहींतरी ठाम विचार झाला. एकाद्या सबळ सब-

बींच्या जोरावर आपण ' आपल्या पूर्वींच्या पत्राप्रमाणें गांवीं येऊं शकत नाहीं ' असें वडिलांस कळविण्याचें त्यानें ठरविलें.

—आणि म्हणूनच रविवार असूनहि आज तो सहाला उठला होता.

कॉलेजच्या त्या वसतिगृहांत जिकडे तिकडे निःशब्द शान्तता पसरली होती. नाताळची रजा दोन दिवसांवर येऊन ठेपल्यानें विद्यार्थीवर्गाची निर्घोरपणें साखरझोंप घेण्याची ती वेळ होती.

खिडकीजवळ जाऊन सुधीरनें दूरवर नजर टाकली. माळी वसतिगृहाच्या बागेला पाणी लावीत होता. आकाशांतून मधून मधून 'किल्बिल' शब्द करीत पक्षांचे कळप भ्रमण करीत होते.

सुधीर टेबलाजवळ येऊन बसला. त्यानें मनांतल्या मनांत कांहीं मजकूर योजून वडिलांस पत्र लिहिण्यास सुरुवात केली व पत्रांत खालील आशयाचा मजकूर लिहिला :—

" माझ्या कालच्या पत्राप्रमाणें गांवीं निघण्याचा बेत मुक्रर झाला होता; तथापि ऐन वेळीं प्रोफेसर्सनीं रजेंत कांहीं " एक्स्ट्रा अवर्स " घेण्याचें जाहीर केल्यामुळें आपणां सर्वांची निराशा करून मला येथेंच राहणें भाग पडत आहे. फायद्याकडे नजर देऊन भेटीचा मोह आवरून धरणें भाग आहे. " वगैरे.

पत्र लिहून झाल्यावर सुधीरनें तें वाचून पाहिलें. आपण पूर्वी लिहिलेल्या मजकुराशीं सदर पत्रांतील बनावट मजकूर एवढा बेमालूम

जुळलेला पाहून त्याला स्वतःबद्दल धन्यता वाटली. पत्राची घडी करून त्यानें तें पाकिटांत घातलें व त्यावर पत्ता लिहिण्यासाठीं त्यानें दौतींत टांक बुडविला. तोंच दारावर 'टिक्' 'टिक्' आवाज होऊं लागला.

सुधीरनें घाईघाईनें पत्र टेबलाच्या खणांत टाकलें व दार उघडलें.

दारांत प्रत्यक्ष मीना उभी होती. तिच्या त्या अनपेक्षित व कांहींशा अवेळीं आगमनानें सुधीर आश्चर्यदिङ्मूढ झाला व तिच्याकडे पहातच उभा राहिला.

"झोंपमोड तर झाली नाहीं ना?"

मीनाच्या प्रश्नानें सुधीर भानावर आला. त्यानें स्वतःला सांवरण्याचा प्रयत्न करीत म्हटलें, "छे! झोंपलों नव्हतों मी; या, आंत या की."

मीना आंत आली व सुधीरनें पुढें केलेल्या खुर्चीवर बसली.

"माझें कालचें पत्र मिळालें कां?" तिनें कांहींसें अधीरपणें विचारलें.

"मिळालें—" त्यानें उत्तर दिलें. अधिक कांहीं तरी बोलावयास त्याचे ओठ स्फुरले परंतु त्याचें वाक्य पूर्ण केलें गेलें नाहीं. आपण आपला बेत मीनाची चिठ्ठी आल्यानें कसा रद्द केला; व वाडिलांना बनावट मजकुराचें पत्र कसें लिहिलें त्याचें रसभरित वर्णन करावें असें त्याला वाटलें; परंतु आपल्या असत्याचरणाचा तिला तिरस्कार वाटला तर?

वरील गोंधळलेल्या मनस्थितींत सुधीर असतांच मीनानें विचारलें "मग काय ठरला विचार ?"

"येतों नगरला. तुमच्या सहवासांत चार दिवस मजेंत तरी जातील." असें म्हणून मीनाच्या लज्जेनें बदलणाऱ्या चेहऱ्याकडे तो कौतुकानें पाहूं लागला.

"पण माझ्या पत्रामुळें आपण आपला गांवीं जाण्याचा बेत मोडून तर नाहीं काढला ? नाहींतर घरच्या मंडळीच्या निराशेचें पातक माझ्या शिरावर बसावयाचें." असें म्हणून मीना हसूं लागली.

"छे मुळींच नाहीं" असें म्हणत सुधीरनें अर्धवट उघडा राहिलेला टेबलाचा खण मीनाची नजर चुकवून बंद केला व आंतील पत्राला नजरेआड केलें.

दोन दिवसांनीं नाताळची सुटी पडतांच मीना व सुधीर अहमदनगरला जाण्यासाठीं बाहेर पडलीं.

मीनाचे वडील रिटायर्ड पोलीस अधिकारी असून त्यांचा गांवाबाहेर स्वतःच्या मालकीचा बंगला होता. नौकरीवर असतां त्यांनीं जवळ बरीच पुंजी केली असल्यानें त्यांना मिळणाऱ्या दीडशें रुपये 'पेन्शन'चीही त्यांना विशेष पर्वा वाटत नसे.

मीना ही भाईसाहेबांची एकुलती एक मुलगी. त्यांचें बहुतेक आयुष्य विधुरावस्थेंत गेलें होतें. मीनाची एक आत्या जवळ स्वयंपाकासाठीं राहून मालकीणीप्रमाणें घरांत हुकमत चालवी.

मीनाच्या रजेचे दिवस जवळ येऊं लागले कीं भाईसाहेबांचे डोळे तिच्या वाटेकडे लागून राहत यांत नवल तें काय ? त्यांच्या एकलकोंड्या जीवनांत त्यांना मीनाच्या अल्प सहवासानें विरंगुळा वाटे. त्यांच्या रुक्ष आयुष्यांत ती एकटीच आशेची ज्योत उरली होती.

भाईसाहेबांच्या घरांत नोकरचाकर असून दारीं शिग्रामवजा जुन्या पद्धतीची घोड्याची गाडीहि होती. स्वतःच्या मालकीचें घर व सरकारी कर्जरोख्यांच्या रूपानें बँकेंत पडून राहिलेली दोन तीन लाखांची रकम वगैरे गोष्टी लक्षांत घेतां त्यांचें वैभव एकाद्या सुखवस्तु गृहस्थास शोभणारें होतें यांत शंका नाहीं ! परंतु त्या ऐश्वर्याचें तेज त्यांच्या चेहऱ्यावर झळकल्याचें कधींच कुणी पाहिलें नाहीं. त्यांची चर्या नेहमीं उदासीन, चिन्ताग्रस्त दिसे.

मीना व सुधीर यांच्या सहवासामुळें भाईसाहेबांच्या सदैव दुर्मुखलेल्या मुखावर मधून मधून उमटलेली हास्यरेषा पाहिली कीं मीनाला आपल्या येण्याचें सार्थक झालें असेंच वाटे.

सायंकाळीं भाईसाहेब नित्याप्रमाणें फेरफटका करण्यास बाहेर पडले. सुधीर व मीना भाईसाहेबांबरोबर न जातां घरींच राहिलीं.

दुसरे दिवशीं किल्ला पहावयास जायचें ठरल्यानें मीनाला बरोबर घ्यावयाच्या वस्तूंची जमवाजमव करावयाची होती.

भाईसाहेबांच्या समोर मीना सुधीरबरोबर जरी मनमोकळेपणानें चर्चा करी तरी विशेष जिव्हाळ्याच्या विषयावर भाईसाहेबांच्या समोर वादविवाद करण्यास मीना संकोचत असे.

भाईसाहेब बाहेर पडतांच मीनाला हवें असलेलें स्वातंत्र्य मिळालें. बरोबर व्यावयास तयार करण्याच्या फराळाच्या जिनसांची आत्याबाईंना थोडक्यांत सूचना देऊन मीना दिवाणखान्यांत आली.

सुधीर ' स्ट्रँड ' मासिकाचा अंक चाळीत आराम खुर्चीवर पडला होता.

" मी आल्यानें वाचनांत विशेष अडथळा नाहीं ना येणार ? " मीनानें आंत येऊन मिस्किलपणें हंसत विचारलें.

" छे ! छे ! वेळ जाईना म्हणून बसलों होतों हा अंक चाळीत " सुधीरनें कांहींतरी उत्तर द्यावयाचें म्हणून म्हटलें. वास्तविक मीना गप्पा मारावयास केव्हां येते म्हणून तो मार्गप्रतिक्षाच करीत बसला होता.

" वरेरकरांची ' विधवा कुमारी ' कादंबरी वाचली कां तुम्हीं ? "

मीनाच्या त्या अनपेक्षित प्रश्नानें विस्मयचकित होत्साता सुधीर उद्गारला, " होय ! वाचली आहे तर !–फार सुंदर आहे कथानक ! "

सुधीर थोडा वेळ थांबला. मीनानें यावेळीं आपणास हा प्रश्न कां विचारावा याचा त्याला अन्दाज होईना. तिच्या पाणीदार डोळ्यांकडे टक लावून सुधीरनें भीत भीत विचारलें.

" कां, कशावरून आठवण झाली बरं ? "

मीनाला हा प्रश्न सुधीर विचारणार याची पूर्ण जाणीव होती. तिनें गोंधळून न जातां शान्तपणें म्हटलें, ' कळ्यांचे निश्वास ' या कथासंग्रहा-

कडे वाचकांना संशयित नजरेनें पहावयास लावणारी ती कादंबरी आहे हें मला सांगावयाचें होतें."

"परन्तु 'विधवा कुमारी' आणि 'कळ्यांचे निश्वास' यांची तुलना करणें गैर आहे. 'विधवा कुमारी' चा दर्जा 'कळ्यांच्या निश्वासा'-पेक्षां असंख्य पटींनें वरचा आहे. लेखिका केवळ एक 'स्त्री' आहे या एकाच दृष्टीनें त्या पुस्तकाचा अनाठायीं 'उदो उदो' होत आहे," सुधीर म्हणाला.

जवळची खुर्ची पुढें सरकवून तिच्यावर बसत मीना म्हणाली, "माझं पण अगदीं तेंच मत आहे. शिवाय त्या पुस्तकाच्या लेखिकेविषयीं वाचकांचीं मतें संशयित व्हावयास एक महत्वाची गोष्ट कारणीभूत झाली आहे. त्या लघुकथांतील कित्येक विचार कोणत्याहि स्त्रीच्या लेखणींतून बाहेर न पडणारे आहेत. थोडक्यांत त्यांतील विचारसरणी थेट पुरुषी थाटाची आहे!"

सुधीर हंसत म्हणाला, "कमिटी नेमली तर स्त्रियांच्या वतीनें तुमची साक्ष फार महत्वाची ठरेल. पण तेवढें त्या पुस्तकाचें भाग्य असावयास तें थोडेंच 'प्रतिभा-साधन' आहे?"

"'विधवा कुमारी' कादंबरींतील एक तत्व मला फार आवडलें" मीना म्हणाली.

"अन् तें कोणतें म्हणून विचारल्यावांचून सांगावयाचें नाहीं कीं काय?"

" इश्श ! तसं नव्हे कांहीं—त्या कादंबरींत, कुमारिकांना विवाहापूर्वी जर कुंकू लावण्याचा अधिकार असतो तर विधवांना तो कां नसावा याची मार्मिक चर्चा केली आहे. " मीनानें खुलासा केला.

" खरं आहे तें. माझ्याहि डोक्यांत त्या अन्यायी रूढीचा प्रश्न वारंवार घोळत आहे, " असें म्हणून सुधीरनें हातांतील ' स्ट्रँड ' मासिकाचा अंक टेबलावर टाकला.

—इतक्यांत आत्याबाई आंत आल्या व मीनाला म्हणाल्या, " मीनू चकल्या करावयास तूं हातभार लावशील तर बरं होईल बाई ! "

मीनाला नाइलाजास्तव उठणें भाग पडलें. आत्याच्या मागोमाग जातांना आत्याला ऐकूं न जाईल अशा हलक्या आवाजांत मीना म्हणाली. " ' विधवा कुमारी 'तील त्या तत्वांशीं माझा फार जिव्हाळ्याचा संबंध आहे. सांगेन तुम्हांला पुढें केव्हां तरी ! "

सुधीरला मीनाच्या त्या वाक्याचें कांहींच स्पष्टीकरण होईना. तिच्या त्या संदिग्ध उद्गारांनीं तो पराकाष्ठेचा आश्चर्यचकित मात्र झाला. मीनाला पुनश्च गांठून त्या वाक्याचा अर्थ केव्हां एकदां विचारतों असें त्याला होऊन गेलें.

× × × ×

नाताळची रजा भुर्कन निघून गेली व मीना आणि सुधीर भाईसाहेबांचा निरोप घेऊन कॉलेज वसतिगृहांत पुनश्च दाखल झालीं.

सुधीरनें संकोच न बाळगतां पुन्हां नगरला यावें अशी भाईसाहेबांनीं त्याला आग्रहपूर्वक विनंति केली.

सुधीरनें ' विधवा कुमारी 'तील कुंकवाच्या तत्वांशीं मीनाचा कसा कांय संबंध पोंचतो तें स्पष्टीकरण करण्यासाठीं तिची बरीच मनधरणी केली; परंतु " सांगेन केव्हां तरी; आजच घाई कशाला ? " असें म्हणून ती तो विषय टाळीत असे.

ज्युनिअर बी. ए. ची परीक्षा झाली.

सुधीरनें परीक्षेच्या ऐन वेळीं बराच अभ्यास केला; परंतु मीनाच्या वाढत्या स्नेहाबरोबरच अभ्यासाची आबाळ झाली होती.

अखेर व्हावयाचें तें झालें ! सुधीरला परीक्षेंत अपयश आलें. अपयशाचें कारण सुधीरलाच नव्हे तर कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांनाहि माहीत होतें.

त्याच्या विशेष सलगींतल्या स्नेह्यांनीं त्याची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला व ते त्याचे शत्रू बनले.

अगदीं याच वेळीं मीना ज्युनिअर बी. ए. च्या वर्गांत दाखल झाली.

—आणि अनायासें मीनाचें व सुधीरचें संघटण अधिकच वाढलें.

हळु हळु सहा महिने निघून गेले.

उन्हाळ्याच्या रजेंत गांवीं गेल्यावांचून भागणार नाहीं हें पाहून सुधीरनें वडिलांच्या इच्छेप्रमाणें गांवीं जाण्याचें निश्चित केलें.

मीनाला त्यानें ज्यावेळीं आपला बेत कळविला त्यावेळीं मीनानें त्याला उत्तेजन देण्याच्या हेतूनें म्हटलें, "वारंवार घरच्या माणसांची निराशा करणंहि ठीक नाहीं; म्हणूनच मी आग्रह करीत नाहीं नगरला येण्याचा."

"कां, कंटाळलां कीं काय पाहुण्याला?" सुधीरनें थट्टेच्या स्वरांत म्हटलें.

"पाहुण्याच्या नात्यानें मी आपल्याला कधींच बोलावणार नाहीं." असें म्हणून मीनानें आपला अधर चावला.

त्या रजेंत एकमेकांचा निरोप घेतांना दोघांनाही फार वाईट वाटलें.

सुधीर गांवीं आल्यावर त्याच्यापुढें एक निराळेंच संकट 'दत्त' म्हणून हजर राहिलें.

बी. ए. पर्यंत मज़ल मारलेला मुलगा बी. ए. झाल्यावांचून राहणार नाहीं याबद्दल त्याच्या वडिलांना खात्री होती. आणि त्याच्या शिक्षणा-प्रीत्यर्थ खर्च झालेला पैसा परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वींच वसूल करण्याचा त्यांचा पोक्त विचार होता.

सुधीर घरीं पोंचतांच त्याला वरील परिस्थितीची जाणीव झाली— किंवा ती करून देण्यांत आली म्हणणेंच अधिक शोभेल.

परीक्षा उत्तीर्ण झाल्यावांचून विवाहाचे भानगडींत पडावयाचें नाहीं असा आपला मानस त्यानें उघडपणें बोलून दाखविला; तथापि 'लग्न जमवून ठेवण्यास काय हरकत आहे?' या वडिलांच्या सवालास सुधीरला उत्तर सुचलें नाहीं.

मीना आपल्याशीं लग्न करावयास तयार आहे किंवा कसें तें त्याला अद्याप खात्रीपूर्वक समजलें नव्हतें. किंवा तें समजून घेण्याचा त्यानें प्रयत्नहि केला नव्हता.

विवाहाचें प्रकरण एवढ्या हातघाईवर आल्यावर त्याला आपण मीनाला स्पष्ट विचारलें असतें तर बरें झालें असतें असें वाटूं लागलें.

केवळ वडिलांच्या इच्छेचा अनादर होऊं नये म्हणून सुधीर आज एके ठिकाणीं मुलगी पाहून आला.

मुलगी बरीच सुंदर होती. मॅट्रिकपर्यंत शिकलेलीहि असल्यानें शिक्षणाच्या बाबतींत वैगुण्य काढण्यास जागा नव्हती.

पुढें काय करावें हा त्याच्यापुढें प्रश्न पडला.

वडिलांनीं विलक्षण आग्रह धरला. अखेर सुधीरनें मनाचा हिय्या करून विचारलें, "अमुकच मुलीशीं लग्न व्हावें असा आपण हट्ट धरल्यास आपणाकडून शिक्षणासाठीं मी पैसे घेतले व स्वतःचें मतस्वातंत्र्य गमाऊन बसलों असा अर्थ होत नाहीं का?"

सुधीरच्या त्या प्रश्नावर विशेष वादविवाद न होतां त्याला आपल्या इच्छेप्रमाणें मुलीची निवड करण्यास परवानगी मिळाली; तथापि चालू रजेच्या आंत लग्नाचें निश्चित न झाल्यास सुधीरला वडिलांच्या मताप्रमाणें रुकार देणें भाग पडणार होतें!

× × × ×

" कोण सुधीर ? अन् पत्र न पाठवितां 'सर्प्राइझ व्हिजिट' द्यावयाची लहर आली वाटतं ?" असें म्हणून मीना सुधीरची सूट-केस त्याच्या हातांतून घेऊन एकाद्या अल्लड मुलाप्रमाणें धांवतच आंत गेली.

सुधीर कबूल केल्याप्रमाणें आला म्हणून भाईसाहेबांना अत्यंत आनंद झाला.

दुपारीं जेवणानंतर सुधीरनें एकान्त साधून मीनाला आपण कोणत्या पेंचांत सांपडलों आहों याची जाणीव करून दिली.

सुधीरच्या तोंडून त्याच्या विवाहाच्या वाटाघाटीची हकीकत समजतांच मीनाला आपल्या भोंवतालच्या खुर्च्या, टेबलें फिरताहेत असें वाटूं लागलें !

सुधीरला तिचें मौन सहन न होऊन तो म्हणाला, " मीना या बाबतींत मला तुमचें मत घ्यावयाचें आहे. "

मीना कांहीं वेळ स्तब्ध झाली. शेवटीं मनाचा कांहीं तरी निश्चय करून ती म्हणाली, " तुमची पुनर्विवाह करण्याची तयारी आहे काय ? "

मीना अशा प्रसंगीं आपली थट्टा करीत असलेली पाहून सुधीर कांहींसा चिडक्या स्वरांत म्हणाला, " मीना हा थट्टेचा प्रसंग नव्हे. "

" पण मी थट्टा कोठें करीत आहें ? " मीनानें शांतपणें विचारिलें.

" मीना मी एवढ्या लांबवर आलों तो तुमचें कांहीं तरी निश्चित मत कळावें म्हणून आलों, यापेक्षां अधिक स्पष्ट काय सांगूं ? " असें

म्हणून सुधीर मीनाकडे आशाळभूत नजरेनें पाहूं लागला. त्याच्या नजरेशीं नजर भिडवून व लगेच खालीं पाहून मीना म्हणाली, "तुमचा आशय मी ओळखला. म्हणूनच विचारतें कीं आपली पुनर्विवाह करण्याची तयारी आहे का?"

"कोणती ती पुनर्विवाहेच्छु विधवा?" सुधीरनें विचारिलें.

"मीच!" शान्तपणें मीना उद्गारली.

सुधीर त्या उत्तरानें केवळ हतबुद्धच झाला! मीना थट्टा करीत असेल असें तिच्या आतांपर्यंतच्या वागणुकीवरून त्याला वाटेना!

"विधवा कुमारींतील कुंकवाच्या तत्वाशीं माझा जिव्हाळ्याचा संबंध आहे हें आपणास मी सांगणार होतें तें आठवतें ना? सुधीर माझें तेराव्या वर्षी लग्न झालें परन्तु वर्षाच्या आंतच मी गतभर्तृका झालें. विवाहामुळें सौभाग्याचा केवळ कलंक मला लागला. सुधीर बोला आतां! सौभाग्याचा कलंक लागल्यानें मला विधवा समजून आपण माझा अव्हेर करणार का? सुधीर तुमच्या उच्च विचारांनींच माझें—मन हळु हळु आपल्याकडे आकर्षण झालें."

सुधीरची चर्या पूर्ण पालटली होती. मनांतील कांहीं तरी गूढ विचार दडविण्याच्या हेतूनें तो म्हणाला, "तुमच्या कुंकवानें माझी बरीच फसवणूक केली म्हणावयाची!"

"परन्तु आपली फसवणूक करून मला आपल्याकडून विवाहाचें वचन घ्यावयाचें नव्हतें. आपले सुधारकी विचार पाहूनच माझ्या आशेची

ज्योत प्रज्वलित झाली. ती तशीच राखणें किंवा मालवणें सर्वस्वीं आपल्या हातीं आहे " ! असें म्हणून मीना तेथून झटकन् निघून गेली.

'वडिलांचा विचार घेऊन काय तें कळवितों' असें म्हणून सुधीरनें त्याच रात्रीं नगर सोडलें.

* * * *

तिसऱ्या दिवशीं मीनेच्या हातांत पोस्टमननें एक जाड पाकीट आणून दिलें. मीनानें थरथरत्या हातानें पत्र फोडून वाचावयास सुरवात केली :—

'केवळ स्वज्ञातीय हुषार "कुमारी" म्हणून आपणाकडे माझा ओढा होता. आपण कुंकू लावल्यानें माझी फसवणूक झाली. आपल्या ठायीं अनेक बहुमोल गुण आहेत आणि आपल्या कायमच्या सहवासानें माझें आयुष्य सुखांत गेलें असतें—पण ! आपण विधवा आहां ! आपल्या मताप्रमाणें केवळ आपल्याला 'सौभाग्याचा कलंक' लागला असला तरी आपणास 'गतभर्तृका' म्हणूनच समाज ओळखणार. आपण माझ्या लिखाणांतील सुधारकी मतावर विश्वासण्यांत मोठी चूक केली. एखाद्या मासिकांतील लेखकाचीं सर्वच मतें संपादकाला मान्य असूं शकत नाहींत. तशींच लेखकाचीं सर्वच मतें त्याला स्वतःलाही लागू असणार नाहींत ! अधिक काय लिहूं ? कुंकू लावण्याच्या वरेरकरी तत्त्वानें तुमच्या प्रमाणें माझीहि निराशा केली आहे ! ईश्वर आपणास सुखी ठेवो !'

पत्र वाचून मीनाला सुधीरच्या पाखंडी मतांचा अत्यंत तिटकारा आला ! घरांत जाऊन तिनें पलंगावर धाडकन् अंग टाकलें ! सारें जग काळ्याकुट्ट अंधारांत गडप झाल्याचा तिला भास झाला !

* * * *

सुधीरनें संकोच न बाळगतां पुन्हां नगरला यावें अशी भाईसाहेबांनीं त्याला आग्रहपूर्वक विनंति केली.

सुधीरनें ' विधवा कुमारी 'तील कुंकवाच्या तत्वांशीं मीनाचा कसा काय संबंध पोंचतो तें स्पष्टीकरण करण्यासाठीं तिची वरीच मनधरणी केली; परंतु " सांगेन केव्हां तरी; आजच घाई कशाला ? " असें म्हणून ती तो विषय टाळीत असे.

ज्युनिअर बी. ए. ची परीक्षा झाली.

सुधीरनें परीक्षेच्या ऐन वेळीं बराच अभ्यास केला; परंतु मीनाच्या वाढत्या स्नेहाबरोबरच अभ्यासाची आबाळ झाली होती.

अखेर व्हावयाचें तें झालें ! सुधीरला परीक्षेंत अपयश आलें. अपयशाचें कारण सुधीरलाच नव्हे तर कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांनाहि माहीत होतें.

त्याच्या विशेष सलगींतल्या स्नेह्यांनीं त्याची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला व ते त्याचे शत्रू बनले.

अगदीं याच वेळीं मीना ज्युनिअर बी. ए. च्या वर्गांत दाखल झाली.

—आणि अनायासें मीनाचें व सुधीरचें संघटण अधिकच वाढलें.

हळु हळु सहा महिने निघून गेले.

उन्हाळ्याच्या रजेंत गांवीं गेल्यावांचून भागणार नाहीं हें पाहून सुधीरनें वडिलांच्या इच्छेप्रमाणें गांवीं जाण्याचें निश्चित केलें.

मीनाला त्यानें ज्यावेळीं आपला बेत कळविला त्यावेळीं मीनानें त्याला उत्तेजन देण्याच्या हेतूनें म्हटलें, "वारंवार घरच्या माणसांची निराशा करणंहि ठीक नाहीं; म्हणूनच मी आग्रह करीत नाहीं नगरला येण्याचा."

*"कां, कंटाळलां कीं काय पाहुण्याला?"* सुधीरनें थट्टेच्या स्वरांत म्हटलें.

"पाहुण्याच्या नात्यानें मी आपल्याला कधींच बोलावणार नाहीं." असें म्हणून मीनानें आपला अधर चावला.

त्या रजेंत एकमेकांचा निरोप घेतांना दोघांनाही फार वाईट वाटलें.

सुधीर गांवीं आल्यावर त्याच्यापुढें एक निराळेंच संकट 'दत्त' म्हणून हजर राहिलें.

बी. ए. पर्यंत मजल मारलेला मुलगा बी. ए. झाल्यावांचून राहणार नाहीं याबद्दल त्याच्या वडिलांना खात्री होती. आणि त्याच्या शिक्षणा-प्रीत्यर्थ खर्च झालेला पैसा परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वीच वसूल करण्याचा त्यांचा पोक्त विचार होता.

सुधीर घरीं पोंचतांच त्याला वरील परिस्थितीची जाणीव झाली–किंवा ती करून देण्यांत आली म्हणणेंच अधिक शोभेल.

परीक्षा उत्तीर्ण झाल्यावांचून विवाहाचे भानगडींत पडावयाचें नाहीं असा आपला मानस त्यानें उघडपणें बोलून दाखविला; तथापि 'लग्न जमवून ठेवण्यास काय हरकत आहे?' या वडिलांच्या सवालास सुधीरला उत्तर सुचलें नाहीं.

सुधीरनें संकोच न बाळगतां पुन्हां नगरला यावें अशी भाईसाहेबांनीं त्याला आग्रहपूर्वक विनंति केली.

सुधीरनें ' विधवा कुमारी 'तील कुंकवाच्या तत्वांशीं मीनाचा कसा काय संबंध पोंचतो तें स्पष्टीकरण करण्यासाठीं तिची वरीच मनधरणी केली; परंतु " सांगेन केव्हां तरी; आजच घाई कशाला ? " असें म्हणून ती तो विषय टाळीत असे.

ज्युनिअर बी. ए. ची परीक्षा झाली.

सुधीरनें परीक्षेच्या ऐन वेळीं बराच अभ्यास केला; परंतु मीनाच्या वाढत्या स्नेहाबरोबरच अभ्यासाची आबाळ झाली होती.

अखेर व्हावयाचें तें झालें ! सुधीरला परीक्षेंत अपयश आलें. अपयशाचें कारण सुधीरलाच नव्हे तर कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांनाहि माहीत होतें.

त्याच्या विशेष सलगींतल्या स्नेह्यांनीं त्याची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला व ते त्याचे शत्रू बनले.

अगदीं याच वेळीं मीना ज्युनिअर बी. ए. च्या वर्गांत दाखल झाली.

—आणि अनायासें मीनाचें व सुधीरचें संघटण अधिकच वाढलें.

हळु हळु सहा महिने निघून गेले.

उन्हाळ्याच्या रजेंत गांवीं गेल्यावांचून भागणार नाहीं हें पाहून सुधीरनें वडिलांच्या इच्छेप्रमाणें गांवीं जाण्याचें निश्चित केलें.

मीनाला त्यानें ज्यावेळीं आपला बेत कळविला त्यावेळीं मीनानें त्याला उत्तेजन देण्याच्या हेतूनें म्हटलें, "वारंवार घरच्या माणसांची निराशा करणंहि ठीक नाहीं; म्हणूनच मी आग्रह करीत नाहीं नगरला येण्याचा."

"कां, कंटाळलां कीं काय पाहुण्याला?" सुधीरनें थट्टेच्या स्वरांत म्हटलें.

"पाहुण्याच्या नात्यानें मी आपल्याला कधींच बोलावणार नाहीं." असें म्हणून मीनानें आपला अधर चावला.

त्या रजेंत एकमेकांचा निरोप घेतांना दोघांनाही फार वाईट वाटलें.

सुधीर गांवीं आल्यावर त्याच्यापुढें एक निराळेंच संकट 'दत्त' म्हणून हजर राहिलें.

बी. ए. पर्यंत मज़ल मारलेला मुलगा बी. ए. झाल्यावांचून राहणार नाहीं याबद्दल त्याच्या वडिलांना खात्री होती. आणि त्याच्या शिक्षणा-प्रीत्यर्थ खर्च झालेला पैसा परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वींच वसूल करण्याचा त्यांचा पोक्त विचार होता.

सुधीर घरीं पोंचतांच त्याला वरील परिस्थितीची जाणीव झाली—किंवा ती करून देण्यांत आली म्हणणेंच अधिक शोभेल.

परीक्षा उत्तीर्ण झाल्यावांचून विवाहाचे भानगडींत पडावयाचें नाहीं असा आपला मानस त्यानें उघडपणें बोलून दाखविला; तथापि 'लग्न जमवून ठेवण्यास काय हरकत आहे?' या वडिलांच्या सवालास सुधीरला उत्तर सुचलें नाहीं.

मीना आपल्याशीं लग्न करावयास तयार आहे किंवा कसें तें त्याला अद्याप खात्रीपूर्वक समजलें नव्हतें. किंवा तें समजून घेण्याचा त्यानें प्रयत्नहि केला नव्हता.

विवाहाचें प्रकरण एवढ्या हातघाईवर आल्यावर त्याला आपण मीनाला स्पष्ट विचारलें असतें तर बरें झालें असतें असें वाटूं लागलें.

केवळ वडिलांच्या इच्छेचा अनादर होऊं नये म्हणून सुधीर आज एके ठिकाणीं मुलगी पाहून आला.

मुलगी बरीच सुंदर होती. मॅट्रिकपर्यंत शिकलेलीहि असल्यानें शिक्षणाच्या बाबतींत वैगुण्य काढण्यास जागा नव्हती.

पुढें काय करावें हा त्याच्यापुढें प्रश्न पडला.

वडिलांनीं विलक्षण आग्रह धरला. अखेर सुधीरनें मनाचा हिय्या करून विचारलें, "अमुकच मुलीशीं लग्न व्हावें असा आपण हट्ट धरल्यास आपणाकडून शिक्षणासाठीं मी पैसे घेतले व स्वतःचें मतस्वातंत्र्य गमाऊन बसलों असा अर्थ होत नाहीं का?"

सुधीरच्या त्या प्रश्नावर विशेष वादविवाद न होतां त्याला आपल्या इच्छेप्रमाणें मुलीची निवड करण्यास परवानगी मिळाली; तथापि चालू रजेच्या आंत लग्नाचें निश्चित न झाल्यास सुधीरला वडिलांच्या मताप्रमाणें रुकार देणें भाग पडणार होतें!

× × × ×

" कोण सुधीर ? अन् पत्र न पाठवितां ' सर्प्राइझ व्हिजिट ' यावयाची लहर आली वाटतं ? " असें म्हणून मीना सुधीरची सूट-केस त्याच्या हातांतून घेऊन एकाद्या अल्लड मुलाप्रमाणें धांवतच आंत गेली.

सुधीर कबूल केल्याप्रमाणें आला म्हणून भाईसाहेबांना अत्यंत आनंद झाला.

दुपारीं जेवणानंतर सुधीरनें एकान्त साधून मीनाला आपण कोणत्या पेंचांत सांपडलों आहों याची जाणीव करून दिली.

सुधीरच्या तोंडून त्याच्या विवाहाच्या वाटाघाटीची हकीकत समजतांच मीनाला आपल्या भोंवतालच्या खुर्च्या, टेबलें फिरताहेत असें वाटूं लागलें !

सुधीरला तिचें मौन सहन न होऊन तो म्हणाला, " मीना या बाबतींत मला तुमचें मत घ्यावयाचें आहे. "

मीना कांहीं वेळ स्तब्ध झाली. शेवटीं मनाचा कांहीं तरी निश्चय करून ती म्हणाली, " तुमची पुनर्विवाह करण्याची तयारी आहे काय ? "

मीना अशा प्रसंगीं आपली थट्टा करीत असलेली पाहून सुधीर कांहींसा चिडक्या स्वरांत म्हणाला, " मीना हा थट्टेचा प्रसंग नव्हे. "

" पण मी थट्टा कोठें करीत आहें ? " मीनानें शांतपणें विचारिलें.

" मीना मी एवढ्या लांबवर आलों तो तुमचें कांहीं तरी निश्चित मत कळावें म्हणून आलों, यापेक्षां अधिक स्पष्ट काय सांगूं ? " असें

म्हणून सुधीर मीनाकडे आशाळभूत नजरेनें पाहूं लागला. त्याच्या नजरेशीं नजर भिडवून व लगेच खालीं पाहून मीना म्हणाली, " तुमचा आशय मी ओळखला. म्हणूनच विचारतें कीं आपली पुनर्विवाह करण्याची तयारी आहे का ? "

" कोणती ती पुनर्विवाहेच्छु विधवा ? " सुधीरनें विचारिलें.

" मीच ! " शान्तपणें मीना उद्गारली.

सुधीर त्या उत्तरानें केवळ हतबुद्धच झाला ! मीना थट्टा करीत असेल असें तिच्या आतांपर्यंतच्या वागणुकीवरून त्याला वाटेना !

" विधवा कुमारींतील कुंकवाच्या तत्वाशीं माझा जिव्हाळ्याचा संबंध आहे हें आपणास मी सांगणार होतें तें आठवतें ना ? सुधीर माझें तेराव्या वर्षी लग्न झालें परन्तु वर्षाच्या आंतच मी गतभर्तृका झालें. विवाहा-मुळें सौभाग्याचा केवळ कलंक मला लागला. सुधीर बोला आतां ! सौभा-ग्याचा कलंक लागल्यानें मला विधवा समजून आपण माझा अव्हेर करणार का ? सुधीर तुमच्या उच्च विचारांनींच माझें—मन हळु हळु आपल्याकडे आकर्षण झालें. "

सुधीरची चर्या पूर्ण पालटली होती. मनांतील कांहीं तरी गूढ विचार दडविण्याच्या हेतूनें तो म्हणाला, " तुमच्या कुंकवानें माझी बरीच फसवणूक केली म्हणावयाची ! "

" परन्तु आपली फसवणूक करून मला आपल्याकडून विवाहाचें वचन घ्यावयाचें नव्हतें. आपले सुधारकी विचार पाहूनच माझ्या आशेची

ज्योत प्रज्वालित झाली. ती तशीच राखणें किंवा मालवणें सर्वस्वीं आपल्या हातीं आहे " ! असें म्हणून मीना तेथून झटकन् निघून गेली.

' वडिलांचा विचार घेऊन काय तें कळवितों ' असें म्हणून सुधीरनें त्याच रात्रीं नगर सोडलें.

* * * *

तिसऱ्या दिवशीं मीनेच्या हातांत पोस्टमननें एक जाड पाकीट आणून दिलें. मीनानें थरथरत्या हाताने पत्र फोडून वाचावयास सुरवात केली :—

' केवळ स्वज्ञातीय हुषार " कुमारी " म्हणून आपणाकडे माझा ओढा होता. आपण कुंकू लावल्यानें माझी फसवणूक झाली. आपल्या ठायीं अनेक बहुमोल गुण आहेत आणि आपल्या कायमच्या सहवासानें माझें आयुष्य सुखांत गेलें असतें—पण ! आपण विधवा आहां ! आपल्या मताप्रमाणें केवळ आपल्याला ' सौभाग्याचा कलंक ' लागला असला तरी आपणास ' गतभर्तृका ' म्हणूनच समाज ओळखणार. आपण माझ्या लिखाणांतील सुधारकी मतांवर विश्वासण्यांत मोठी चूक केली. एखाद्या मासिकांतील लेखकाचीं सर्वच मतें संपादकाला मान्य असूं शकत नाहींत. तशींच लेखकाचीं सर्वच मतें त्याला स्वतःलाही लागू असणार नाहींत ! अधिक काय लिहूं ? कुंकू लावण्याच्या वरेरकरी तत्त्वानें तुमच्या प्रमाणें माझीहि निराशा केली आहे ! ईश्वर आपणास सुखी ठेवो ! '

पत्र वाचून मीनाला सुधीरच्या पाखंडी मतांचा अत्यंत तिटकारा आला ! घरांत जाऊन तिनें पलंगावर धाडकन् अंग टाकलें ! सारें जग काळ्याकुट्ट अंधारांत गडप झाल्याचा तिला भास झाला !

* * * *

उन्हाळ्याची रजा संपल्यावर सुधीर कॉलेजांत हजर झाला.

मीनाच्या गैरहजेरीचें कारण सुधीरला विचारल्यास 'आपल्याला कांहींच माहीत नाहीं' असें तो बेधडक सांगे.

परन्तु हळु हळु खरें 'गौप्य' बाहेर पडलें !

'फसवणूक' तर खरीच !– पण कोणी कोणाची केली हा प्रश्न मात्र अजून सुटला नाहीं !

---

आत्मोन्नति, डिसेंबर १९३३.

# ३

# अनोळखी अध्यक्ष!

एका थोर विभूतींचा स्मृति-दिन साजरा करण्यास भरलेली सभा होती ती.

नियोजित अध्यक्ष एक नामांकित वक्ते असून त्यांना परगांवाहून मुद्दाम निमंत्रण करून बोलावण्यांत आलें होतें.

वक्ते-उपवक्ते आणि इतर प्रतिष्ठित मंडळी हळूहळू व्यासपीठावर स्थानापन्न झाली, तरी अध्यक्षांचें आगमन होण्याचें चिन्ह दिसेना!

सभेची जाहीर केलेली वेळ टळून जातांच चिटणिसांची धांवपळ सुरू झाली!

सभागृह अनेक प्रकारच्या श्रोतृवृन्दानें आणि तमासगिरांनीं अगदीं फुलून गेलें होतें.

सभेंत गोंधळ माजणार कीं काय, याबद्दल चिटणिसांना भीति वाटूं लागली.

अध्यक्षांचा व चिटणीसांची जानपछान नसल्यामुळें अध्यक्षांच्या परिचयाच्या एका इस्तकास त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणीं पिटाळण्यांत आलें.

क्षणोक्षणीं लोकांची अधीरता वाढत होती.

आणि शिट्यांचे ध्वनि, प्रतिध्वनि उमटत होते!

चिटणिसांनीं टेबलावरची स्प्रिंगची घंटा 'कर्रर्रऽऽ' आवाजांत खण-खणविली व श्रोतृसमुदायाला उद्देशून म्हटलें,

"कृपा करून थोडा वेळ शान्तता राखा! आजचे आपले अध्यक्ष महाराष्ट्रांत नांवाजलेले बडे साहित्यिक आणि वक्ते असून, त्यांच्या वक्तृत्वाचा अलभ्य लाभ मिळण्यापूर्वी थोडी कळ सोसावी."

इतक्यांत शुभ्र पटका बांधलेले व पारशी फॅशनचा लांब डगला घातलेले एक पोक्त गृहस्थ घाईघाईनें सभागृहांत घुसले व थेट व्यासपीठावर जाऊन उभे राहिले.

"आले, आले!" सभागृहांत गर्जना झाली.

"सायलेन्स प्लीज!" चिटणीस ओरडले.

गृहस्थमजकुरांनीं गंभीर आवाजांत सुरवात केली, "सज्जन हो, गाडी नियमित वेळीं स्टेशनवर न आल्यामुळें सभेस हजर होण्यास जो विलंब लागला त्याबद्दल आपणां सर्वांची माफी मागितली पाहिजे. 'विधवा-पुनर्विवाह' सारख्या जिव्हाळ्याच्या विषयावर—"

"भांगेच्या तारेंत आहांत का हो?" एका श्रोत्यानें विचारलें.

"कीं ठाण्याहून निसटून आलांत?" दुसऱ्यानें पृच्छा केली. क्षणभर सभेंत गोंधळ उडाला!

"सायलेन्स प्लीज!" चिटणीस टेबलावर हात आपटून ओरडले.

"आजचे अध्यक्ष फार बडे पाहुणे आहेत. त्यांचा कोणत्याही प्रकारें उपमर्द होतां कामा नये!"

इतक्यांत सभागृहांत दुसरे एक वृद्ध गृहस्थ चिटणीसांच्या हस्तकासह उपस्थित झाले व व्यासपीठावर चढले.

त्यांच्या आगमनानें व्यासपीठावर खळबळ उडाली!

चिटणिसांनीं बोलावयास उभे राहिलेल्या 'अध्यक्षां'शीं कांहीं कानगोष्टी करतांच ते मटकन् मागच्या मागें खुर्चीवर बसले.

"काय झालें हो?" सर्वांनीं एकस्वरांत पृच्छा केली.

सभेंत पुन्हां गडबड सुरू झाली.

"सायलेन्स प्लीज!" चिटणीस आर्तस्वरांत ओरडले. त्यांनीं आपला चष्मा नीटनेटका नाकावर बसविला व सभेस उद्देशून म्हटलें,

"थोड्याशा गैरसमजाचा प्रकार घडलेला आहे! आपले नियोजित विद्वान् अध्यक्ष आतां आले तेच होत! यापूर्वी भाषणाला उभे राहिलेल्या गृहस्थांस टांगेवाल्यानें 'दाणे आळीं'त याच वेळीं भरलेल्या 'विधवा-विवाह-

साहाय्यक मंण्डळा 'च्या सभेकडे नेण्याऐवजीं चुकून येथें आणून सोडल्या-मुळें हा घोंटाळा उडाला!"

"भले शाबास—कुठें आहेत ते आगांतुक अध्यक्ष!" श्रोत्यांनीं ओरड केली.

—तथापि, चिटणिसांचें भाषण संपण्यापूर्वींच शुभ्र फेटेवाल्या लांब डगल्याच्या एका व्यक्तीनें व्यासपीठावरून उडी मारून मागल्या दरवाजानें हळुच पोबारा केला होता!!

---

विविधवृत्त, २५ एप्रिल १९३७.

# ४

# जीवनाधार !

'Some Silent laws our hearts will make,
Which they shall long obey,

..................................

And from the Blessed power that rolls,
About, below, above
We'll frame the measure of our souls;
They shall be tuned to love!'

Wordsworth

"विभाकर! विभाकऽर...!"

एका मागून एक तीन हांका मारून नलिनींनें दरवाजाच्या कडीचा 'खड् खड्' आवाज केला, तेव्हां कोठें विभाकर जागा झाला. त्यानें अंगाला आळोखे पिळोखे दिले व तो पुनश्च पलंगावर येऊन पडला!

नलिनी खोलींत आली.

"हें काय, वाजले किती पाहिलेस का?" असें म्हणून नलिनीनें 'टाईमपीस' आणून विभाकरासमोर धरलें!

"हात्तेच्या! नऊच ना? रविवारच्या वेळापत्रकांत नऊ कांहीं विशेष नाहींत!"

विभाकरनें पांघरूण अधिकच लपेटून घेतलें.

टेबलावर पुस्तकें अस्ताव्यस्त पडलीं होतीं! अर्धवट लिहिलेलीं कागदाचीं चिटोरीं इतस्ततः विखुरलीं होतीं! नलिनीनें पुस्तकें नीटनेटकीं ठेवलीं. कागदाचीं चिटोरीं संगतवार लावून त्याला टांचणी लावली. 'डस्टर'नें टेबलावरची धूळ झाडली. टेबलाचा 'ड्रावर' उघडून कागदाचीं चिटोरीं आंत टाकलीं. एका कार्डाकडे लक्ष जातांच तिनें तें उचललें.

"इश्श! अजून 'मनोदय'ला गोष्ट गेली नाहीं विभाकर?"

"काय करूं मनाला स्वस्थता वाटत नाहींना!" त्यानें संपादणी केली.

"मग संपादकाला झुलत ठेवण्यांत काय अर्थ?"

"लिहीन लिहीन म्हणतांना आठवडा गेला, अजून मन प्रसन्न होत नाहीं."

"बरं वाटत नसेल तर औषध घे कांहीं."

"अस्वास्थ्यावर औषध नाहीं." विभाकर खिन्नपणें उद्गारला.

नलिनीला तें पटलें किंवा नाहीं कुणास कळे परंतु ती निमूटपणें खोलींतील केर काढूं लागली.

"नलिनी !"

"काय रे ?"

"तुला ही नसती उठाठेव कशाला ?"

"कोणती ?"

"मला खोली साफ करतां येते अन् पुस्तकेंहि नीटनेटकीं ठेवतां येतात."

"तें मला समजतं, पण मी हातभार लावला तर कुठं बिघडलं ?"

"छे ! तुला विनाकारण त्रास देणं मला आवडत नाहीं !"

"माझ्या स्वतःच्या आवडीसाठीं मी करतें मग तर झालं ? माझं समाधान तूं हिरावून घेणार का ?"

"बरं बुवा ! घेतों शब्द मागं !"

"हं, आतां उठा" असें म्हणून नलिनीनें विभाकरच्या अंगावरचें पांघरुण खरोखरीच ओढून घेतलें व त्याची घडी करून ठेवून दिली.

विभाकर नाइलाजास्तव उठला. त्यानें तोंड धुतलें. ब्रशानें केस नीटनेटके केले. इतक्यांत नलिनी खोलींत आली. तिच्या हातांत चहाचा कप होता.

"हें उपकारांचें ओझें सकाळपासून कां म्हणून लादतेस डोक्यावर ?"

"उपकार वाटत असतील तर परत नेतें बापडी !"

"बरं आण"

विभाकरानें कप रिकामा केला.

× × × ×

विभाकरचें व नलिनीचें दूरच्या वहिणभावंडांचें नातें होतें. तुफानी दर्यात सांपडलेलीं दोन लाकडें प्रवाहाबरोबर वहात वहात एकत्र यावींत त्याप्रमाणें परिस्थितीच्या जीवनप्रवाहांत सांपडूनच नलिनीचें विभाकरशीं संघटण घडून आलें होतें. ऐन तारुण्याच्या उमेदींत पतिसुखाला पारख्या झालेल्या नलिनीला सासरीं व माहेरीं कुणींच जवळचें नव्हतें. तिच्या त्या अनाथावस्थेंत विभाकरच्या वडिलांनीं तिला आपुलकीनें जवळ केलें आणि कन्यावत् मानून 'नर्सिंग'चें शिक्षणहि देण्यास सुरवात केली. मातृ-वात्सल्याला लहानपणापासूनच आंचवल्यामुळें नलिनीच्या प्रेमळ् सान्निध्यानें विभाकरला मायेचा ओलावा लाधला. परंतु सुखाचे क्षण गोड वाऱ्याच्या झुळुकेप्रमाणें क्षणभरच टिकणारे असतात; त्यांचें अस्तित्व भासूं लागतें न लागतें तोंच दुःखाचे वादळी वारे अंगाला झोंबूं लागतात. बी. ए. च्या परिक्षेचा निकाल लागण्यापूर्वींच विभाकरच्या वडिलांचें प्रेमळ छत्रहि हरपलें!

आयुष्यांतील एक आधार नाहींसा झाल्यामुळें विभाकरला नलिनी-विषयीं अधिकच जिव्हाळा उत्पन्न झाला! नलिनीला तरी विभाकरावांचून जगांत कुणाच्या प्रेमाचा पाठिंबा होता?

एल्. एल्. बी. च्या टर्म्स् भरण्यासाठीं विभाकरला मुंबईस येऊन राहावें लागलें आणि 'नर्सिंग'चें शिक्षण पूर्ण होताच नलिनीलाहि मुंबईस एका 'धर्मार्थ' हॉस्पिटलमध्यें जागा मिळाली.

मुंबईस एकत्रच बिऱ्हाड करावें असा विभाकराचा बेत होता, परंतु जननिन्देकडे दुर्लक्ष करून विभाकरचें अनहित करणें इष्ट नव्हे असें नलिनीला वाटूं लागलें. विभाकरला वाईट वाटलें परंतु नलिनी शेजारीं राहण्यास राजी आहे एवढ्यांतच त्यानें समाधान मानलें. परंतु तें समाधान

टिकणारें नव्हतें. नलिनीच्या नात्याच्या मंडळींचे जहरी शब्द वारंवार त्याच्या कानीं येऊन त्याचें मनःस्वास्थ्य बिघडवूं लागले. कित्येक निनावीं पत्रेंहि येत. त्यांतील मजकूर ठराविक ठशाचा असायचा! तथापि विभाकर तिकडे दुर्लक्ष करी.

तो स्वतंत्रपणें खाणावळींत जेवत असे. इतकेंच नव्हे तर चहा वगैरे करण्याचीहि नलिनीला तसदी देणें त्याच्या जिवावर येई. नलिनीला परिस्थितीची जाणीव नव्हती असें नाहीं, परंतु अनाथ निराश्रित स्त्रियांकडे पहावयाची समाजाची विषारी दृष्टि अनुभवानें तिच्या चांगलीच परिचयाची झाली होती. शिवाय विभाकरचें अंतःकरण इतकें कमकुवत नाहीं याचा तिला पूर्ण आत्मविश्वास होता; व म्हणूनच जननिन्देकडे कानाडोळा करून विभाकरशीं खुल्या दिलानें वागतांना तिला समाजाची दिक्कत वाटत नसे!

× × × ×

"कोण मंडळी येऊन गेली रे आतां?"

नलिनीचा तो खोंचक सवाल होता.

"सांगूं का?—पण नकोच! कळेल मागाहून!"

"हें रे काय? माझं औत्सुक्य वाढवून काय मिळतं तुला?" असें म्हणून विभाकर बसलेल्या खुर्चीच्या मागें दोन हात टेकून नलिनीनें त्याला गदगद हलविलें.

"काय मिळतं सांगूं? तूं रागावलेली पहायला!"

"इश्य! मग मी नाहींच विचारीत जा!"

नलिनी खरोखरच खोलीबाहेर पडली!

"बरं सांगतों ये."

वळवाच्या पावसाप्रमाणें रागाची सर ओसरली. नलिनी खुर्चीवर येऊन बसली.

"आतां तूंच सांग पाहूं काय तुझा तर्क चालतो तो!"

नलिनीनें थोडा विचार करून म्हटलें.

"लग्नाची आहे कीं काय गडबड?"

वरील प्रश्न विचारतांना नलिनीची स्वतःचीच गडबड उडाली!

"अस्सं! ठाऊक असून वेड पांघरायचं!"

"एकूण योग आहे तर यंदा" असें म्हणून नलिनी झर्कन् खोलींतून बाहेर पडली!

विभाकरला तिचें वर्तन थोडें चमत्कारिक वाटलें; पण त्याचें आश्चर्य फार वेळ टिकलें नाहीं.

× × × ×

"किती वेळ जागावयाचं आहे अजून विभाकर?"

वीणारवाशीं स्पर्धा करणारा तो आवाज ऐकून विभाकरनें खोलींत जळणाऱ्या 'मूनलाइट' दिव्याची ज्योत अधिक प्रज्वलित केली आणि दरवाजा उघडला.

नलिनी आंत आली.

"आमच्यावर एवढा खडा पहारासा ताईसाहेबांचा ?"

"प्रकृति बिघडून घ्यायची आहे वाटतं ?" नलिनीनें विचारलें.

"आमच्या प्रकृतीबद्दल आम्ही जबाबदार आहोंत" दिवाकर तोऱ्यानें उद्गारला.

"ओ हो ! केवढी ऐट !" असें म्हणून नलिनी तोंडावर पदर धरून हसूं लागली.

"हा अभ्यास वाटतं" नलिनीनें टेबलावरचें उघडें पुस्तक उचलून भिवया उंचावून विचारिलें.

"अर्थात् ! मी काव्याचा अभ्यासी आहेंच ! केशवसुतांची ही कविता ऐक तरी जरा."

दिवाकरनें पुस्तक हातीं घेऊन वाचण्यास सुरवात केली,

**स्वपति चितेवरि उडी सती**
**संसृति विमुखी घेई ती;**
**दीपशिखेवरि पतंग तो**
**प्रेमें प्राणाहुति देतो;**
**मी न करिन का तेंवि तधीं**
**माझें मज लाभेल जधीं ?**

"किती गोड कविता आहे नाहीं ?" नलिनी उद्गारली.

"अन् अर्थ ?"

"त्याहून गोड !"

"अरे हो, मी तुला हाक कां मारली आहे ठाऊक?"

"सांगितल्यावांचून कसं समजणार?"

"इश्श! जिथं तिथं थट्टा!"

"बरं सांग."

"सोमवारपासून माझी नेमणूक नाशिकला झाली आहे."

"होय? कोणत्या हॉस्पिटलांत?" विभाकरनें चिंतातुर स्वरांत विचारलें.

"नायर फ्री हॉस्पिटल."

"अन् तूंहि बिनतक्रार संमति दिलीस?"

"मग काय करणार?"

विभाकर एकाएकीं गंभीर झाला! आयुष्यांतील मायेची सावली दूरावणार म्हणून त्याचें मन अस्वस्थ झालें.

"खण् खण्" आवाजांत समोरच्या टॉवरवर बारांचे ठोके पडूं लागले. नलिनी उठून खोलींत गेली.

दिवाकर उठला. त्यानें दरवाजा बंद केला आणि अंथरुणावर अंग टाकलें.

× × × ×

काळाचा ओघ अनिर्बन्ध वहात होता.

महिन्यांमागून महिने गेले.

जूनची पहिली तारीख उजाडली. वकिलीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला. विभाकर यशस्वी झाला. नलिनीला नाशिकला तारेनें ती आनंदाची

बातमी कळविण्यांत आली, परंतु तिजकडून अपेक्षेप्रमाणें अभिनंदनपर पत्र आलें नाहीं! गेल्या चार महिन्यांत खुशालीच्या चार ओळींपलीकडे नलिनी अधिक लिहित नसे. विभाकरला त्या गोष्टीची टोंचणी लागे; परंतु 'नसेल वेळ मिळत' अशी मनाची समजूत करून घेऊन तो ते कटु विचार झाडून टाकीत असे.

विभाकरची वकिलीची परिक्षा उत्तीर्ण होतांच त्याच्या विवाहाचा प्रश्न पुनश्च उपस्थित झाला. त्या बाबतींत नलिनीच्या विचारानें एकादें चांगलेंसें स्थळ निश्चित करावें असें विभाकरनें ठरविलें होतें; तथापि नलिनीच्या आकस्मिक जाण्यामुळें त्याला तें शक्य होईना.

अखेर एक स्थळ निश्चित झालें.

नलिनीला दहा दिवसांची रजा घेऊन येण्याबद्दल निकडीचें पत्र गेलें–परंतु उत्तर आलें नाहीं!

लग्नतिथी आठवड्यावर येऊन ठेपली. एका दूरच्या मावशीनें लग्नानिमित्त विभाकरकडे येऊन राहण्याचें औदार्य दाखविलें; तथापि नलिनी आल्यावांचून सर्व व्यवस्था ठाकठीक होणार नाहीं अशी विभाकरची खात्री होती.

रविवारचा दिवस. दुपारच्या गाडीनें जाऊन नलिनीला आग्रहानें घेऊन यावें असा विचार करीत विभाकर आरामखुर्चीवर पडला होता. नलिनीच्या स्वभावांत तुसडेपणा कधींपासून उत्पन्न झाला तें त्याला समजेना. पूर्वीची आपल्याविषयींची कळकळ जाऊन तिला आपल्याबद्दल जरासुद्धां आस्था वाटूं नये याबद्दल त्याला राहून राहून सखेदाश्चर्य वाटे! इतक्यांत—

डांकवाल्यानें एक पत्र आणून हातीं दिलें.

अक्षर नलिनीचें होतें.

त्यानें उत्सुकतेनें पत्र फोडलें. त्याची बुभुक्षित दृष्टि मजकुरावर फिरूं लागली.

नायर हॉस्पिटल, नाशिक.
२४–x–१९३२

प्रिय विभाकर,

तुला हें पत्र वाचून जेवढें आश्चर्य वाटेल त्याच्या शतपटीनें वाईट वाटेल हें मी जाणून आहें. परंतु अंतःकरण खुलें केल्यावाचून तें हलकें होणार नाहीं! विभाकर केवळ तुझ्या एकमेव प्रेमाच्या आधारावर मी आजवर जिवन्त राहिलें! या अफाट दुनियेंत तुलाच मी माझा जीवनाधार मानीत होतें आणि म्हणूनच जननिन्देचे विषारी फूत्कार आनंदानें सोसून तुझ्या सुखासाठीं जिवापाड धडपड केली! तथापि पुरुषांना स्त्रियांच्या अंतःकरणाची कल्पना नसते असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें; म्हणूनच मी स्पष्टपणें सांगतें कीं आम्हां स्त्रियांचें अंतःकरण भयंकर स्वार्थी असतें! एका म्यानांत दोन कट्यारी राहूं शकत नाहींत आणि एका अंतःकरणांत दोन स्त्रिया कोणत्याही नात्यानें समान दर्जानें राहूं शकणार नाहींत! त्यांना तेथें सार्वभौमत्वच पाहिजे असतें! विभाकर मला पूर्णपणें माहीत आहे कीं लग्नानंतर तूं मला पूर्णपणें विसरशील; आणि जरी विसरला नाहींस तरी ज्या ज्योतिभोंवतीं माझा आत्मा घिरट्या घालीत होता त्या ज्योतीच्या प्रकाशाला तो आतां कायमचा पारखा होणार! आकाशांत उडणाऱ्या दोन वावड्यांपैकीं एकीचा धागा दुसरीवर घसला जाऊन ती बेबंदपणें कोठच्या कोठें

वहात जावी, अगदीं तश्शीच माझी स्थिति झाली आहे! विभाकर, तूं म्हण-शील किती स्वार्थी नलिनीचें अंतःकरण! तिला माझें सुख पाहवत नाहीं! तरी मी तुला उघड सांगूं शकेन कीं एकट्या नलिनीचेंच अंतःकरण स्वार्थी नाहीं ?——तर माझ्या सारखीं एका काडीच्या आधारावर जीवन जगविणारीं सारींच स्त्रीहृदयें या स्वार्थानें भरलेलीं आहेत! स्त्रियांना त्यांच्या जीवनांत आधाराची आवश्यकता असते! आणि त्याच जीवनाधारावर त्या वाटेल तीं संकटें झेलण्यास समर्थ असतात!

विभाकर! मला माहित होतें कीं माझ्या जीवनांतील तुझा गोड सहवास केवळ सन्ध्यासमयींचा क्षणभंगुर लालिमा आहे; तो अरुणोदयींचा चिर-प्रकाश नव्हे! तथापि तें अल्पजीवि सान्निध्यसुख दीर्घकाल मिळावें हा मानवी मनाचा धर्म माझ्याहि हृदयांत जागृत होताच; इतकेंच नव्हें तर ‘तुझी वकिलीची परिक्षा एक दोन वर्षें उतरली नाहीं तर बरें होईल’ हाहि स्वार्थी विचार माझ्या मनांत कित्येकदां डोकावून गेला असेल! तुझी परीक्षा उतरतांच तुझ्या लग्नाचे विचार सुरू झाले. पहिल्या दिवशींच मी तुला त्यासंबंधीं विचारलें व माझी संशयनिवृत्ति होतांच आपला ऋणानुबंध संपुष्टांत आल्याचें मी कळून चुकलें. ती रात्र अंथरुणावर तळमळण्यांत गेली. माझें भेसुर भविष्य माझ्या डोळ्यांसमोर थयथय नाचत होतें! त्याच रात्रीं मीं ठरविलें कीं कोठें तरी बाहेरगांवीं बदली करून घेऊन आपले स्नेहसंबंध हलक्या हातानें तोडून मोकळें व्हावें!

माझे प्रयत्न कल्पनेबाहेर यशस्वी झाले हें सांगणें नकोच!

विभाकर! माझ्या पत्रानें तूं निराश होशील; रागावशील व कदाचित् माझ्या शोधार्थ नाशिकला येण्याचीहि तसदी घेशील! पण त्यांत तुला यश

येणार नाहीं! कारण प्रस्तुत पत्र ज्या वेळीं तुझ्या हातीं पडेल त्या वेळीं ही हतभागिनी नलिनी एकाद्या अज्ञात स्थळीं गेलेली असेल! माझें अवशेष आयुष्य मी तुझेंच कल्याण चिन्तण्यांत खर्चे करीन. माझ्यासारखे निराधार हताश जीव जगांत कितीतरी असतील!

तुझा आवडता केशवसुतांचा कवितासंग्रह तुझी स्मृति म्हणून मी चोरून आणला आहे. त्यांतील एक कविता माझ्या दृष्टिसमोरून हलत नाहीं तीही कीं—

**मज पासोनी**
**हाय! हिरोनी**
**नेलें कोणी**
**म्हणुनि जीव पाखडीतसें**
**न परि हरपलें तें गवसे!**

मला विसरून जा!

तुझी हितचिन्तिका,
दुर्दैवी—**नलिनी**.

विभाकरच्या हातांतून पत्र गळून पडलें!

त्याला सर्वत्र अंधकार भासूं लागला!

त्यानें खुर्चीवर मागें मान टाकून डोळे मिटून घेतले!

---

सुधाकर, फेब्रुवारी १९३२.

# ५

# भयंकर भोपळ्या रोग !

मध्य वस्तींतील एका दुमजली इमारतीच्या वरच्या मजल्यावर डॉक्टरांचा छोटेखानी दवाखाना थाटलेला होता.

तीनचार कपाटांच्या कोंडोळ्यात मध्यभागीं एक 'टीकवुड'चें पार्टिशन घालून मोठ्या कौशल्यानें डॉक्टरांनीं आपली 'कंपाउंडिंग रूम' बनविली होती. या तीनचार कपाटांतच डॉक्टरांच्या औषधांचा सारा संग्रह समाविष्ट झालेला दिसत होता.

दवाखान्याच्या दरवाजावर डॉक्टरांचें धंद्याच्या डिग्रीसह नांव व भेटण्याची वेळ दाखविणारी पाटी लटकत होती.

दवाखाना उघडून बंद करणाऱ्या नोकराशिवाय डॉक्टरांच्या दवाखान्यांत बहुधा फारशी कोणाची वर्दळ दिसत नसे. कारण या वेळीं

गांवांत कोणतीच सांथ सुरू नव्हती, आणि धंद्याच्या दृष्टीनें त्यांचे असे भरभराटीचे दिवस जेव्हां येत, तेव्हां त्याचे इतर ‘ जुने आणि जाणिते ’ व्यवसायबंधु फारसे रोगी त्यांच्या हातीं लागूं देत नसत !

पडशाखोकल्याचा एखादा रोगी मधून मधून त्यांच्या समाचाराला जाई, आणि त्या नव्या नवसाच्या ग्राहकाची तपासणीही डॉक्टर अगदीं प्रामाणिकपणानें कसून अर्धा पाऊण तास करीत; तथापि, आपल्या तल्लख बुद्धीचें तेज दाखविण्यास अवसर मिळेल अशी एकही महत्त्वाची केस आजवर त्यांच्या हातीं आली नव्हती ! जगांत दैवावांचून नुसती बुद्धिमत्ता कशी कवडीमोल ठरते, त्याचें डॉक्टर हें एक प्रत्यक्ष उदाहरण होतें !

वरील प्रकारचा एखादा रोगी जेव्हां डॉक्टरांकडे येई, तेव्हां त्यांना कंपाउंडरची भूमिकाही स्वतःच पत्करावी लागे ! तथापि आपलें दैन्य ग्राहकांच्या नजरेला येऊं नये, म्हणून ते–गैरहजर–कल्पित–कंपाउंडरवर कांहींसें स्वगत, परंतु ग्राहकांना ऐकूं जाईल, अशा बेतानें जळफळत औषध तयार करीत !

दवाखाना उघडून वर्ष होत आलें, तरी डॉक्टरांच्या धंद्याची घडी अद्याप नीटशी बसली नव्हती.

नित्याप्रमाणें आजही डॉक्टर टाइम्स चाळीत वेळ घालवीत होते.

इतक्यांत खालीं मोटरचें हॉर्न वाजलें व कर्रर्र ऽऽ असा ब्रेकचा आवाज होऊन मोटर थांबली.

डॉक्टरांनीं क्षणभर टाइम्स बाजूला ठेवला.

बाहेर जाऊन एक वेळ सडकेवर नजर टाकावी असाही एक पोरकट विचार त्यांच्या मनांत आला; परंतु मोटरमधून कोणी रोगी आजवर आपल्या दवाखान्यांत आल्याचें त्यांना आठवत नव्हतें !

त्यांनीं पुनश्च टाइम्समध्यें डोकें खुपसलें व नव्या कॉंग्रेस प्रधान-मंडळाचे फोटो ते पाहूं लागले.

'खट् खट्' होणाऱ्या बुटांचा आवाज दरवाजाजवळ येऊन थबकतांच डॉक्टरांनीं आश्चर्यानें वर पाहिलें.

पांढरा शुभ्र काठेवाडी फेटा बांधलेले एक बनिया गृहस्थ डॉक्टरांना अभिवादन करून आंत आले व डॉक्टरांनीं पुढें केलेल्या खुर्चीवर बसले.

चांगला धडधाकट दिसत होता तो माणूस !

या गृहस्थाचें आपल्याकडे काय काम असावें, त्याचा डॉक्टरांना अंदाज होईना !

एखाद्या विमा कंपनीचा एजंट किंवा इन्कम्टॅक्स इन्स्पेक्टर तर हा नसेल, असे तर्ककुतर्क लढविण्यांत डॉक्टर किंचित्काल गुंग झाले. तथापि डॉक्टरांना फार वेळ विस्मयांत गटंगळ्या खात रहावें लागलें नाहीं.

"डॉक्टरसाहेब" त्यानें सुरवात केली, "माझी अशी धट्टीकट्टी प्रकृति पाहून माझें आपल्याकडे काय काम असावें, अशी शंका आपल्याला आली असेल, नाहीं? परंतु माझ्या या शरीराचा डोलारा आंतून कुठल्या तरी दुर्धर रोगानें पोखरला आहे ! पाहिजे तर 'भोपळ्या रोग' म्हणा

आपण त्याला! परंतु माझी हकीकत ऐकून आपणही क्षणभर विस्मयांत पडाल."

त्याचें तें अस्खलित मराठी ऐकून डॉक्टरांना आश्चर्याचा धक्का बसला!

"बरं, काय होतंय् आपल्याला, सांगा पाहूं." डॉक्टरांनीं उत्सुकतेनें विचारलें.

"चार चार दिवस भूक लागत नाहीं. अन्नाचा कणही तोंडांत घालवत नाहीं. आणि पुढें पांचसहा दिवस पोटांत आग पडते. भुकेनें जीव कासावीस होतो. तासातासानें अन्नावर तुटून पडावें लागतें. आज सकाळपासून भुकेचीं लक्षणं दिसूं लागलीं आहेत."

रोग्याचीं लक्षणें (History) ऐकून डॉक्टर खरोखरच विस्मयचकित झाले. आजवर त्यांनीं अशी 'केस' पाहिली नव्हती, ऐकली नव्हती आणि वाचलीही नव्हती!

इतक्यांत गृहस्थमजकूर गयावया करून म्हणाला, "डॉक्टर, एक्स्क्यूज हं! (क्षमा करा) आली ती वेळ! लवकर छोकऱ्याला पाठवून समोरच्या हॉटेलांतून जे मिळतील ते खाद्यपदार्थ मागवा! धीर निघत नाहीं हो मला!"

त्यानें घाईघाईनें खिशांत हात घातला व पैशाचें पाकीट काढून एक रुपया डॉक्टरांच्या टेबलावर फेकला.

डॉक्टरांना आश्चर्याचा दुसरा धक्का बसला!

त्यांनीं तो रुपया नोकराच्या हवालीं केला व त्याला हॉटेलांत पिटाळला.

गृहस्थमजकूर डॉक्टरांच्या समोरच्या बांकावर आडवा झाला व म्हणाला, "तपासा डॉक्टर, तपासा हो! हा रोग तरी कोणता आहे!"

क्षणाक्षणाला त्याची धडपड वाढत होती!

डॉक्टरांनीं स्टेथोस्कोप हातीं घेतला व गृहस्थमजकुरांना उलट-सुलट तपासलें!

हृदयाचे ठोके, नाडी, सारें व्यवस्थित होतें त्याचें!

डॉक्टरांनीं अगदीं कसून परीक्षा पाहिली त्याची परंतु रोगाचें निदान करणें त्यांच्या बुद्धीच्या अटकेपार होतें!

"आयाईगऽऽ! डॉक्टर, भुकेनें प्राण कासावीस होत आहेत हो!"

डॉक्टर शून्य दृष्टीनें त्याची तळमळ पाहत होते.

इतक्यांत खाद्याचे जिन्नस आले.

राइस, मटणप्लेट, पॅटिस् सर्व कांहीं सामुग्री होती ती!

डॉक्टर प्रिस्क्रिप्शन लिहिण्यासाठीं टेबलाजवळ डोकें खाजवीत बसले होते.

—आणि रोगी महाशय खाद्यपदार्थांवर आडवातिडवा हात मारीत होते!

डॉक्टरांनीं वेळ निभावून नेण्यासाठीं कांहीं तरी औषध तयार करून दिलें व म्हटलें,

"आज हें औषध घेऊन चला; तथापि, उद्यां सकाळीं मला आपली प्रकृति पुन्हां पाहावी लागेल. तेव्हां बरोबर आठ वाजतां येऊं शकाल का?"

खाद्याच्या बशा परत करीत गृहस्थ म्हणाले,

"जरूर, जरूर! डॉक्टरसाहेब, माझ्या रोगाचं आपल्याला हसूं येत असेल! परंतु माझा आहे हा असा रोग आहे! आपल्यापुढं बसून निर्लज्जपणें खाद्य पदार्थांवर ताव मारतांना माझ्या मनाला किती यातना होत होत्या!"

"अच्छा, अच्छा, कुच फिकीर नाहीं!" डॉक्टर त्याला थांबवून हंसत उद्गारले.

रोग्यानें डॉक्टरांशीं हस्तांदोलन केलें व त्यांचा निरोप घेतला.

संध्याकाळीं डॉक्टरांनीं एक तास अगोदर दवाखाना सोडला.

सकाळचा रोगी व त्याचा विलक्षण रोग या दोनच गोष्टी दिवसभर त्यांच्या डोक्यांत थैमान घालीत होत्या!

त्यांनीं लायब्ररींत जाऊन 'लान्सेट' या वैद्यकीय मासिकाच्या दोन वर्षांच्या फायली घरीं नेल्या.

पत्नीच्या कुरकुरीकडे कानाडोळा करून डॉक्टरांनीं रात्रभर डॉ. हेन्री टायडीचे 'सिनॉप्सिस् ऑफ् मेडिसन', डॉ. विल्फ्रेड बार्टनचें 'सिम्पटम्स् डायग्नॉसिस्', डॉ. सॅम्सनचें 'नॉर्मल डाएट' आदिकरून वैद्यकीय

पुस्तकें उलथींपालथीं केलीं !—परंतु सकाळच्या विलक्षण रोगाचा मागमूस त्यांना कोठेंच सांपडला नाहीं !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं डॉक्टर सचिंत मुद्रेनें दवाखान्यांत हजर झाले.

कालचा विलक्षण रोगी आल्यावर त्याची बोळवण कशी करावयाची याचा डॉक्टरांना मोठा पेंच पडला !

इतक्यांत सकाळींच कोणीतरी आणून दिलेलें एक सुंदर निळें सील-बंद पाकीट नोकरानें त्यांच्या हातीं दिलें.

डॉक्टरांनीं अधीरपणें पाकिट फोडलें.

दहादहा रुपयांच्या दोन कोऱ्या करकरीत नोटा व जाड निळ्या नोटपेपरवर मोडक्या तोडक्या मराठींतील गचाळ अक्षरांत लिहिलेलें पुढील मजकुराचें पत्र बाहेर निघालें.

मुंबई, ×× एप्रिल, १९३७.

प्रिय डाकटरसाहेब,

बहुत राम राम,

काल आमचा माणस तुमचे दवाखानामंदी बिमार होऊनशान आला आणि त्येला तुमी पिवाची दवाबी दिली; पण ते ती पिवला नाय. काय के त्येला कायबी बिमारी नाय हाय.

आमच्या 'शिणिटोण'च्या ' आफत–इ–प्यारे ' फिलम मंदीं डाकटरचे नेचरल काम करायला कोणीबी एक्टर सकत नाय होता. म्हणून आमचा एक्टर तुमचा दवाखानामंदीं झूटा बिमार होऊनशानी गेला. ते वखत आमीं तुमची सामेच्या मकाणमधून ते सीनच्या फिलम घेतला.

तुमचा रजेबगर तुमाला ' शूट ' केला तवा ग़ुस्सा नको कर. तुमच्या फीचा वीस रुपया येच्याबराबर पाठवला हाय, ते घेवा.

आमची फिलम ' वाडिया थेटर ' मंदी लागेल तवा तुमच्या नांवाची कार्डवर पांच पांच माणस तीन वखत छोडेल.

तसदी माफ करशो.

लिखणार

बदामजी पिस्तनजी लिंबुवाला

मेनेजर, ' जयदेवी शिणेटोण.'

---

विविधवृत्त २६ मे १९३७.

६

# बाहुलीचें लग्न !

"हें रे काय भाऊटल्या ! माझी बाहुली फेंकून कां दिलीस ?"

"मग ही काय बाहुली ठेवायची जागा वाटतं ? माझ्या पुस्तकाच्या पेटीवर मोठ्या दिमाखानें बसवून ठेवलीस ती आपली दिवटी !"

"शिव्या कां देतोस रे माझ्या बाळीला ? बघ कसं हिरमुसलं तोंड करून बसली ती !"

कुमुद बाहुलीला पोटाशीं घट्ट धरून खरोखरीच रडूं लागली !

किती कॉवळें अंतःकरण ! तशांत स्त्रीहृदय !

भाऊचेही डोळे ओले झाले !

"बरं औषध लावूं का तुझ्या बाहुलीला ?"

"हं लाव !"

वठलेलें रोपटें सहानुभूतीच्या जलबिंदूंनीं पुनश्च टवटवलें !

पावसाची सर येऊन गेली! आतां कोंवळें ऊन पडलें होतें जणू काय! आळवाच्या पानावर चमकणाऱ्या जलाचे मौक्तिकसुमणी अजूनही गालावर दबा धरून बसले होते!

भाऊनें 'लुट्टपुट्ट'चें औषध लावलें! बाहुलीची जखम बरी झाली! कुमुदच्या चिमण्या मातृहृदयाला आनंद झाला!

"भाऊ!"

"काय म्हणतेस आतां कुमुद?"

"आपल्या बाहुलीचें लग्न करूं येतोस का?"

"अग अजून ती लहान आहे!" भाऊनें उडवाउडवी केली!

पुरुषाची जात!

"इश्श! केवढी मोठी झाली बघ! पातळंसुद्धां नेसूं लागली आतां!"

भाऊनें बाहुलीकडे मान वर करून पाहिलें, खरंच! ती एवढ्यांत पातळं नेसूं लागली होती!

स्त्रीजातीचं बालपण केव्हांच भुर्कन् उडून जातं! व्यवहारी जगाचाहि असाच अनुभव आहे!

भाऊनें लग्नाला कबुली दिली. चिमणी, फुलपांखरं, वऱ्हाडी जमूं लागलीं! मुहूर्त ठरला! वाजंत्रीं वाजूं लागलीं! गुळ, खोबरें, चणे, कुरमुरे वगैरे साहित्याचे रांजण भरले!

"अन् नवरा ग कुमुद?"

कुणी तरी शंका काढली!

"अग खरंच!" कुमुदला गोष्ट पटली!

सर्व मुलांनीं गिल्ला केला ! कुमुद ओशाळली !

" नवऱ्याचा नाहीं पत्ता अन् लग्न करायला निघाली ! " कुणीतरी टोमणा मारला !

' नवरा कुठून आणावा ? '

सर्वांनाच विचार पडला !

" अग हो—! " एक छोटी मुलगी डोळे विस्फारीत मोठेपणाचा आव आणून उद्गारली. तिच्याकडे सर्वांचें लक्ष वेधलें ! ' उंदराच्या गळ्यांत घांट कोणी बांधावी ? ' हा प्रश्न विचारणाऱ्या म्हाताऱ्या उंदराकडेहि कुणाचें एवढें लक्ष खिळलें नसेल !

" काय काय, सांग ! " सर्व बालसेनेनें एकाच प्रश्नाचा हल्ला केला !

" आपल्या शालीचा ' ठोंकळा ' ठीक आहे ! "

सर्वांनीं माना डोलावल्या !

" इश्श ! " कुमुदनें नाक मुरडलें ! कोणत्या मातृहृदयाला आपली कन्या ' ठोकळ्या 'च्या गळ्यांत बांधावीशी वाटेल ? "

" नाहीं तर जा ! आम्ही आपल्या चाललों ! मधू, इन्दू, चन्दू चला रेऽ सारे ! "

कुमुद घाबरली ! ' बाहुलींचं ठरलेलं लग्न कसं मोडावं ?' तिच्या बालमनाला कोडें पडलें !

तिनें भाऊकडे एक आशेचा कटाक्ष टाकला.

तो देखील त्याच चिंतेंत चूर होता!

'बाहुलीचें लग्न मोडतें, आतां याला उपाय काय?' सर्व छोट्या मेंदूंत एकच विचार थैमान घालीत होता! चित्राप्रमाणें सर्व चिमणी फुलपांखरें एकमेकांकडे 'लुकलुक' नजरेनें पाहूं लागलीं!

"बरं तर! विचारा शालीला!" तिनें सक्तीची खुषी दर्शविली.

अडली गाय—!

शालीनें ताठर अभिमानानें एक वेळ बाहुलीकडे पाहिलें! कचकड्याची बाहुली ती! नखशिखांत जिवंत सौंदर्य खेळत होतें तिच्या!

शालीनें संमति दिली. बोहल्यासाठीं एक पेटी आणून ठेवण्यांत आली!

अडगळींत पडलेला ठोकळा शोधून काढून बोहल्यावर आणून बसविला!

त्याला नाक, कान, डोळे वगैरे अवयव मात्र होते!

भाऊ आणि मधूनें अंतरपाट धरला!

कुमुदची मायेची नजर बाहुलीवर खिळली!

'बाहुली रडत आहे' असें कुमुदला वाटत होतें!

'ठोकळा' हंसत आहे, असें शालीला वाटत होतें!

लग्नाचीं मङ्गलाष्टकें सुरू झालीं!

'ठोकळ्या'शीं बाहुलीचें लग्न लागलें!

वाजंत्र्यांऐवजीं डब्यांचा गडगडाट झाला.

बाहुलीनें 'हूं किंवा चूं' केलें नाहीं !

निर्जीव भावनारहित बाहुली ती ! 'ठोकळ्या'शीं लग्न लागल्याचें तिला काय सुखदुःख !

आणि सजीव 'बाहुल्या' च्या भावनांना तरी समाजांत काय किंमत आहे ?

मंजुळा आपली 'शिवणकामाची पेटी' शोधींत लग्नस्थळीं आली.

तिच्या पेटीवर 'ठोकळा' सपत्नीक ऐटींत विराजमान झाला होता !

चिमणीं वऱ्हाडी मंडळी 'पानसुपारी' वाटण्यांत दंग होतीं !

"इश्श ! हें रे काय कार्ट्यांनो !"

तिनें हातांत छडी घेतली !

"ठोकळ्याचं लग्न !" कुणी तरी धिटुकल्यानें उत्तर दिलें !

मंजुळेनें एक वेळ त्या 'ठोकळ्या'कडे व एक वेळ 'बाहुली'कडे आळीपाळीनें पाहिलें ! कां कुणास ठाऊक ! छडी हातांतून गळून पडली ! डोळ्यांतून 'टप्कन्' दोन अश्रुबिंदु ओघळले !

'बाहुलीचें 'ठोकळ्या'शीं लग्न !'

तिच्या कानांत तेच तेच शब्द घुमूं लागले !

ती तशीच मागल्या पावलीं परतली !!

---

प्रगति, २० ऑगस्ट १९३१

[illegible] ९५९८ [illegible]

# ७

# फोनोवर फिर्याद !

रस्त्याच्या बाजूलाच लांबवर पसरलेली एक भव्य चारमजली चाळ होती ती.

नाना पंथांच्या आणि विविध व्यासंगांच्या लोकांनीं जरी ती गजबजलेली दिसे, तरी मध्यम वर्गाच्या कंपूशाहीनें वरील मजल्यांची मिरासदारी आपल्याकडेच राखून ठेवली होती.

चाळींत राहणाऱ्या मध्यम वर्गाचें वैभव तें काय असावयाचें? तथापि कित्येक व्यक्तींना आपलें श्रेष्ठत्व दर्शविण्याची जन्मजात खोड असतेच !

आणि आमच्या चाळींतील भगवंतराव व भवानराव या शेजाऱ्यांत हें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याची जोराची अहमहमिका लागली होती.

भगवंतराव व भवानराव जवळ जवळ सारख्याच वयाचे; शिवाय योगायोग असा कीं, दोघांनाहीं सारख्याच वयाचा एक एक मुलगा होता !

## फोनोवर फिर्याद !

भगवंतरावांनीं एके दिवशीं आपल्या ' छोट्या ' साठीं एक हातगाडी (बाबागाडी) खरेदी केली व चार वर्षांच्या छोट्याला त्या गाडींत बसवून भवानरावांच्या दारावरून उभयतां पतिपत्नी ती ढकलगाडी ढकलीत मोठ्या दिमाखानें निघून गेलीं !

भवानरावाच्या सौभाग्यवतीनें भगवंतरावाचें तें नवें वैभव पाहतांच अंग झटकल्यासारखें केलें व भवानराव घरीं येतांच त्यांस त्या एकूण प्रकाराचा साद्यंत ' रिपोर्ट ' दिला !

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं भवानरावनें घरीं येतांना त्यांच्या 'गोट्या' साठीं एक तीन चाकी पायगाडी खरेदी करून ती गोट्यासह आमच्या अडीच फुटांच्या गॅलरींत सोडून दिली ! आणि भगवंतराव व भवानराव यांच्या वैभवाच्या चुरशीमध्यें आमच्या मुलांमाणसांना त्या तीनचाकीचा प्रसाद मिळूं लागला ! एका आठवड्यांत सात मुलांच्या पायांना चेंगरून व चार स्त्रियांचीं पातळें फाडून भवानरावांच्या गोट्यानें आपल्या वैभवाची ध्वजा फडकाविली !

भगवंतराव आपल्याला हार जात नाहीं असें पाहून एके दिवशीं भवानरावनें डबल रीडची एक उंची बाजाची पेटी आणली व दुसऱ्या दिवसापासून आमच्या मजल्यावर ' सारीगम 'चा धूमधडाका उडाला !

एक वेळ हा नवा उपद्रव सहनशक्ति कसोटीला लावून आपण सहन करूं शकूं; परंतु भवानरावच्यावर मात करण्यास भगवंतराव कोणतें नवें हत्यार उपसणार याबद्दल आम्ही हवालदील होऊन विचार करूं लागलों ! परंतु आम्हांस फार दिवस विचारांत पडावें लागलें नाहीं. पहिल्या तारखेच्या सायंकाळीं आम्हीं दमूनभागून आपापल्या खोलींत पडलों असतां भगवंतरावाच्या खोलींतून ' सुनो सुनो 'चे ध्वनि उमटूं लागले.

भगवंतरावाच्या फोनोवर निर्बंध घालणें कोणालाच शक्य नसल्यामुळें रात्रीं-बेरात्रीं 'सुनो सुनो' म्हणून शांता आपटे किंचाळूं लागे! रात्रीचे अकरा वाजले तरी 'धर्मवीरां'तील माळीण '**घ्या हो घ्या हो, घ्या हो कुणीं माझीं, फुलें ताजीं**—' म्हणून ओरडत येई अगर '**फुटो हें मस्तक तुटो हें शरीर**' या अभंगाची खड्या आवाजांत सुरवात होऊन 'विठ्ठल, विठ्ठल'च्या गजरांत चाळीचें 'पंढरपूर' होऊन जाई!

भवानराव याच वेळीं गोव्याला पेटीवर बसवून फोनोवर विजय मिळविण्याच्या इरेस पेटून पेटीचे सर्व सूर सुरू करीत आणि या वैभवाच्या कोंडमाऱ्यांत आम्हां शेजाऱ्यांच्या झोंपेचें आणि स्वास्थ्याचें पूर्ण खोबरें होई!

अगदीं याच सुमाराला भवानरावचा छोट्या आजारी पडला.

भगवंतरावला आतां फोनोशीं सामना देण्यास शत्रु उरला नाहीं हें पाहून अधिकच चेव आला व त्यांचा फोनो काळ-वेळ न जुमानतां नव्या जोमानें किंचाळूं लागला!

भवानराव भगवंतरावांवर मनांतल्या मनांत खूप जळफळत; परंतु त्यांचा फोनो बंद करण्यास काय उपाय योजावा हें त्यांना समजेना! शेजाऱ्यांकडूनही भगवंतरावांना अनेक प्रकारें विनंती करण्यांत आली; परंतु इरेस पेटलेल्या भगवंतरावांनीं तिकडे दुर्लक्ष केलें.

भगवंतरावांचा फोनो सुरू झाला, कीं आजारी गोव्या ओरडत उठे! भवानराव आतां अगदीं चिरडीला आले!

'**फुटो हें मस्तक तुटो हें शरीर**' फोनोंतून ध्वनी उमटले. तावडतोब भवानराव संतापून बाहेर आले व ओरडले :—

**"मोडो हें मशीन फुटोत त्या प्लेटी**
**घेतों हातीं काठी पहा आतां!!"**

ताबडतोब फोनो बंद झाला!

दुसऱ्या दिवशीं भवानरावानें भगवंतराव व त्याचा फोनो यांच्यावर फिर्याद गुदरली!

सायंकाळच्या एका दैनिकांत या फिर्यादीसंबंधीं खालील मजकूर प्रसिद्ध झाला.

## 'फोनोवर फिर्याद'

येथील कोर्टांत एक विचित्र खटला दाखल करण्यांत आला असून फिर्यादीचें म्हणणें ऐकून मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं आरोपी व त्याचा फोनो यांच्या-वर 'समन्सें' काढलीं आहेत.

खटल्याची सुनावणी तारीख × × रोजीं असून अनेक दृष्टया ह्या खटल्याला महत्त्व येणार आहे; फिर्यादी यांचें म्हणणें असें आहे कीं, 'एका बाजूनें सरकार Silence Zone सारख्या उपायांनीं जनतेला शांतता मिळवून देण्याचे प्रयत्न करीत असतां दुसऱ्या बाजूनें खुद्द मध्य-वस्तींतच फोनो व रेडिओसारख्या शांतताभंग करणाऱ्या साधनांचा भयंकर उपद्रव होत आहे! सदर वाद्यें आगगाडींतून नेतांना त्यांचें माणसाप्रमाणेंच तिकिट काढावें लागत असल्यामुळें प्रस्तुत खटल्यांतील फोनोवरही समन्स बजावण्याची परवानगी असावी,' वगैरे.

वरील विचित्र खटल्यानें जिकडे तिकडे भयंकर खळबळ उडाली.

भगवंतरावांनीं एका निष्णात कायदेपंडिताची योजना करून खटला लढविण्यास कमर कसली.

अखेर फिर्यादीचा दिवस उजाडला.

कोर्टांत हॉटेलचे मालक, पानपट्टीवाले, सलूनवाले आणि इतर नाना तऱ्हेच्या तमासगिरांची झिम्मड उडाली.

भवानराव गोड्यासह व भगवंतराव आपल्या फोनोसह कोर्टांत हजर होतांच त्यांना पाहण्यासाठीं लोकांची खेंचाखेंची सुरू झाली. अखेर पोलिसांनीं अर्ध्या गर्दीला कोर्टाबाहेर हटवीत नेलें.

भवानरावच्या वकिलानें थोडक्यांत भवानरावची जबानी घेऊन कोर्टाच्या निदर्शनास असें आणून दिलें कीं, फिर्यादीचा मुलगा आजारी असतांही आरोपीनें हेतुपुरस्सर रात्रीं-अपरात्रीं आपला फोनो वाजवून फिर्यादीचें भयंकर नुकसान केलें आहे. शिवायं आरोपीच्या वर्तनानें सार्वजनिक शांततेचाही भंग होत आहे, वगैरे वगैरे.

त्यावर भगवंतरावांच्या वकिलानें असें स्पष्टीकरण केलें कीं, आरोपीला आपल्या मालकीच्या खोलींत वाटेल तें वाद्य वाजविण्याचा पूर्ण अधिकार आहे. हा अधिकार हिरावून घेणारा कायदा अजून अस्तित्वांत आलेला नाहीं. फिर्यादी व आरोपी यांचे खाजगी संबंध शत्रुत्वाचे आहेत. फिर्यादी यानें 'फोनो'सारख्या यंत्रावर फिर्याद करून आपला मेंदू बिघडल्याचें सिद्ध करून दिलें आहे. सबब त्यावर विश्वासून आरोपीला शिक्षेला पात्र ठरविणें अन्यायाचें होईल, वगैरे.

त्यांचें भाषण संपतांच मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं फोनो लावण्याचा हुकूम केला व कोर्टांत संगीत सुरू झालें. अखेर मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं दोन्ही बाजू ऐकून खालील निर्णय दिला.

"असा विचित्र खटला मजपुढें प्रथमच येत आहे. वेळीं-अवेळीं फोनो लावणें व विशेषतः आजारी माणसाला उपद्रव देण्याच्या हेतूनें त्याचा उपयोग करणें हें माणुसकीला सोडून आहे. यावर आरोपींचें असें म्हणणें आहे काय कीं इस्पितळांत फोनो ज्या हेतूनें लावतात, त्याच हेतूनें तोही फिर्यादीच्या मुलाच्या करमणुकीसाठीं तो लावीत असे! परंतु तसें सांगण्यांत आलें नाहीं व आलें असतें, तरी त्यावर मीं विश्वास ठेवला नसता! सदर गुन्हा कायद्याच्या कक्षेत येत नाहीं ही गोष्ट खरी आहे व म्हणून या विचित्र फिर्यादीचा निकालही विचित्रच दिला पाहिजे.

"आरोपीचा फोनो व सर्व रेकॉर्ड्स् मी फिर्यादीला त्याच्या नुकसान-भरपाईबद्दल नजर करीत आहे!"

भवानराव विजयोन्मादानें भगवंतरावाच्या फोनो व रेकॉर्ड्स् घेऊन घरीं आले!

दुसऱ्या दिवशीं पाहांटे 'सुनो सुनो'चे स्वर कोठें निघतात म्हणून आम्ही आश्चर्यानें बाहेर आलों!

—ते भवानरावच्या घरांतून निघत होते!!!

# ८

# निराशेंतील समाधान!

त्याची झरझर चालणारी लेखणी क्षणमात्र थबकली!

त्यानें आपल्या पिंजारलेल्या केंसांवरून हात फिरविला.

कथानकांतील कल्पना त्याची त्यालाच चमत्कारिक वाटूं लागली! एकाच व्यवसायाची आवड असलेल्या तरुण-तरुणींचें वैवाहिक आयुष्य चितारण्यांत त्याची एवढा वेळ गुंतलेली लेखणी, त्यांच्या सुखाचें एकांगी गोड चित्र रंगवितांना एकाकीं स्तब्ध झाली! 'एकाच व्यवसायाचीं माणसें परस्परांच्या कलेंतील गुणावगुणांची चिकित्सा कशावरून करणार नाहींत?' हा विचार विद्युल्लतेच्या वेगानें त्याच्या डोक्यांत चमकून गेला! 'आणि अशी चिकित्सा होऊं लागली तर त्या उभयतांत वैमनस्य उत्पन्न होणार नाहीं का?' त्याचें विचारचक्र उलट दिशेनें सुरू झालें!

लिहिलेला मजकूर खोडून टाकण्यासाठीं त्यानें दौतींत लेखणी बुडविली.

"इश्श ! हें काय लक्षण ?" तोंडाला पदर लावून ती मिस्किलपणें हंसूं लागली !

त्यानें चमकून वर पाहिलें ! भ्रूकुटि किंचित् वक्र झाल्या ! त्यानें प्रश्नार्थक मुद्रेनें तिजकडे दृष्टि रोंखली.

"लेखणी कशांत बुडविली, आहे का भान ?" तिनें हंसत टोमणा मारला.

"कशांत ?"

त्याला आपल्या अभिष्टपणाचें हंसूं आलें ! चहांत लेखणी बुडविल्यामुळें चहाला निळसर हिरवा रंग प्राप्त झाला होता !

"सांगून तरी ठेवावयाचा कप ?" त्यानें आपली बाजू सांवरण्याचा प्रयत्न केला !

"आपणच बजावलं होतं ना, कीं लिहीत असतां मध्येंच कांहीं बोलायचं नाहीं म्हणून ?"

त्याला ती गोष्ट पटली. तिच्या पाणीदार नेत्रांकडे त्याची दृष्टि खिळून राहिली ! त्यांत मूर्तिमंत प्रेमळपणा भरलेला दिसून येत होता ! तिचें लावण्य म्हणजे जिवंत काव्य होतें ! परंतु त्यानें लिहिलेल्या गोष्टी व कविता यांचें कोडकौतुक करण्याइतकी ती सुशिक्षित नव्हती ! लेखनकला आकलन करण्याइतका तिच्या बुद्धीचा विकास झालेला नव्हता ! आणि म्हणूनच त्या बाबतींत तो उदासीन असे !

तिनें पुढें येऊन चहाचा कप उचलला. झटकन् माजघरांत जाऊन दुसरा कप आणून टेबलावर ठेविला. तो तिच्या हालचालीकडे कुतूहल-प्रेरित नजरेनें पाहात होता. त्याच्या विषयीं ती दाखवीत असलेला आदर पाहून त्याच्या अंतःकरणांत गोड, अननुभूत ऊर्मि उठत होत्या !

—पण त्याला तिच्याविषयीं प्रेम वाटत नव्हतें !

त्यानें इतस्ततः पसरलेले लिखाणाचे कागद एकत्र केले. एक एक कागद पुनश्च वाचला आणि ते चट्सारे फाडून खिडकीवाटे भिरकावून दिले !

ती शून्य दृष्टीनें त्याच्या या कृतीकडे पाहात होती. तिचा चेहरा कोमेजला ! डोळे आसवांनीं गप्‌कन् भरून आले !

"राग आला वाटतं ?" तिनें कांहींसें भीतभीत विचारलें.

"त्याचें अंतःकरण सद्गदित झालें !"

"कां म्हणून ? राग येण्याचं कारण ?" त्यानें तिचें संशयनिरसन करण्याच्या उद्देशानें विचारलें.

"मग सारे कागद फाडून टाकले ते ?" तिनें शंका व्यक्त केली.

तो किंचित् हंसला ! त्याचें कारण तिला समजावून सांगून थोडेंच कळणार होतें ?

"मग त्यावर हें औषध वाटतं ?" असें म्हणून त्यानें चहाचा कप तोंडाला लाविला.

तिचा चेहरा पुनश्च उमलला! पाऊसाची सर ओसरल्यावर सूर्याचीं सोनेरी किरणें फाकावीं असा भास झाला!

*　　　*　　　*　　　*

तो नुकताच ऑफिसमधून घरीं आला होता. हात पाय धुवून तिनें आणून दिलेला चहाचा कप त्यानें रिकामा केला.

"आपल्या नांवावर एक मासिकाचा अंक आला आहे."

ती लगबगीनें आंत गेली. कपाटांत जपून ठेवलेला अंक तिनें त्याच्या हातीं दिला.

लेखकाच्या अधीरतेनें त्यानें वरचें 'रॅपर' फाडलें!

त्याचें कथानक ठळक स्थळीं चमकत होतें.

ती कौतुकानें त्याच्याकडे पाहात टेबलालगत उभी होती.

आपल्या कथानकाचें पान उघडून त्यानें तिच्या हातीं अंक वाचावयास दिला. त्याची इच्छा म्हणून ती उल्हसित मुद्रेनें चटईवर बसून कथानक वाचूं लागली.

"इथं खुर्चीवर बस ना!"

"इश्श! कुणी पाहिलं तर?"

तिची शालीनता प्रगट झाली! परंतु त्याला क्विनाइनचा 'डोस' पोटांत गेल्याचा भास झाला!

तिनें हळूहळू कथानक संपविलें; परंतु त्यापासून तिला सात्त्विक आनंद झाला नाहीं! त्याचें नांव मात्र तिनें दोनतीन वेळां वाचलें!

तो तिच्याकडे आशाळभूत नजरेनें पाहात होता! आपलें कथानक वाचून तिला सानंदाभिमान वाटेल ही त्याची अपेक्षा फोल ठरली! त्याच्या नित्याच्या कटु अनुभवाप्रमाणें आजही तिनें कोणतेंच मत प्रगट केलें नाहीं!

तिनें त्याच्या हातांत अंक आणून दिला.

"सबंध रात्र जागून लिहिली ती हीच गोष्ट ना?"

"होय."

"अशानें आजारी पडलां तर मासिककर्ते येतील का काळजी घ्यायला?"

तिच्या प्रश्नांत अकृत्रिम जिव्हाळा भरला होता!

त्यानें कलेच्या उपासनेसाठीं सारी रात्र जागून काढली होती. मासिककर्त्यांसाठीं नव्हे हें तिला पटवून देणें त्याच्या शक्तीबाहेरचें होतें!

"तूं फुलासारखी जपायला तयार असतां इतरांच्या सहानुभूतीची आवश्यकता काय?"

त्याच्या अंत:करणांतील विचारांचा तो पडसाद होता! त्याच्या दृष्टींत जिवंत समाधान दिसत होतें! आपली पत्नी आपल्या महत्त्वाकांक्षे-प्रमाणें आपल्या कलेचें कोडकौतुक करण्याइतकी सुशिक्षित नाहीं या गोष्टीची त्याला किंचित् काल गाढ विस्मृति पडली! त्याची स्निग्ध दृष्टि तिच्या पवित्र तेजस्वी नजरेशीं समरस झाली!

"कधीं कधीं निराशेंतही समाधान मिळूं शकतं तर!" तो स्वत:शीं पुटपुटला!

---

विविधवृत्त, २३ ऑगष्ट १९३१.

# ९

# राजाभाऊंचा राजिनामा !

हेडक्लार्क राजाभाऊंनीं ऑफिसांत पाऊल ठेवतांच महादू पट्टेवाल्यानें आपल्या मोडक्या खुर्चीवरून उठण्याचा आविर्भाव केला व उजवा हात अर्धवट वर उचलून रामभाऊंना 'रामराम' करण्याचा आपला प्रामाणिक हेतु दर्शविला.

रामभाऊंच्या हातांतील 'पेपरा'कडे लक्ष जातांच महादूनें स्वतःशींच किंचित् स्मित केलें व डाव्या हाताच्या खुर्चीवर आंकडेमोड करीत बसलेल्या नाडकर्ण्याला डोळ्यानें खूण केली.

राजाभाऊंच्या हातांतील वृत्तपत्रानें क्षणभर ऑफिसच्या चिमण्या जगांत खळबळ उडवून दिली ! कारण राजाभाऊंच्या वीस वर्षांच्या नोकरींत त्यांनीं विकत घेतलेलें तें पहिलेंच मराठी दैनिक होतें.

"राजाभाऊ तो आतां हेडक्लार्क झयाला, तवा ते छापा घेवते; आतां तो रुबाब वधारला कीं नाय !" बनातवाल्यानें नाकांत तपकिरीची

चिमूट कोंबली व डबी नाडकर्णीपुढें करीत ओठे मिचकावीत हलक्या आवाजांत म्हटलें.

"बट्ट व्हाई शुड वुई पास सच्च रिमार्कस्?" बनातवाल्याच्या समोरच्या खुर्चीवरील अय्यर टाइपिस्टनें नापसंतीदर्शक उद्गार काढले आणि आपल्या टाइपरायटरवर--जणूं निषेधप्रदर्शक--तो अधिकच जोरजोरानें 'टप् टप' बोटें मारूं लागला.

गेल्या दोन महिन्यांत राजाभाऊंत आंतून-बाहेरून क्रान्ति घडून आली होती.

ऑफिसचे जुने हेडक्लार्क सेवानिवृत्त झाले होते व त्यांच्या गादीचे दुसरे वारसदार मूळव्याधीच्या विकारानें इस्पितळांत पडून राहिले होते. अर्थात् राजाभाऊंचे ग्रह एवढे उच्च असल्यावर त्यांच्या आंगावर हेड-क्लार्कच्या वस्त्रें चढावयास कितीसा वेळ लागणार ?

या दोन महिन्यांत राजाभाऊंनीं आपल्या तारुण्याची बदनामी करूं पाहणाऱ्या पिकूं घातलेल्या मिशांना कायमची रजा दिली व धोतराऐवजीं ते पूर्ण बुटसुटांत वावरूं लागले.

राजाभाऊंनीं पत्नीला ' व्हॅनिटी पर्स ' घेऊन दिली व मुलांचें खिल्लार मागें ठेवून उभयतां पतिपत्नी चौपाटी रेक्लमेशनवर व महालक्ष्मी बॅटरीवर फिरतांना दिसूं लागलीं.

राजाभाऊ आपल्या उच्चासनावर जाऊन बसले त्यांनीं कोट काढून ठराविक ठिकाणीं अडकविला व हातांतील वृत्तपत्र टेबलाच्या खणांत ठेविलें.

राजाभाऊंनीं कागद-पेन्सिल घेतली व टेबलाच्या खणांतील वृत्त-पत्राकडे पाहून कांहीं आडव्या–उभ्या चौकटी मांडल्या.

फाइल शोधण्याच्या निमित्तानें प्रधाननें हळूच राजाभाऊंच्या टेबलाशीं लगट केली व दृष्टि उंचावून खणांतलि वृत्तपत्राकडे पाहण्याचा प्रयत्न केला; परंतु तो सफल होण्यापूर्वीच राजाभाऊंनीं खाडकन् खण बंद करून घेतला व प्रधानाकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून ते पूर्ववत् आपल्या व्यवसायांत गढून गेले.

प्रधान चुरमुरे खात जागेवर येऊन बसतांच बनातवाल्यानें मिस्किल-पणें विचारलं "काय छक्का पंजा हाय काय छापामंदी ?"

प्रधाननें बनातवाल्याला डोळ्यानें दाबलें.

साहेबांची 'बेल' खणखणतांच महादू लगबगीनें आंत गेला व बाहेर येऊन राजाभाऊंच्या 'पेपरा'चें दर्शन घेण्याच्या पावित्र्यांत उभा राहून म्हणाला, "साहेब बोलावत्यात शेट."

"बरं येतों" असें म्हणून रामभाऊ पुन्हा त्या चौकटींत आंकडे भरूं लागले.

पांच मिनिटें गेलीं आणि साहेबाची बेल पुन्हा खणखणली.

महादू आंत गेला व विंचू डसल्यासारखा तडफडत बाहेर आला.

"साहेब लय गरम झाल्यात शेट–चला लौकर !" महादू म्हणाला.

"अच्छा, अच्छा ! जाव, येत नाहीं म्हणावं !" हेडक्लार्क गरजले. महादू हिरमुसल्या चेहऱ्यानें जागेवर जाऊन बसला.

नाडकर्णी आणि मंडळींनें भेदरल्या दृष्टीनें राजाभाऊकडे नजर टाकली व आपल्या कामांत गढून गेल्याचें दाखविलें.

'कर्ऽऽ' चेंबरचा दरवाजा वाजला व साहेबांनीं स्वतः डोकें बाहेर काढून म्हटलें, "आय से राजाभाऊ, आय् वाँट यू."

राजाभाऊ चरफडत उठले आणि साहेबाच्या मागोमाग चेंबरमध्यें शिरले. साहेबानें आपल्याला मिस्टरही न म्हणतां अपमानकारक एकेरी नांवानें हाक मारावी या गोष्टीची त्यांना भयंकर चीड आली.

आंत साहेबाचा आणि राजाभाऊंचा खटका उडाला होता आणि बाहेर राजाभाऊंच्या चमत्कारिक वर्तनानें आश्चर्यचकित झालेली कारकून् मंडळी कान टवकारून जेवढें ऐकतां येईल तेवढ्यावर तर्ककुतर्क रचीत होती..

अखेर संतापलेले राजाभाऊ बाहेर येत कडकडले, " आय् डोंट वाँट युवर सर्व्हिस; आय् विल् अर्न थर्टी थाउजंड रुपीज वुइदिन ए विक" (मला तुमच्या नोकरीची पर्वा नाहीं—मी एका आठवड्यांत तीस हजार रुपये कमावीन.)

राजाभाऊंनीं राजिनामा खरडला व साहेबाकडे पाठविला.

राजाभाऊंच्या वर्तनानें साहेब सर्द झाला. वीस वर्षांच्या आपल्या नोकरीवर पाणी सोडण्यास तयार झालेल्या या माणसाचें डोकें खास ताळ्यावर नसावें अशी साहेबाची खात्री झाली. त्यानें बाहेर येऊन राजाभाऊची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु राजाभाऊनें दाद दिली नाहीं! हट्टास पेटलेल्या राजाभाऊला राजिनाम्याच्या भयंकर विचारापासून

परावृत्त करण्याची सर्वांनीं बरीच खटपट केली ! परंतु एक आठवड्यांत तीस हजार रुपये सहज कमावण्यास निघालेले राजाभाऊ आपला निश्चय सोडण्यास तयार होईनात !

आणि सर्वांना आश्चर्यचकित करून खरोखरीच राजाभाऊ नोकरी सोडून ऑफिसबाहेर पडले !

दुसऱ्या दिवशीं राजाभाऊंनीं आपल्या बिऱ्हाडाशेजारीं एक जादा खोली भाड्यानें घेतली व दरवाजे लावून ते आपल्या नव्या व्यवसायांत दंग झाले.

राजाभाऊंनीं आपल्या एकशें सत्तर रुपये पगाराच्या नोकरीवर लाथ मारल्याची विलक्षण बातमी हळूहळू त्यांच्या मित्र आणि आप्तेष्टमंडळींत वाऱ्यासारखी पसरली. आणि जो-तो त्यांच्या समाचारास येऊं लागला.

राजाभाऊंनीं या नव्या संकटाला तोंड देण्यासाठीं आपल्या स्पेशल रूमच्या बाहेर खालील पाटी लटकाविली :—

'मेहेरबानी करून कोणी त्रास देऊं नये. भेटण्याची सक्त मनाई आहे. दुसऱ्याच्या बाबतींत ढवळाढवळ करणें हा गुन्हा आहे.'

वरील प्रकारानें राजाभाऊंचें वेड बळावल्याची त्यांच्या पत्नीचीही खात्री झाली व तिनें आपल्या माहेरीं तार करून बंधुराजांना तातडीनें बोलाविलें.

आठवड्यानंतरची गोष्ट.

राजाभाऊंच्या वेडाचा विचार करण्यासाठीं त्यांचे शालक व इतर मित्रमंडळींची बैठक बसली होती. रात्रीचा अकराचा सुमार होता. इत-

क्यांत राजाभाऊंच्या स्पेशल खोलीचा दरवाजा खाडकन् उघडला गेला व राजाभाऊ धांवतच बाहेर येऊन आपल्या झोंपलेल्या पत्नीला जागे करीत ओरडले " सुटलें, सुटलें, सुटलें ! ! "

त्यांची पत्नी किंचाळत उठली !

हळूहळू सर्व मंडळी जमा झाली व राजाभाऊंना त्यांच्या स्पेशल रूममध्यें कोंडून ठेवण्यांत आलें !

दुसऱ्या दिवसापासून राजाभाऊंचें वेड उतरलेलें आढळून आलें. त्यांनीं एक जाडजूड पाकिट एक रुपयाच्या मनिऑर्डरीसह कोठें तरी गुप्त-पणें पाठविलें.

आतां ते मंडळींत बसूं उठूं लागले. आपण या आठवड्यांत एक धंदा केला असून लवकरच आपल्याला तीस हजार रुपयांचा चेक येणार आहे असें ते प्रत्येकाला सांगत असत.

हळूहळू पंधरावडा लोटून गेला.

आज पोस्टमन् त्यांच्या दाराशीं थांबतांच राजाभाऊ जेवतांना अर्ध-वट पान सोडून बाहेर आले.

पोस्टमननें टाकलेलें आपल्या नांवाचें पाकिट त्यांनीं अधाशीपणानें फोडलें. आंत चेकच्या ऐवजीं लहानसें पत्रक असलेलें पाहून राजाभाऊंनीं निराशेनें पत्रांतील मजकुरावर दृष्टि फिरविली व रागानें पत्र भिरकावून

देऊन ते इञ्जिचेअरवर आडवे झाले ! राजाभाऊंच्या पत्नीनें सचिंत मुद्रेनें पत्र उचलून तें भरभर वाचून काढलें. पत्रांत खालील मजकूर होता :—

**" ३०,००० रुपयांच्या चढाओढीचा निकाल ! सोबत पाठविलेल्या चढाओढींत पुन्हां भाग घ्या !**

कृतानेक सा. न. वि. वि.

आपण पाठविलेलें कोड्याचें उत्तर आमच्या सीलबंद उत्तराशीं न जुळल्यामुळें आपल्याला निराश व्हावें लागणार याबद्दल आम्हीं दिलगीर आहों.

चालू चढाओढींत ज्यांनीं भाग घेतला व ज्यांचीं उत्तरें साधारण बरोबर आहेत, त्यांना बक्षिसांच्या कमी केलेल्या रकमेनुसार एक रुपया चार आण्यांची मनिऑर्डर करण्यांत आली असून त्याप्रमाणें ही सवलत आपल्याला मिळाली आहे. तरी एक रुपया चार आण्यांचा स्वीकार करावा, कळावें.

**अजितसिंह धर्मसिंह**

रॉयल ब्युरो कॉंपिटिशन्स, दिल्ली. "

राजाभाऊंना न सुटलेलें कोडें त्यांच्या पत्नीला मात्र तावडतोब सुटलें ! !

विविधवृत्त २३ मे १९३७

# १०

# मावळती तारा!

*'Facts are stranger than Fiction!'*

**' स्वातन्त्र्य जिथें**
**शान्ति तिथें**
**प्रेम इमानी !**
**तेथें चल राणी !'**

माधव ज्यूलियनांच्या कवितेचे वरील चरण गुणगुणत गुणानाथनें ताराच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला.

यशोदाबाई—ताराची आई—आणि ताराचा भाऊ विभाकर शेजाऱ्याच्या एक दोन स्नेह्यांसह 'केरम' मांडून बसलीं होतीं. गुणानाथनें प्रवेश करतांच त्याला जवळच्याच खुर्चीवर उत्थापन देण्यांत आलें.

" कस काय कविराज, आज कोणतं काव्य प्रसवलं आहे ?" विभाकरनें थट्टेच्या स्वरांत गुणानाथला प्रश्नाळलें.

" कवि म्हणजे ठराविक मुदतींत जन्म देणारी हिंदुसमाजांतील माता नव्हे !" गुणानाथनें टोमणा मारला !

" होय खरंच ! दीड वर्षाचा अन् दोन वर्षांचा 'पाळणा' त्यांना लागत नाहीं ! स्फूर्तिदेवता आज्ञापील तेव्हांच कवि काव्याला जन्म देत असतात !" तारेनें प्रासंगिक विनोद केला.

" पोरीच्या जातीला हा विनोद शोभत नाहीं !" यशोदाबाई रागांत उद्गारल्या ! त्यांच्या रागाचा पारा चढण्याचें कारण त्यांनीं 'क्वीन' वर धरलेला नेम चुकून त्यामुळें विरुद्ध पक्षाच्या दोन सोंगट्या आपोआप आंत जाऊन पडल्या हें होय !

" स्पष्टवक्तेपणा हा गुन्हा असेल तर ताराच्या हातून गुन्हा घडला खरा !" गुणानाथ गंभीर स्वरांत म्हणाला ! आपली रागीट मुद्रा झांकली जावी म्हणून त्यानें जवळच्या टेबलावरचें एक पुस्तक घेऊन तोंडापुढें धरलें.

खेळ संपला. शेजारची मंडळी निघून गेली. यशोदाबाईनीं बिछान्यावर अंग टाकलें.

" ऐकलं का गुणानाथ, आमच्या कुसाताईच्या विमलचं लग्न जुळतंय्"

" कुठंशीं बुवा ? कोणतं स्थळ हेरलंय ?" जगांत प्रत्यहीं घडणारी एक क्षुल्लक गोष्ट घडणार, अशाच बेफिकीरपणें गुणानाथनें विचारलें.

" त्या कामतांच्या चाळींतील देशपांडे. मुलगा जरा डोळ्यानें अधु आहे अन् नोकरीही कुठें छापखान्यांत लहानशी आहे म्हणे ! पण स्थळ बरं आहे हो ! "

" छे ! छे ! थोडी घाई करताहेत तुमच्या कुमाताई ! एकूण तें स्थळ अगदींच टाकाऊ आहे माझ्या मतें ! " गुणानाथानें सहजोद्गार काढले !

" हो वाईट कशानें ? मीसुद्धां असाच एकादा गरीबसा मुलगा पाहून आमच्या ताराला पुढच्या वर्षी उजवून टाकणार आहें ! "

यशोदाबाईनीं डोक्यावरचें ओझें उतरून टाकण्यापूर्वीची प्रस्तावना केली !

गुणानाथच्या हातांतील पुस्तक नेमकें ताराच्या मांडीवर पडलें ! दोघांची दृष्टिभेट झाली ! ताराचे डोळे डबडबले होते ! तिनें अस्ताव्यस्त झालेलें पुस्तक मिटून गुणानाथाच्या हातांत दिलें ! तिनें लुगड्याची घडी डोकीवरून गुरफटून घेतली आणि उशींत डोकें खुपसून तीं मूक रुदन करूं लागली !

तारा रडत आहे ही गोष्ट गुणानाथला माहीत होती, ती कां रडत आहे याचीहि कठोर जाणीव त्याला होती ! परंतु ती कां रडत आहे हा प्रश्न उघडपणें त्याला विचारतां येणें शक्य नव्हतें !

" म्हणजे, ताराचें शिक्षण बंद करणार का ? " आशेचा शेवटचा धागा घट्ट करण्याचा त्यानें प्रयत्न केला !

" मग किती दिवस शिकवणार आतां ? " यशोदाबाई उद्गारल्या.

"मी म्हणतों—" गुणानाथ अडखळला ! 'तुला म्हणण्याचा अधिकार काय ?' हा प्रश्न त्याला कोणीतरी अदृश्य व्यक्ति आंतून बाहेरून विचारीत होती ! "मी म्हणतों तारानें एवढें हें मॅट्रिकचें वर्ष पुरें केलें तर नाहीं का चालणार ?" त्यानें कसें तरी वाक्य पुरें केलें !

"खर्च झेपत नाहीं आता ! अजून सहा पोरी मागें आहेत ! विभाकरचा पगार तो काय ?" यशोदाबाई विभाकरकडे पाहून म्हणाल्या. आपल्या म्हणण्याला विभाकरचा दुजोरा मिळेल अशी त्यांना आशा होती.

"म्हणून ताराला जन्मभर माझ्या नांवानें रडावयास लावणार आहेस वाटतं ?" माफीचा साक्षीदार उलटला !

"नशीबांत असेल तसंच व्हायचं ! दारूबाज तरुण देखील निर्व्यसनी होतात लग्नानंतर !" यशोदाबाईंनीं जगांतील दहावें आश्चर्य कथन केलें !

("जगाच्या कल्याणासाठींच तुमच्यासारख्या लोकोत्तर विभूति जन्मास येत असाव्या ! 'मुके आंधळे पांगळे आणि थोटे ! अशा वर्दळांना करा साह्य मोठें !' परंतु त्यासाठीं स्वतःच्या सुकुमार कन्यकांचे बळी कां म्हणून ?" गुणानाथच्या तोंडून उद्गार बाहेर पडले !)

"होय ! त्या सर्वांचे संसार थाटण्यासाठींच आमच्या आईनें हिंदु समाजांत जन्म घेतला असावा असें दिसतें !" विभाकरनें गुणानाथला दुजोरा दिला !

"त्याचें कारण उघड आहे ! मुलींना भावना नाहीं; त्यांना आवडनिवड नाहीं, त्यांना त्यांत बरेंवाईट मत देण्याचा अधिकार नाहीं; ही

पूर्वापार कल्पना आमच्या वडील मंडळीच्या अंतःकरणांतून अजून नाहींशी झाली नाहीं! आणि त्या सैतानी जुलमी रूढीला पायाखालीं तुडविण्याइतकें नैतिक धैर्य अजून आमच्या सुशिक्षित कुमारिकांच्याहि अंगीं आलेलें नाहीं!" गुणानाथच्या तोंडून संतापाच्या भरांत शब्द बाहेर आले!

"सणणऽऽ"

काळाच्या इमानी सेवकानें 'अलार्म' द्वारें सन्ताप व्यक्त केला!

"नवाचा 'अलार्म' लावणारा प्राणी कोण बुवा?" विभाकरनें घड्याळाकडे पहात विषयांतर केलें!

गुणानाथ बाहेर पडण्याच्या उद्देशानें उठला. त्यानें तारेकडे नजर टाकली. लुगड्याची दुलई डोळ्यांवरून किंचित् दुरावून ती भरल्या डोळ्यांनीं त्याच्याकडे पहात होती! जणूं काय पुढें उभें राहिलेल्या संकटां-तून मुक्त करण्यास तो एकटाच समर्थ होता!

गुणानाथचें अंतःकरण भरून आलें!

"निष्पाप सुंदर फुलें जन्मतांच कोमेजून गेलेलीं बरीं! प्रेतांना शृंगारसाज चढविण्यासाठीं ईश्वरानें त्यांचें आयुष्य कां वाढवावें बरें?" तो स्वतःशीं पुटपुटला आणि बाहेर पडला!)

*          *          *          *

"तारे! तूं काल रात्रीं कां रडत होतीस?" गुणानाथचा तो प्रश्न होता.

त्याला तारेकडून उत्तर मिळण्याऐवजीं अश्रूंनीं पुनरागमन करून मूक स्वरांत उत्तर दिलें ! तथापि गुणानाथला अव्यक्त उत्तर नको होतें !

"तारे, तूं रात्रीं कां रडत होतीस ?" त्यानें प्रश्नाचा पुनरुच्चार केला.

"मी काय सांगूं ?"

तिनें तोंड फिरविलें ! लुगड्याच्या पदरानें अश्रूंचे ओहोळ पुसून काढले ! परंतु आंत पेटलेल्या वणव्याचें अस्तित्व हुंदके सिद्ध करून देत होतेच ! गुणानाथच्या हळव्या मनाला ती आंच अधिकाधिक जाचक होत होती !

"तारे ! तूं शिक्षणाची कांस सोडतां कामा नये !" त्यानें निर्वाणीचा उपाय सुचविला.

"मी प्रयत्नाची शिकस्त करणार आहें !" तिनें रडत म्हटलें !

"तारे, कुसाताईच्या विमलची गोष्ट फार निराळी आहे ! शिक्षणाच्या अभावीं तिला बरें वाईट यांतील भावनांची भाषा ओळखण्याचें ज्ञान कमी आहे ! तुझी गोष्ट विमलहून शतपटीनें भिन्न आहे ! तुझ्या बाबतींत निवड फार कसोशीनें झाली पाहिजे !"

"निवड ?"

तारेच्या तोंडून एक हुंदका बाहेर पडला ! आणि तिच्या अश्रूंच्या ओघांत गुणानाथचें पांडित्य पार वाहून गेलें !

"केवळ रडण्यानें कांहीं होणार नाहीं ! तूं एवढें वर्ष पार पाडून मॅट्रिकला तरी बसून घे !" गुणानाथनें तिचें सांत्वन केलें.

"पण आईनें फीला पैसे दिले पाहिजेत ना?"

"त्याबद्दल काळजी नको! आईला म्हणावें फीच्या पैशाचें माझें मी पाहून घेईन!"

"पण लोक काय म्हणतील?" गुणानाथच्या म्हणण्याचा आशय ओळखून तारानें शंका व्यक्त केली.

"लोकांशीं तुला काय करावयाचें आहे? उद्यां जन्मभर रडत बसण्याची पाळी आली तर लोक तुला सोडवावयाला येणार आहेत का? लोकमताचा बागुलबोवा अशिक्षित लोकांसाठीं आहे!"

"पाहूं काय होतें!" तारा विचार करीत म्हणाली.

"बरं घेऊं रजा?" गुणानाथनें उठण्याचा आविर्भाव आणून विचारलें.

"कां—आतांच तर नऊ होताहेत!" तारेनें घड्याळाकडे पहात म्हटलें.

"मग? इतर व्यवसाय नाहींत का?"

"रविवारचे व्यवसाय कसले? कुणा मित्राकडे जायचें असेल?"

"होय!"

"कोण हे मित्र?" संशयाची एक बारीक रेषा तिच्या चेहऱ्यावर उमटली!

"कां, फारशी चौकशी चालविली आहे आज!"

"सहज–संशय आला म्हणून!" तिनें स्पष्टोक्ति केली.

"ठीक! हें संशयपिशाच्च कोठून आलें आज?"

"तसं नव्हे! म्हटलं आईच्या बोलण्यानें शिंक्याचं सुटून भोक्याला डसायचं एकादं! स्वभावच नाहीं तरी पडला तसा!"

"अशा स्वभावाच्या माणसाचा संबंध कायमचा तुटलेला बरा नव्हे का?"

"पहा ! आलांत ठिकाणावर ! म्हणून काल रात्रीं मी......!"

गुणानाथचें कोडें उलगडलें ! तारा कां रडली त्याची अंधुकपणें जरी त्याला जाणीव होती तरी हट्टी स्वभावाच्या तारेच्या तोंडून त्या गोष्टीचा कबुलीजबाब मिळविणें अतिशय कठीण आहे हें त्याला माहीत होतें !

"माझा संबंध सुटणार म्हणून रडलीस तर?"

"होय!" तिनें अखेर कबुलीजबाब दिला !

* * * *

"पुन्हां एकदां तें गीत बोला बरं!"

ताराची ती आर्जववजा विनंति गुणानाथला मोडवेना !

रात्रीचा दहाचा सुमार होता. विभाकर आईला घेऊन कीर्तनसभासीला गेला होता. मामेभाऊ या नात्यानें गुणानाथनें ताराला सोबत करणें–वा करूं देणें–यशोदाबाईच्या मनाला गैर वाटलें नाहीं.

तारा अंथरुणावर लोळत पडली होती. गुणानाथ 'मूनलाईट' दिव्याच्या प्रकाशांत गडकऱ्यांची 'वाग्वैजयन्ति' घेऊन बसला होता. तो आपलें एक एक आवडतें गीत तारेला ऐकवीत होता. गडकऱ्यांच्या उत्कृष्ट कवितांपैकीं 'पांखरास–' हें हृदयस्पर्शी गीत म्हणून पुरें होतांच तारानें वरील विनंति केली.

गुणानाथ निवडक चरण गाऊं लागला.

"पंख उभारुनि जरा। भरारा। जा जा उडुनी जा पांखरा
निकट तरूच्या शाखेवरतीं बसूं नको खगवरा ॥ पंख ॥
एक एक हा सूर हालवी हृदयाला थरथरा!
हिरवीं पानें निळया नभाचा वर डोल्लारा खरा!
चिर सहवासासाठीं परि मी पसरतांच मम करा
उडुनी जाशिल भुरदिशिं गगनीं खालीं टाकुनि धरा!
मिळतां लघुसुख अधिक सुखास्तव जीव सदा हावरा!
तीव्र निराशा होतां होइल फार किरे घावरा!
ऐकुं न येतां सूर भासमय चिरतिल मग अंतरा!
सहवासानें प्रेम जडाया पूर्वीच पळ कर त्वरा,
हेंच मागणें हात जोडुनी आनंदी पांखरा!"

त्या शांत वेळीं गुणानाथचा आवाज फार खुलला होता! गाणें पुरें होतांच त्यानें विषण्ण मनानें टेबलावर डोकें टेकलें! क्षणभर खोलींत भीषण शांतता पसरली!

"किती हृदयस्पर्शी गीत आहे हें!" तारेनें रुद्ध स्वरांत म्हटलें.

"हुं!"

"एक चरण सोडलात मधला!"

"कोणता बरं?"

"क्षण परिचय हा अशा स्थितीहुन फारच बरवा खरा,
अपूर्व ऐकुनि हर्ष जाहला तोच लाभ मज बरा!"

"मुद्दामच सोडलं तं!"

"कां बरं?"

'कां बरं,' चें उत्तर मिळविण्यापूर्वींच दरवाजा उघडला गेला व त्रिभाकर आईसह आंत आला.

"फार उशीर रखडावं लागलं का गुणनाथ?" यशोदाबाईंनीं पृच्छा केली.

"छे! छे! आतांच अकरा वाजताहेत कुठें!"

"ताराच्या गप्पा सुरू झाल्या कीं वेळाची काय किंमत?" विभाकर हंसत म्हणाला. "खरं आहे तें!" असें म्हणून गुणनाथ बाहेर पडला.

* * * *

"तीळ घ्या गूळ घ्या गोड बोला" तारानें आपला तिळगुळानें भरलेला पसा गुणानाथपुढें करून म्हटलें.

"सङ्क्रांत हालव्याचा घेऊन येई प्याला?
कल्लोळ कल्पनांचा दे क्षोभ भावनेला!
दुःखी चिरस्मृतींनीं शङ्कून भावि काळा
व्याकूळ जीव होई लोपे क्षणीं तजेला!*

* यशवंत.

तारेनें पुढें केलेला 'तिळगुळ' न स्वीकारतां दोन हात जोडून गुणानाथनें वरील चरण आर्त स्वरांत म्हटले!

तारानें खादीचें पांढरें शुभ्र पातळ परिधान केलें होतें. तिच्या हातांत मोत्यांशीं स्पर्धा करणारे पांढरे शुभ्र तिळगुळाचे दाणे होते व त्यांत मधून मधून केशरी दाणे चमचमत होते; यामुळें तिच्या मूळच्या सौंदर्यांत भर पडली होती!

"मग स्वीकारूंच का हा तुझा तिळगुळ?" गुणानाथच्या प्रश्नांत कारुण्य भरलें होतें.

"इश्श! हा काय विलक्षण प्रश्न बाई!" तिनें मानेला एक हिसका देऊन म्हटलें.

"कारण—कारण भेसूर भवितव्यतेचीं काल्पनिक चित्रें या गोड प्रसंगावर सावली पाडीत आहेत असें मला वाटतें! तारे! आपल्या सह-वासांतील प्रत्येक गोड क्षण, आपली भवितव्यनौका दुर्दैवानें उलटल्यास मला विषापेक्षां कटु भासणार; इतकेंच नव्हे तर त्या वंचनेमुळें माझें सारें आयुष्य करपून जाणार आहे! एवढ्याचसाठीं मी तुझ्या स्नेहसंबंधाचे धागे शक्य तों हलक्या हातानें सोडवून मोकळा होत आहें—नव्हे तसा प्रयत्न करीत आहे! अशा वेळीं तू ते धागे अधिकाधिक गुंतागुंतीचे करतांना पाहून माझें हृदय शतशः विदीर्ण होत आहे! तारे! तूं सुशि-क्षित आहेस; अन् म्हणूनच माझें सारें पांडित्य मी तुझ्यापुढें आजवर खर्च केलें! दिव्याचा प्रकाश त्याच्या तळालगतच्या प्राण्यांना दुष्प्राप्य असतो! त्याप्रमाणें तुझा माझा नात्याचा निकट संबंधच आपल्या उभयतांच्या

आयुष्यामध्यें कांटेरी कुंपण घालण्यास कारणीभूत झाला आहे ! मी अधिक काय बोलूं ? भाषेचे बोल अव्यक्त हृदयाच्या बोलांपुढें कवडीमोलाचे आहेत ! तारे ! तुझ्या स्नेहसंबंधाचा एक एक धागा अलग करतांना माझ्या आयुष्याचें मी एक एक वर्ष कमी करीत आहे ! तारे ! माझा जन्म कांहीं तरी विशिष्ट कार्य करण्यासाठीं झाला आहे अशी माझी प्रामाणिक समजूत आहे; व तें कार्य पार पडेपर्यंत मला जीव मुठींत धरून जगणें प्राप्त आहे ! तथापि तुझा विवाहसंबंध एकाद्या मर्कटाशीं जडूं नये ही अनधिकारी इच्छेची टोंचणी मला रात्रंदिवस चैन पडूं देत नाहीं !"

गुणानाथनें धोतराच्या सोग्यानें आपले अश्रु पुसून काढले ! पुरुषासारखा पुरुष, जगाला पांडित्य पढविणारा महाराष्ट्राचा एक खंदा लेखक आज एका अल्पवयी तरुणीपुढें अश्रुविमोचन करीत होता ! तें दुर्मिळ दृश्य चितारण्यास दुर्दैवानें तेथें एकहि जातिवंत चित्रकार किंवा कवि हजर नव्हता !

केवळ तारेच्या हळव्या मनाला यातना होऊं नयेत म्हणून गुणानाथनें दोन हातांची ओंजळ करून तिळगुळ घेतला आणि मस्तकाला लावून टेबलावर ठेवला !

गुणानाथनें तारेकडे वळून हात जोडले व म्हटलें :—

**"सहवासानें प्रेम जडाया पूर्वींच पळ कर त्वरा !**

**हेंच मागणें हात जोडुनी आनंदी पांखरा !!"**

तारेचें अंतःकरण विरघळलें होतें ! ती तशीच डोळे पुशीत गुणानाथच्या खोलीबाहेर निसटली !!

× × × ×

"आतां एल्‌एल्‌. बी. झालास, आतां लग्न कधीं करणार गुणानाथ ?" यशोदाबाईंनीं विचारलें. "एल्‌एल्‌. बी. चा डाग लावून घेतला खरा परंतु लग्नाचा विचार मात्र रद्द केला आहे." गुणानाथनें चहाचा शेवटचा घोट घेऊन कप टेबलावर ठेवीत म्हटलें !

वकिलीची परिक्षा दिली तरी वकिली करण्याची त्याची इच्छा समूळ नष्ट झाली होती. गेल्या दोन तीन वर्षांत त्याच्या आयुष्यांत अनेक महत्वाच्या घडामोडी घडून आल्या होत्या.

तारांचें लग्न अकोल्याच्या एका मध्यम स्थितींतल्या मुलाशीं जुळवून यशोदाबाईंनीं दोन वर्षांपूर्वीच आपल्या डोकीवरलि प्रचंड धोंड दूर केली होती ! लग्न झाल्यापासून तारा गुणानाथला भेटली नव्हती. ताराच्या लग्नाची कुणकुण कानीं येतांच गुणानाथनें विभाकरचा शेजार सोडून सान्ताक्रुझला जागा घेतली होती ! इतकेंच नव्हे तर गुणानाथ कांहीं सबब पुढें करून ताराच्या लग्नालाही हजर राहिला नव्हता !

ताराच्या लग्नानंतर तिचा क्षेम समाचार विभाकर स्वतः होऊन सांगे तेवढ्यावरच गुणानाथ आपली तहान भागवून घेई ! तिच्याविषयीं एक अक्षरही गुणानाथनें विभाकरला विचारलें नव्हतें !

आज दोन वर्षांनंतर प्रथमच गुणानाथनें विभाकरच्या घरीं पाऊल ठेवलें होतें.

पहिल्या बाळंतपणाबरोबरच आजाराला आमंत्रण करून तारा आज प्रत्यक्ष मृत्यूशीं झगडत होती ! कालच तिला अकोल्याहून अत्यवस्थ स्थितींत आणल्याचें विभाकरकडून कळल्यावरून गुणानाथ फत्तराचें अंतःकरण करून तिच्या भेटीसाठीं आला होता !

गुणानाथनें ताराच्या खोलींत प्रवेश केला.

केवळ अस्थिपंजर उरलेला ताराचा देह पलंगावर अचेतन पडला होता ! ताराच्या आजाराची पायरी इतक्यावर गेलेली पाहून गुणानाथचें अंतःकरण चरकलें ! गुणानाथला पाहून तारानें एक समाधानाचें हास्य केलें ! गुणानाथला त्यांत केवढें तरी नैराश्य भरलेलें दिसलें ! पूर्वींचें डोळ्यांतील मोहक तेज आज पार मावळलें होतें !

" अरेरे ! काय ही स्थिति ! " तो अस्पष्ट पुटपुटला.

" आज तरी आठवण झाली म्हणायची ! " तारेनें कसेबसे शब्द उच्चारले !

" आठवण ? आठवणीनेंच हृदय रात्रंदिवस जळत असतांहि तुला भेटणें अशक्य होतें ! पुरुषासारखा पुरुष असूनहि हिंदुसमाजाच्या रूढी-पिशाच्चाला हटविण्याचें मनोधैर्य मला झालें नाहीं ! सहवासानें फोंफावत गेलेली भावलता रूढीच्या वणव्यांत भस्मसात् होणार ही कठोर जाणीव झाल्यावरहि मी प्रत्यक्ष माझ्या स्वार्थाचें बलिदान देण्यास तयार झालों ! परंतु त्यांत तुझी आहुति आज पडतांना पाहून मात्र हृदय पिंजून निघत आहे ! "

गुणानाथ स्तब्ध झाला !

" झालें तें झालें ! आतां मी तर थोड्या दिवसांची सोबतीण आहें ! परंतु तुम्ही मात्र आपल्या बहुमोल आयुष्याचं मातेरं करून घेऊं नये ! हें शेवटचें मागणें मी मागत आहें ! " ताराला दम लागला, यावरून तिची प्रकृति किती काडीतोल झाली आहे त्याची गुणानाथला कल्पना झाली !

" तारे ! तुझी इच्छा सफल होणें आतां माझ्या हातांत राहिलेलें नाहीं ! माझ्यासाठीं एक निष्पाप फूल करपून गेलें, या निष्ठुर जाणिवेनें

माझ्या ऐहिक सुखाला कधींच ओहोटी लागली आहे ! तूं बरी हो. पुनश्च पतिगृहीं आनंदानें नांदूं लाग, मग माझ्या आयुष्याचा प्रश्न मी सोडवीन !" गुणानाथनें पोकळ अभिवचन दिलें.

"गुणानाथ ! मी आज आयुष्याच्या निसरड्या कड्यावर उभी आहें हें मला कळतें ! आपल्या हिंदु समाजांत गोरक्षणाची चळवळ चालू आहे; त्यामुळें अनेक गाईंचे प्राण खाटकांच्या सुऱ्यांपासून वांचविले जात आहेत ! परंतु मानवी गाईंना रूढीच्या कसाईखान्यांत ढकलतांना हिंदु-समाजास दयेचा स्पर्शहि होत नाहीं ! मानवी दीन गाईंना विनासंमति बिनदिक्कत जन्माच्या दावणीला बांधतांना हिंदुसमाज खाटकांनाहि माना खालीं घालावयास लावील ! अशा या समाजांत 'मानवी गोरक्षणाचें' कार्य कधीं सुरू होणार ?"

"तारे ! लाखाचे बोल बोललीस ! तशा प्रयत्नांना उत्तेजन मिळण्यासाठीं प्रत्येक तरुणानें स्वसुखावर तिलांजलि दिली पाहिजे. आणि म्हणूनच आजन्म अविवाहित राहून मी त्या कार्याला हातभार लावणार आहें !"

"ईश्वर तुम्हांला यश देवो !" तारा मनःपूर्वक म्हणाली.

गुणानाथला तेथें अधिक वेळ बसवेना ! त्यानें ताराचा शुष्क हात हातीं घेतला व पुनः लवकरच भेटण्याचें वचन देऊन तिचा निरोप घेतला !

त्याच रात्रीं विभाकरनें सांताक्रूझला टेलिफोन करून गुणानाथला कळविलें कीं त्याची जिवलग तारा मावळली !

---

प्रगति १९३१.

# ११

# नानांची निळी ट्रंक!

नाना त्या निळ्या ट्रंकेकडे किती वेळ तरी न्याहाळून पाहत होते. किती सुंदर आणि नमुनेदार होती ती ट्रंक! तिच्या त्या गर्द निळ्या रंगांत सोनेरी रेषांचे पट्टे अगदीं खुलून दिसत होते. नाना तर त्या ट्रंकेवर निहायत खूष झाले! तथापि कांहीं तरी विचारावयाचें म्हणून ते दुकानदारास म्हणाले,

"काढील का वर्ष-सहा महिने ही ट्रंक?"

बोहर्‍यानें उत्तर देण्यापूर्वी दोन वेळां त्या ट्रंकेची उघडझांप केली व नंतर ती खाडकन् लावून तिच्यावर तो उभा राहिला व दाणदाण् पाय आपटीत म्हणाला, "पाहून घ्या शेट! आख्खी उमर काढील तुमची."

बोहर्‍यानें ट्रंकेच्या मजबुतीची सप्रयोग खात्री पटवून देतांच नानांनीं ती ट्रंक खरेदी करण्याचें ठरविलें तथापि त्या प्रयोगामुळें ट्रंकेच्या पत्र्यांत

कोठें बिघाड झाला असल्यास त्याच नमुन्याची व अगदीं त्याच रंगाची दुसरी ट्रंक घ्यावी असें ठरवून ते म्हणाले,

"अगदीं याच नमुन्याची दुसरी असेल तर दाखवा ना!"

"दुसरी?" बोहरी हंसत म्हणाला, "अहो, हे सॅंपलची दुसरी ट्रंक आख्ख्या इंडियांत नाय मिळेल!"

नानांनीं थोडीफार घासाघीस करून तीन रुपये तेरा आणे बोहऱ्याच्या हातीं ठेवले व व्हिक्टोरिया करून ते घरीं आले.

"काय लग्नाला जायचा बेत दिसतोय्" एक शेजारी परीक्षकाच्या दृष्टीनें ट्रंकेकडे पाहत उद्गारले.

"होय" नानांनीं नाखुषीनें कबुलीजबाब दिला.

"किती, दोन की अडीच?"

असा सन्ताप आला नानांना त्या बेजबाबदारपणें किंमत करणाऱ्या माणसाचा! चांगली सणसणीत श्रीमुखांत ठेऊन द्यावी त्याच्या असेंच वाटलें त्यांना! तथापि शक्य तों राग गिळून थोड्याशा चिडक्या आवाजांत ते म्हणाले,

"असल्या अस्सल पोलादी उंची ट्रंका दोन अन् अडीच रुपयांत मिळत असतील तर आत्तांच देतों तुम्हांला चार ट्रंकांची ऑर्डर!"

यावर गृहस्थमजकुरांनीं सन्मान्य समेटादाखल नुसतें दन्तप्रदर्शन केलें व अधिक चिकित्सा करण्याच्या भानगडींत न पडतां हळूंच आपली खोली गांठली!

नानांच्या सौभाग्यवतीच्या आतेबहिणीच्या मुलीचें लग्न नगरला व्हायचें असून नानांना त्या शुभ प्रसंगीं 'सहकुटुंब सहपरिवारें येऊन कार्यसिद्धि करण्यास' अगत्याचें आमंत्रण होतें. तथापि खर्चाचा एकंदर अंदाज ओळखून नानांनीं प्रथम आपल्या पत्नीच्या हट्टाकडे दुर्लक्ष करण्याचें ठरविलें होतें. 'साहेब रजा देत नाहीं, वर्षअखेर रजा मिळणार नाहीं.' वगैरे सरकारी व बिनसरकारीही सबबी नानांनीं पत्नीच्या तोंडावर फेंकून पाहिल्या! तथापि गेल्या बारा वर्षांत नानांनीं एक दिवसाचीही रजा न घेतल्याची त्यांच्या पत्नीनें त्यांना आठवण करून दिली. आणि नाना न आल्यास आपण स्वतः मुलांना काखोटीला मारून निघून जाण्याचा धाक घातला! अखेर होय नाहीं करतां करतां नानांनीं मोठ्या मिनतवारीनें एक आठवड्याची रजा घेतली व नगरला जायचें निश्चित झालें.

ट्रंक, बिछायती, करंडे, मुलें आणि पत्नी हा सारा सरंजाम सांभाळून नेतां नेतां नानांच्या नाकीं नऊ आले!

नानांनीं आपल्या आगमनानें मंडपास शोभा आणली.

योग्य वेळीं लग्न यथासांग पार पडलें.

नानांची रजा संपुष्टांत येतांच त्यांनीं सर्वांचा निरोप घेऊन आपला मुक्काम हलविला.

धोंड स्टेशनवर मुंबईची गाडी गांठण्यासाठीं नाना आपल्या लवाजम्यासह उतरले. नानांच्या हुकमाप्रमाणें हमालांनीं झटपट त्यांचें सामान फलाटावर उतरविलें व पुढील फलाटावर उभ्या असलेल्या मुंबईच्या गाडींत चढविण्यासाठीं बिछायतीला हात घातला.

"अरे, घ्योच घ्योच तो ट्रंक सखारामा, सायबास्नी बोलाव जलदी!"

नानांनीं त्या रेल्वे पोलीसाकडे मारक्या म्हशीच्या नजरेनें रोखून पाहिलें! जणुंकाय आपल्या आवडत्या ट्रंकेला त्या शिपायाची पापी दृष्टि लागेल अशीच त्यांना भीति वाटली!

"हमाल उठाव सामान!" नानांनीं गोंधळून उभा राहिलेल्या हमालास हुकूम सोडला.

"सबूर, सबूर! सायब येत्यात!" शिपाईदादा गुरगुरले.

"म्हणजे? तुझ्या साहेबाचा माझ्या सामनाशीं संबंध काय?"

नानांनीं आश्चर्यानें डोळे विस्फारून रागांत विचारलें.

"तें समजेल मागाहून! चोर तो चोर अन् शिरजोर" शिपाई पुटपुटला.

इतक्यांत खाकी पोषाखवाले मोठ्या पोटाचे पोलिस इन्स्पेक्टर हातानें गर्दी दूर करीत घाईघाईनें नानांच्या जवळ आले.

त्यांनीं एक वेळ त्या निळ्या ट्रंकाकडे व एक वेळ आपल्या हातांतील पिवळ्या कागदाकडे पाहून हुकमी आवाजांत नानांना विचारलें.

"मिस्टर, हें सर्व सामान अन् विशेषतः ही निळी ट्रंक आपलीच आहे काय?"

"अर्थात्" नाना तीक्ष्ण नजरेनें इन्सपेक्टरकडे पाहात उत्तरले.

"मग आम्हांला या ट्रंकेच्या चोरीबाबत आपल्याला अटक करावी लागत आहे."

आतां मात्र नाना मनांत चरकले, तथापि सारें धैर्य एकवटून ते म्हणाले, "मी गव्हर्नमेन्ट सर्व्हंट आहें! आणि आपण माझ्यावर चोरीचें बालंट घेत आहां ! मोठमोठ्या ऑफिसर लोकांचीं भत्ते बिलं मी पास करतों—!"

"बस्स ! बस्स !" पोलीस इन्सपेक्टर ओरडले. "त्याचा इथं कांहींच संबंध नाहीं ! अमुक माणसाची अमुक वर्णनाची दागिन्यांची ट्रंक चोरीला गेल्याची तार आमच्या हातीं असून, आपण मुद्देमालासह आमच्या समोर उभे आहांत ! वाचा हें नांव !"

असें म्हणून इन्सपेक्टर साहेबांनीं आपली चामड्याच्या पट्ट्याची वेताची छडी त्या ट्रंकेवरील नांवावर आपटली.

नानांनीं भेदरलेल्या नजरेनें ट्रंकेवरील नांव वाचलें.

'कृ. स. पाटणकर'

त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना ! सारें स्टेशन आपल्या भोवतीं गरगर फिरत आहे असा त्यांना भास झाला व ते मटकन् खालीं बसले !

नानांच्या पत्नीचें व नानांचें थोडा वेळ खलबत झालें.

आतां कोठें नानांच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला.

नगरहून निघतांना नानांनीं आपली आवडती ट्रंक आपल्यासमोर टांग्यांत ठेवून घेतल्यानंतर त्यांच्या सौभाग्यवतीनें त्यांच्या विसरभोळेपणाला नांवें ठेवीत गड्याकरवीं ती दुसरी त्याच रंगाची निळी ट्रंक टांग्यांत मागच्या बाजूला आणवून ठेविली. अगदीं हुबेहुब तशीच होती ती ट्रंक ! घोंडला येईपर्यंत या घोंटाळ्याची कुणालाच कल्पना नव्हती.

नानांनीं खरा प्रकार पोलिस इन्स्पेक्टरच्या कानावर घालण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रत्यक्ष दोन टूंका समोर असतां त्यांचें म्हणणें पटावें कसें?

अखेर नानांनीं नगरला तार करून आपल्या संकटाची जाणीव यजमानांना करून दिली.

तब्बल तीन तास पोलिसांच्या नजरकैदेंत काढल्यानंतर नानांचे यजमान टूंकेच्या मालकासह धोण्ड स्टेशनवर हजर झाले. त्यांस पाहतांच नानांनीं सुटकेचा श्वास सोडला.

रीतसर पंचनामा होऊन कृ. स. पाटणकरांच्या जबानीवर नानांना मुक्त करण्यांत आलें.

नानांच्या फजितीची गुप्त बातमी हळूहळू सर्वत्र फैलावली!

तेव्हांपासून नानांनीं निळ्या रंगाची विलक्षण दहशत घेतली.

आपला सर्जचा निळा कोट, मुलांच्या टोप्या, सौभाग्यवतीचें लुगडें वगैरे सान्या वस्तु त्यांनीं घरांतून हद्दपार केल्या!

फार काय, आकाश निरभ्र असतां निळा रंग दृष्टीस पडेल म्हणून ते वर पाहण्याचेंही धाडस करीत नाहींत म्हणे!!

---

विविधवृत्त; ३० मे १९३७.

# १२

# तुटलेला चित्रपट !

ऑफिसमधून येऊन खोलींत पाऊल टाकलें तोंच, "आज कांहीं विशेष दिसतंय्". असें म्हणून नीरेनें हातांतील काम बाजूला सारून माझ्याकडे गोड नेत्रकटाक्ष टाकला, आणि स्टोव्हचा कांकडा स्पिरीटमध्यें भिजविण्याचा ती प्रयत्न करूं लागली.

बोलपटांचें राज्य सुरू झाल्यापासून मूक चित्रपट दुर्मिळ झाले होते; त्यामुळें रंगभूमीवरील शांततेचें साम्राज्यहि जवळ जवळ खालसा झालें होतें. मुंबईच्या एका बाजूच्या सिनेमागृहांत एक मूक चित्रपट चालू असल्याचें माझ्या वाचण्यांत आलें, व नीरेसह तो चित्रपट पहावयास जावयाचें ठरवून मी ऑफिसमधून लवकर निसटलों.

मूक चित्रपट पहावयास मिळणार म्हणून नीरेलाहि आनंद झाला. कारण अलीकडे मूकचित्रपट केवळ आठवणींतच शिल्लक राहिले होते !

नीरेनें झटपट चहा तयार केला, व कप माझ्या हातांत देत ती नेहमींच्या विनयपूर्ण अभिनयानें म्हणाली,

"आज मी एक नवी वस्तु खरेदी केलीय्."

"पाहूं द्या की आम्हांला-कीं नाहींच दाखवायची !"

"इश्श ! असं कसं होईल ! पण प्रथम ओळखायची कीं, काय ती !"

"लहानपणीं आंधळ्या कोशिम्बिरीचा खेळ खेळलोंय्, पण मिटू माहीत असत !" मी थट्टेनें म्हटलें.

"खरं ना ? मग आपल्याला अडचण भासत असलेली वस्तु कोणती ?"

"जम्मा कशांत ?" मी पृच्छा केली.

"इश्श् ! हा उखाणा का आहे ? बरं भांड्यांत !" ती नमतें घेऊन उत्तरली.

"पातेलें !" मी विजयी मुद्रेनें उद्गारलों.

हात्तेच्या तीं तर दोन डझन पडलीं आहेत ! संसारांत छान लक्ष आहे हं" असें म्हणून तोंडाला पदर लावून नीरा मिस्किलपणें हंसूं लागली.

"संध्येची पळी" मी फिरून यत्न करून पाहिला.

"अन् ती कुणासाठीं ? थट्टा करावयाची असेल तर मी आपली जातेंच कशी ! ती गाल फुगवून लटक्या फणकाऱ्यानें म्हणाली.

"बरं हरलों !-तूंच सांग-नव्हे दाखव !"

नीरेनें पदराखालीं झांकून एक वस्तु आणून मजपुढें ठेविली. माझें हंसें अनावर झालें ! हंसूं आवरीत मी म्हटलें.

"तस्त ? एवढ्यांत मला म्हातारपणाचे डोहाळे—"

माझ्या तोंडावर हात ठेवीत ती म्हणाली,

"मध्यंतरी आजारीपणांत केवढी अडचण पडली होती, आठवण नाहीं का ?"

"अस्सं अस्सं ! आहे बुवा दूरदर्शीपणा !"

नीरेनें आठाच्या आंत स्वयंपाक आटोपला आणि आम्ही 'व्हिक्टोरिया' थिएटरकडे मूक चित्रपट पहावयासाठीं निघालों.

* * * *

चित्रपट इंग्लीश असला तरी कथानक सामाजिक असून गुंतागुंतीचें नसल्यामुळें नीरेला तें फारच आवडलें.

कथानकांतील इव्हान व फ्लोरा या तरुण दाम्पत्याचें संसारचित्र इतकें चटकदार वठलें होतें कीं, प्रत्येक क्षणाला कथानकाला नवा रंग भरत आहे असें वाटे.

नीरा कथानकाशीं अगदीं समरस होऊन गेली होती. इव्हान व फ्लोरा या आदर्श दांपत्याच्या प्रीतीचें प्रतीक दृश्य स्वरूपांत दिसूं लागण्याचा समय अगदीं समीप येऊन ठेपला होता. नीरा वाढत्या औत्सुक्यानें चित्रपटाकडे दृष्टि लावून बसली होती. कथानक ऐन रंगांत आलें—

इतक्यांत एकाएकीं चित्रपट तुटला ! लख्खन दिवे लागले; थिएटरांत एकच हलकल्लोळ उडाला !

त्या विलक्षण प्रकारानें नीरेला एकदम एवढा जबरदस्त धक्का बसला कीं, ती स्थळ व काळ विसरून चटकन् मला बिलगली !

"असं काय? आतां फिरून जोडतील ती तुटलेली फिल्म" मी तिला धीर देत म्हणालों.

नीरेचा चेहरा अगदीं कोमेजून गेला होता; ओंठ पांढरे फटफटींत पडले होते, आणि हात थरथर कांपत होते!

मीहि त्या प्रकारानें जरा भांबाऊनच गेलों!

"चलायचं घरीं आतां" ती एक एक शब्द उच्चारीत म्हणाली.

"कां? आतां तर खरा रंग चढत आहे!" मी तिची समजूत पटविण्याच्या हेतूनें म्हटलें.

"पुरे, नकोच तें" असें म्हणून माझ्या उत्तराची अपेक्षा न करतां नीरा उठली, व माझा हात धरून मला उठवूं लागली. पलीकडील 'स्टँड'वर उभी असलेली व्हिक्टोरिया बोलाविली व आम्ही घरीं परतलों. रस्त्यांत आम्हीहि मूक वृत्ति धारण केली होती.

आम्ही घरीं येऊन कपडे उतरविले.

"राग आला वाटतं?" पुन्हां तिचा नेहमींचा अजिजीचा प्रश्न बाहेर पडला!

मी तिच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलें. आतां ओंठ फिकटलेले नव्हते, चेहराहि आतां विशेष म्लान राहिला नव्हता. परंतु डोळ्यांतील पाणी मात्र विद्युत्प्रकाशांत चमचमत होतें!

"राग कां म्हणून?" मी तिला धीर देण्यासाठीं तिच्या पाठीवरून हात फिरवीत विचारलें.

"–पण असें भेदरून जायचं कारण काय ?" मी पुन्हा प्रश्न केला.

"इव्हान आणि फ्लोराप्रमाणें आपणहि आपल्यापुढें केवढीं मनो-राज्यें रचलीं आहेत ! पण तीं पूर्णत्वास पोहोंचण्यापूर्वीं आपल्या आयुष्याचा चित्रपट असाच मध्यावर तुटला तर–?"

असें म्हणून नीरा स्तब्ध झाली ! माझ्या भावना उचंबळून आल्या ! मी तिला एकदम हृदयाशीं कवटाळून धरून म्हटलें, "आजच असे अमङ्गल विचार कां सुचले बरं ?" परंतु माझ्या सान्त्वनपर उद्गारांचा उलट परिणाम होऊन तिनें थोपवून धरलेला अश्रुप्रवाह कोण्डी फोडून दुप्पट जोमानें वाहूं लागला !

त्या रात्रीं तिची समजूत करतांना मी मेटाकुटीला आलों !

× × × ×

वरील चमत्कारिक प्रसंगानंतर अवघ्या आठ दिवसानंतरची गोष्ट.

मी ऑफिसमधून येऊन चपला बाजूला सारतों तों नीरा न्हाणींत ओकाऱ्या देत असल्याचें ऐकूं आलें !

"कां ?" मी हंसून सहेतुक विनोदानें विचारलें.

माझ्या प्रश्नाचा गर्भित हेतु तिला पटकन् समजला; परंतु तिकडे दुर्लक्ष करून ती शांतपणें उत्तरली,

"ताप आलाय् !"

माझा विनोद पार मावळला. मी तिच्या अंगाला हात लावून पाहिलें. तुसतें रसरसलें होतें तें !

मी थर्मामिटर काढून तिला लावावयास दिलें.

एकशेंएक ! मी मनांत चरकलों; तरी तिला धीर देण्याच्या हेतूनें म्हटलें "असेल मलेरिया झालं !"

मी स्टोव्ह पेटवून चहा केला, व तिला देऊन स्वतः घेतला. मानवी मन मोठें शङ्काखोर आहे !

आठ दिवसांपूर्वींचा प्रसंग माझ्या दृष्टींपुढें तांडव करूं लागला 'Coming events cast their shadows before-hand' हें इंग्रजी सुभाषित मला आठवलें.

'आपल्या आयुष्याचा चित्रपट असाच मध्यावर तुटला तर–' ह्या नीरेच्या उद्गारांचें रेकार्ड कुणी माझ्या डोक्यांत लावून ठेवलें आहे, असा मला भास होऊं लागला.

नीरेला औषध सुरू झालें.

—पण गुणाचें प्रमाण व्यस्त पडत होतें !

डॉक्टरचें 'बिल' वाढत होतें आणि नीरेच्या शक्तीचा ऱ्हास तेवढ्याच जामांत होत होता.

रात्रींचा बारांचा सुमार होता.

झोंपेच्या अभावीं मी अंथरुणावर तळमळत होतों.

"झोंपायचं नाहीं का ?" तिनें क्षीण स्वरांत विचारलें.

"येईल झोंप आतां–तुला झोंप येऊं दे कीं मी झोंपतोंच."

"म्हटलं नसेल झोंप येत, तर इथं कॉटवर जरा बसावं."

मी झटकन् उठून तिच्याजवळ कॉटवर बसलों.

"दोन महिन्यांपूर्वीचा प्रसंग आठवतो का ?" तिनें विचारलें.

"कोणता तो ?" मी मुद्दाम अज्ञान दर्शविलें.

"मूक चित्रपटाचा" तिनें आठवण दिली.

"बरं मग त्याचं काय ?" मी म्हटलें.

"उगीच वेड पांघरूं नका ! आपल्या आयुष्याची ही फिल्म आतां तुटणार यांत संशय नाहीं."

तिचे डोळे डबडबले. श्वास जोरानें चालू झाला.

".बरं निज पाहूं आतां" मी तिच्या केसावरून हात फिरवीत म्हटलें.

"फ्लोरा आणि इव्हानचा चित्रपट ऐन वेळीं तुटला तसा आपला तुटणार ! त्यांचा मागाहून जोडला गेला असेल—कदाचित् आपलाहि जोडला जाईल—पण त्यांतून मी वगळली जाईन !"

अश्रु आवरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतांच माझीं उष्ण आसवें अचानक नीरेच्या गालावर ओघळलीं ! माझ्याकडे निरखून पहात नीरा म्हणाली,

"आपल्या डोळ्यांत पाणी कशाला ?—जा निजा, मी होईन बरी !"

आपल्या जीविताबद्दल साशंक असूनहि नीरेनें केवळ मला धीर देण्यासाठीं वरील शब्द उच्चारले !

डॉक्टरनें देऊन ठेवलेला झोंपेच्या औषघाचा डोस मी तिला दिला आणि हळूच उठून अंथरुणावर अंग टाकलें.

सर्व रात्रभर इव्हान वें फ्लोराच्या आदर्श संसाराचा चित्रपट मला स्वप्नसृष्टींत दिसत होता! केव्हां केव्हां फ्लोराच्या जागीं मला माझ्या नीराचाच भास होई!

× × × ×

आज एकाएकीं नीरेच्या प्रकृतींत अधिक बिघाड झाला.

मी ऑफिसला जाण्याचा बेत रहित केला.

नीरेच्या बन्धूला टेलिफोनद्वारें बोलावून घेतलें.

मी विषण्ण मनानें नीरेच्या कृश आकृतीकडे बघत बसलों होतों. तीन महिन्यांपूर्वीं खरेदी केलेलें तस्त आज तिच्या उपयोगी पडलें होतें.

माझी नजर सहज समोरच्या फळीकडे गेली. नीरेच्या कारकिर्दींत झकझकणारीं पितळेचीं भांडीं व्यवस्थेच्या अभावीं काळवण्डून गेलीं होतीं! मण्यांचें तोरण त्यावरील अर्धवट पूर्ण झालेलीं माझ्या नांवाचीं आद्याक्षरें नीरेच्या पिचलेल्या आकांक्षांची साक्ष देत होती! 'मिलन्स फूड' बेबीसाठीं तयार करावयास घेतलेलें झबलें कांहीं ना कांहीं अडचण येऊन अपूर्णावस्थेंत लोळत पडलें होतें!

मला पुनश्च व्हिक्टोरिया थिएटरमधील चित्रपटाची आठवण झाली. तोहि शुक्रवार आणि आजहि शुक्रवारच होता! फ्लोरा इव्हानची चित्रपट जोडल्यावर भेट झाली असेल!

—परंतु आमचा चित्रपट तुटल्यास...?

माझें मस्तक सुन्न झालें!

नीरा चित्रपटासंबंधीं कांहीं बोलण्याचा प्रयत्न करीत होती.

"भाऊ!" तिनें आपल्या बंधूला हांक मारली.

"आमचा तुटलेला चित्रपट—"

पुढील शब्द नीरेच्या तोण्डातच राहिले!

—आणि नीरेच्या भविष्याप्रमाणें आमच्या आयुष्याचा चित्रपट खरोखरच तुटला!!

व्हिक्टोरिया थिएटरांत माजलेला हलकल्लोळ पुनश्च झाला!

अश्रुभरित नेत्रांनीं मी नीरेच्या चेहऱ्याकडे पाहिलें.

व्हिक्टोरिया थिएटरमधून उठून जातांना पाहिलेला तोच फिक्कट, काळवंडलेला चेहरा व तेच पांढरे फटफटित ओंठ पुन्हां माझ्या दृष्टीस पडले!

मी एक दीर्घ श्वास सोडला आणि अश्रूंच्या तुफ़ानी लाटांस तोण्ड देण्यास सज्ज झालों!!

---

'वसंत' मार्च १९३५.

# १३

# आजींचें औषध !

कोटांतील 'वुइल्यम, वुइल्यम अँण्ड वेल्स' या प्रख्यात दलाली कंपनीचे मॅनेजर शामराव रणदिवे यांची चेंबर आज रिकामी दिसत होती.

बरोबर दहा वाजून पंचवीस मिनिटांनीं शामरावाची स्वारी आपल्या छोट्या बेबी ऑस्टिन मधून ऑफिसांत दाखल होई. या नियमित वेळांत कधींच फरक पडल्याचें कुणाच्या स्मरणांत नव्हतें.

आज अकरा वाजून वीस मिनिटें झालीं तरी शामरावचा पत्ता नाहीं, असें ऐकतांच सेक्रेटरी साहेब घाईघाईनें टेलिफोनजवळ आले व त्यांनीं शामरावच्या बिऱ्हाडीं फोन केला.

'शामराव घरून रोजच्याच वेळीं ऑफिसांत जाण्यासाठीं बाहेर पडले' हें उत्तर ऐकून तर सेक्रेटरी साहेब अधिकच विस्मयांत पडलेले दिसले.

शामराव येतांच आपणांस कळविण्याची पट्टेवाल्यास सूचना देऊन सेक्रेटरी आपल्या चेंबरमध्यें जाऊन बसले.

बरोबर साडे अकरा वाजतां शामरावांची छोटी बेबी ऑस्टिन ऑफिसच्या दरवाजासमोर येऊन उभी राहिली. पट्टेवाल्यांचे मुजरे मानेनेंच स्वीकारीत शामराव आपल्या चेंबरमध्यें येऊन बसले.

त्यांच्या मुद्रेकडे पाहतांच सर्वांची खात्री झाली कीं, त्यांच्या अंतः-करणांत कांहीं तरी विलक्षण खळबळ उडालेली असावी.

शामराव आल्याची वर्दी लागतांच सेक्रेटरी साहेब स्वतः होऊन शामरावच्या खोलींत आले व त्यांनीं चिंताक्रांत मुद्रेनें त्यांना विचारलें,

" काय शामराव, आपणाला आज उशीरसा ? कुठं अपघात वगैरे तर—नाहीं ना झाला ? "

सेक्रेटरी साहेबांचा प्रश्न ऐकतांच शामराव म्हणाले, " तसें कांहीं विशेष नाहीं. आमच्या छोट्या शिरीषला सकाळीं एकदोन उलट्या झाल्या, नि तेव्हांपासून त्याची तब्येत जरा नरम आहे. तेव्हां येतांना जरा डॉक्टरला पुन्हा भेटून जावें म्हणून तिकडे वळलों."

" एवढंच ना ? मग तशी काळजी करण्यासारखं काय आहे त्यांत ? "

सेक्रेटरी सहानुभूतिपूर्वक उद्गारले.

इतक्यांत एक पट्टेवाला खाडकन् दरवाजा उघडून आंत आला व घाईघाईनें शामरावाला म्हणाला, " साहेब, आपला टेलिफोन आलाय्." शामरावांनीं ताडकन् उडी मारून बाहेर पडतां पडतां म्हटलें, " माझा फोन ? कुठून आलाय् रे ? "

"घरून, साहेब." पट्टेवाल्यानें अदबीनें उत्तर दिलें.

शामरावांनीं पट्टेवाल्याचे ते शब्द ऐकले कीं नाहीं कुणास कळे. ते धांवतच टेलिफोनजवळ गेले व क्षणभर टेलिफोनमध्यें बोलून लगबगीनें आपल्या चेंबरमध्यें आले. सेक्रेटरी साहेब त्यांच्या चेंबरमध्येंच होते. त्यांस उद्देशून ते म्हणाले,

"घरून टेलिफोन आलाय्. शिरीष अधिकच आजारी झाला आहे म्हणतात. तेव्हां मी जातों."

सेक्रेटरींच्या उत्तराची अपेक्षा न करतां शामरावांनीं घाईघाईनें कोट घातला आणि टेबलावरील घंटी खणखणावली. शिपायास आपली गाडी घेऊन येण्यास सुचवून शामराव तडक बाहेर पडले.

गाडी येतांच तिच्यांत ताडकन् उडी मारून शामराव उद्गारले,

"चलो."

शामरावचें वय आज जरी तिशीच्या आंतबाहेर होतें, तरी त्यांचें लग्न होऊन पांच वर्षे लोटलीं होतीं.

कोटांतील 'वुइल्यम वुइल्यम ॲण्ड वेल्स' या दलाली पेढीचे मॅनेजिंग डायरेक्टर मिस्टर स्मिथ यांची व शामरावच्या वडिलांची विलायतेंत ओळख झाली. त्या वेळीं शामरावांचे वडील एका हिन्दी कंपनीचे प्रतिनिधि म्हणून विलायतेच्या दौऱ्यावर होते.

आपल्या पदवीधर मुलाला स्मिथसाहेबांनीं हातार्शी धरल्यास ते त्याचें कोटकल्याण केल्यावांचून राहणार नाहींत, असा गुणवन्तरावांना—शामरावांचे वडील—आत्मविश्वास होता. त्यांनीं स्मिथसाहेबांना गळ घातली

व त्याच वर्षी शामरावांची असिस्टंट मॅनेजर म्हणून वरील कंपनींत वर्णी लागली.

एका हिन्दी माणसाला आपण दिलेली ही जबाबदारीची जागा कुठवर झेपते याकडे स्मिथसाहेबांनीं बारीक नजर ठेवली होती; व शामरावची असामान्य हुषारी नजरेंत भरतांच त्यांनीं एका गोऱ्या माणसाची मुख्य मॅनेजरची जागा त्यांस देण्याचें मनांत योजून ठेवलें होतें.

शामरावच्या शिकंदर नशिबानें दुसऱ्या वर्षींच मुख्य मॅनेजरनीं आपली कलकत्त्यास बदली करून घेतली व शामरावच्या हातीं मुख्य मॅनेजरचे अधिकार आले.

शामरावचें वैभव पाहण्यास गुणवन्तराव फार दिवस जगले नाहींत. जन्मभर फिरतीची नोकरी केल्यानें त्यांचें दुबळें झालेलें शरीर आजाराच्या निमित्तानें जें एकदां धरणीला लागलें तें कायमचें !

आतां शामरावांवर वडीलकी गाजविणारें एकच माणूस होतें. तें म्हणजे त्यांची चुलत आजी.

शामरावच्या मिया बिबींच्या संसारांत या आजींची बरीच आबाळ होई. त्यांचें सोंवळें व देवधर्म सूनबाईना फारसे रुचत नसत. तथापि, शामरावनें आजीबाईच्या देवधर्मांत ढवळाढवळ करावयाची नाहीं, असा महाराणी व्हिक्टोरिया सारखा पत्नीला पोक्त सल्ला देऊन ठेवल्यानें आजीबाईना फारसा उपद्रव कुणी देत नसे.

शिरीषचें आगमन होऊन वर्ष सव्वा वर्ष लोटलें होतें. उशिरां झालेलें अपत्य; त्यांतून घरांत श्रीमंतीचा थाट. अशा वेळीं शिरीषची तब्येत

एखाद्या नाजुक फुलाप्रमाणें जपली जात होती यांत नवल तें काय? पडसें, खोकल्यासारख्या किरकोळ आजारांत सुद्धां शामरावच्या फॅमिली डॉक्टरांची पोळी पिके.

आज सकाळपासून शिरीषची कुरकुर चालू होती. एकदोन वेळां दूध पितांच तें ओकून पडलें. ताबडतोब डॉक्टरांना मोटर रवाना झाली. औषधयोजना झाली. औषध सुरू झालें.

आजीबाईनीं केशर तव्यावर परतवून तें मधांतून खलून देण्यास सूनबाईला सुचविलें होतें; परंतु तिकडे कुणीच लक्ष दिलें नाहीं. या तऱ्हेवाईक वर्तनाचा म्हातारीला आजच नव्यानें अनुभव आला होता असें नाहीं. तथापि, म्हातारीं माणसें जशीं प्रेमळ तशीं स्वभावानें जरा चिवटच असतात!

अखेर डॉक्टर आले. त्यांनीं ओकाऱ्या बन्द करण्याचें श्रेय घेतलें. सकाळ अशा रीतीनें निघून गेली.

दुपारीं बाराच्या सुमारास शिरीष एकाएकीं रडूं लागला. ताबडतोब शामरावना फोन करण्यांत आला. शामरावनें वाटेंत मोटार थांबवून डॉक्टरांना बरोबर घेतलें.

शामराव डॉक्टरांसह घरीं पोहोंचले त्या वेळीं घरांत एकच गडबड उडून गेली होती. शिरीष वेदनांनीं तडफडत होता. व त्याला गप्प करण्यासाठीं शामरावच्या पत्नीची धडपड चालू होती. इतर नोकर व शामरावच्या फ्लॅटमधील शेजारचें कुटुंब त्यांना धीर देण्याचें काम करीत होतें.

डॉक्टरांनीं आपल्या बॅग मधून एकदोन पेटण्ट औषधें बाहेर काढलीं व तीं सेमारच्या तिपाईवर ठेवून ते त्या छोट्या रोग्याची नाडी पाहूं लागले.

डॉक्टरांच्या चेहऱ्याकडे सर्वांची करुण दृष्टि लागली होती व डॉक्टर निर्विकार मुद्रेनें छाती, पोट, पाठ, या भागांवर नळी ठेवून रोग्याला तपाशीत होते.

डॉक्टरांना रोगाचा छडा लागला कीं नाहीं, कुणास ठाऊक! त्यांनीं शांतपणानें समोरच्या एका बाटलींतून औषधाचे दहा थेंब ग्लासांत टाकले व त्यांत तेवढेंच पाणी ओतून तें मिश्रण स्वतःच्या हातानेंच त्या तळमळणाऱ्या लहानग्या रोग्यास बळेंच पाजलें!

पांच मिनिटें गेलीं, दहा मिनिटें गेलीं; तथापि, त्या बालकाची तळमळ आणि टाहो बन्द होण्याचें चिन्ह दिसेना.

देवघरांतील पूजा आटोपून आजी नुकत्याच मधल्या दालनांत आल्या होत्या.

मुलाचा आकान्त ऐकून त्या पुढच्या खोलींत आल्या.

तेथील देखावा पाहून त्या स्तंभितच झाल्या. सकाळच्या आजारांत उतार पडल्यामुळें घरांत सर्व निश्चिंत होतीं; त्यामुळें आजीही आपल्या नैमित्तियकांत गढून गेल्या. शिरीष एकाएकीं एवढा आजारी झाला असतां परस्पर नवऱ्यास बोलावून घेणाऱ्या सूनबाईचा त्यांना मनांतल्या मनांत भयंकर सन्ताप आला! पण त्यांच्या हातीं कोणतीच सत्ता नव्हती! मग रागावण्याचा तरी त्यांना काय अधिकार?

चौकशी करतां नोकरांनीं हळूच खरी परिस्थिति आजीबाईना समजावून सांगितली.

कॉटजवळ जाऊन आजीबाईंनीं किलकिल्या नजरेनें बाळाकडे पाहिलें. रडून रडून त्याचे डोळे लाल झाले होते व तो सारखे हातपाय झटकीत होता. आजींचें मृदु अंतःकरण कळवळलें.

आजीबाईंनीं हळूच म्हटलं, "दाक्तर कान बीन तर नाहीं दुखत बाळाचा! जरा त्याच्या कानाला तरी नळी लावून पाहा."

त्या तशा स्थितींतही डॉक्टर किंचित् स्मित करून म्हणाले,

"नळी म्हणजे दुर्बिण समजतां कीं काय आजीबाई? पण मला कानांनीं दिसत नाहीं ना! नाहींतर आपली सूचना अवश्य अमलांत आणून पाहिली असती!"

सर्व मंडळी उपहासपूर्वक हसली. आजी खजील झाल्या. रागाची सूक्ष्म तिडीक त्यांच्या मस्तकांत गेली. मुकाट्यानें देवघरांत जाऊन मुळु मुळु रडावें, असेंच वाटलें त्यांना!

या वेळीं डॉक्टरांनीं इंजेक्शन तयार केलें होतें.

सुई दण्डांत जातांच बाळानें एक किंकाळी फोडली!

अभावितपणें आजी कॉटवर बसल्या व त्यांनीं चटकन् बाळाला पुढून मांडीवर घेतलं.

सूनबाईंनीं जरा कुऱ्यानें त्यांच्याकडे पाहिलें; पण आजींची अनुभवी दृष्टि बाळाचा रोग हुडकून काढण्याकडे लागली होती.

शामरावांना घेऊन डॉक्टर बाहेर गेले व म्हणाले, "छे बुवा, केस मोठी चमत्कारिक दिसते. कुणा तरी स्पेशालिस्टाला दाखवावें कीं काय?

मुलांच्या रोगांचे स्पेशालिस्ट डॉक्टर डिसोझा एम्. डी. यांना बोलावून घेतलें तर बरें ! पण शंभर रुपये चार्ज आहे त्यांचा-म्हणजे फी जरा जबरच आहे."

डॉक्टरांची टकळी अधिकच चालली असती; परंतु, शामराव तीव्र स्वरांत म्हणाले, "डॉक्टर, ही वेळ पैशाकडे पाहावयाची नाहीं, समजलांत ! फार काय आमच्या शिरीषसाठीं यावेळीं आम्ही आमचे प्राणही पणास लावण्यास डगमगणार नाहीं."

डॉक्टर ओशाळ्या मुद्रेनें निमुटपणें टेलिफोनजवळ गेले व तबकडी फिरवून त्यांनीं डॉ. डिसोझाला तांतडीनें निघून येण्यास विनंति केली.

इंजेक्शनचा रोग्यावर काय परिणाम झाला आहे तें अजमावण्यास शामरावसह डॉक्टर आंत आले.

या वेळीं आजीबाई बाळाचे हातपाय चांचपून पाहाण्यांत गुंतल्या होत्या.

"आतां विनाकारण त्याचे हाल कां करतां आजी ?"

शामरावच्या स्वरांतील निराशा व उद्वेग सर्वांनाच जाणवला !

शामरावच्या पत्नीनें तोंड फिरवून डोळ्यांतील आंसवें पदरानें टिपलीं ! डॉक्टरांनीं हातपाय गाळल्याची त्यांची खात्री झाली !

"हात् मेल्यांनो ! काय अक्कल आहे कीं नाहीं तुम्हांला ? कसलीं रे औषधें पाजतां नि कसल्या सुया टोंचतां ?"

आजीबाईंना तो एकंदर देखावा पाहून वेडाचा झटका आला असावा असा शामराव आदिकरून सर्वांना संशय आला.

आजींच्या मांडीवरून शिरीषला घेण्यासाठीं शामरावांनीं हात पुढें करतांच आजी क्रुद्ध स्वरांत म्हणाल्या, "थांब, थांब हा पाहा बाळाचा

रोग मी मुळासकट काढतें." असें म्हणून त्यांनीं बाळाच्या बगलेंतून चिमटीनें कांहीं तरी ओढून काढलें.

बाळानें पुन्हा एक किंकाळी फोडली.

सर्व मंडळी आश्चर्यानें व भयभीतपणें आजींकडे पाहूं लागलीं.

"हा पाहा रोग." आजी हंसत उद्गारल्या.

त्यांच्या सुरकुतलेल्या तळहातावर एक भला मोठा काळा डोंगळा मुंगा जबडा वासून गरगर फिरत होता.

आजींनीं बाळाचा हात वर केला. त्याचें रडें आणि तळमळ आतां पूर्ण बन्द झाली होती. परंतु, जंवळ्यांतून रक्तस्राव मात्र होत होता.

"माझ्या करंडींतून थोडा रामबाण कापूस आणा पाहूं, सूनबाई?"

आजींचा हुकुम आज मात्र सूनबाईनीं हसतच मान्य केला.

डॉक्टरांनीं आयडीनची काढलेली बाटली हळूच ठेवून दिली.

आजींनीं जखमेंत कापूस भरला व तेथील एक चिंधी टर्कन् फाडून शिरीषची जखम बांधून टाकली.

आजींच्या मांडीवरून चटकन् उठून शिरीषनें आईकडे झेंप टाकली व शामरावांच्या सौभाग्यवतीनींही त्यास तत्परतेनें घेऊन हृदयाशीं धरलें. त्यांच्या मुद्रेवर आतां पौर्णिमेचें चांदणें पसरलें होतें!

शरमिंध्या मुद्रेनें डॉक्टरांनीं आपल्या औषधांचा पसारा आवरून बॅगेंत भरला.

अगदीं याच वेळीं बंगलीच्या पोर्चमध्यें येऊन उभ्या राहिलेल्या डॉक्टर डिसोझांच्या मोटारीनें कर्णकठोर आवाजांत पुकारा केला—

'पों ऽ पो ऽ ! पो ऽ पों ऽ ऽ ऽ !'


---

विविधवृत्त २७ मार्च १९३८



9596

सर्वांच्या खात्रीचे व विश्वासू



# चष्म्यांचे व्यापारी

## आर्. एन्. शिंदे अॅण्ड सन्स

यांचेकडे

डोळ्यांचे हॉस्पिटलमध्यें काम करणारे तज्ञ डॉक्टरकडून डोळे मोफत तपासले जातात.

व

वेगवेगळया व नविन प्रकारचे उत्तम व टिकाऊ चष्मे फारच माफक दरानें मिळतात.

हेड ऑफीस:—२०७ गिरगांव रोड, मुंबई.

ब्रँच नं. १:—डोळ्यांचे हॉस्पिटलजवळ परळ, मुंबई.

ब्रँच नं. २:—रानडे रोड, दादर, मुंबई.

# पाण्यांत पैसे कां टाकतां ?

आजवर आपला पैसा खात्रीलायक दुधांत खर्च झाला अशी आपण हमी देऊं शकाल काय ? आपणास शुद्ध दुधाचा व्हावा तसा पुरवठा होत नसल्यामुळें आपला दुधाचा रतीब आपणास अपुरा वाटत नाहीं का ?

वरील सर्व प्रश्नांचें उत्तर एकच आहे व तें आपणांस ओळखण्याइतकें सुलभ आहे. म्हणूनच आपणास वरील प्रश्न टाकला आहे.

एका शेराची गरज पाऊण शेरांत भागविण्या इतकें



निर्भेळ अप्रतीम दूध आपणांस पुरविण्यास —

( स्थापना १९३१ )

## भारत डेरी फार्म (दादर) ही एकच संस्था

समर्थ आहे. एक वेळ अनुभव घेऊन कायमचे गिऱ्हाईक व्हा. आमचे स्वतःचे स्टेबल्स असल्यामुळेंच आम्हांस खात्रीपूर्वक दुध पुरविण्याची हमी घेतां येते.

स्टेबल्स् :— सांताक्रुझ, खोतवाडी बी. बी. ॲण्ड सी. आय्. रेल्वे.

भारत डेरी फार्म, जुनी मिरांडा चाळ, लेडी जमशेटजी रोड, दादर.

मालक:—डी. के. कर्णिक

# रस्त्यावरील एक संवाद !

**कुमुद** :— अगबाई ! हें दुकान इतक्या नजिक असून मला सांपडना लवकर. केव्हांची वणवण भटकतें आहे मी ?

**निर्मला** :—खरंच की काय ? एवढं प्रख्यात दुकान तुला माहीत नाहीं ? या माझ्या **फॅन्सी बांगड्या** आमच्या सिन्धुताईचं **गंगावन,** फार काय आमच्या घरांतील **भरजरी** व **भरतकामाचं साहित्य** याच दुकानांतून खरेदी केलंय् मी. कुणालाही एकाच ठिकाणीं **इमिटेशन** व **रोल्ड गोल्ड गॅरंटीड ज्युवेलरी, शिवण-वीण** व **भरतकामास लागणारें साहित्य, फोटो एन्लार्जमेन्टस्, नांवाच्या पाट्या** वगैरे सामान अगदी स्वस्त व खात्रीलायक असें घ्यावयाचें असेल तर तें एकच ठिकाण म्हणजे —

# धी हिन्दमाता आर्ट गॅलरी

**कुमुद** :— खरंच, आमचा भाईहि ड्रॉइंग पेंटींगचें सामान व शालोपयोगी स्टेशनरी घ्यावयास हेंच दुकान पसंत करतो.

**निर्मला** :—अग एवढंच काय, १९२८ सालीं हें दुकान स्थापन झालं तेव्हांपासून आम्ही यांचे गिऱ्हाइक आहोंत. आतां ही कुन्दा कोतवालची भरतकामाची बाहेरगांवची ऑर्डर त्यांच्याकडे नोंदविली कीं सर्व सामान बिनचूक रवाना होईल

**कुमुद** :— अन् हें भरतकाम पूर्ण झाल्यावर यांच्याकडेच फ्रेम करायला द्यावं झालं ! फारच कलापूर्ण काम असतं यांचं.

पत्ता :—**धी हिन्दमाता आर्ट गॅलरी,**

छबिलदास रोड, **दादर, मुंबई.**

# —तीन रुपयांत लग्न—

ही कदाचित् तुम्हांला थाप वाटेल तेव्हां हातच्या कंकणाला आरसा नको नी म्हणूनच तुम्ही केव्हांही पुण्यांत आलांत, तर लक्ष्मीरोडवरील गणपति चौकांत, तुम्हांला हेच बोल ऐकूं येतील कीं..............................

"नली कांहीं रूपानं 'सुरेख' नव्हती आणि म्हणूनच तिचं कांहीं कुठं जमेना; पण या गणपति चौकांतील **'श्रीसमर्थ सुवर्ण रत्न भांडार'** या दुकानांत ती सहज आली. तीन रुप-यांचा मोत्यांचा कुडीं जोड तिनं खरेदी केला. झालं! या कुड्यांनीं ती इतकी उठावदार नी 'सुरेख' दिसायला लागली कीं वधू परिक्षेंत ती पास झाली नी कित्येक रुपये खर्च करून तिचं लग्न जमलं नाहीं तें या अवघ्या तीन रुपयांत जमलं."

**या** दुकानांत सर्व तऱ्हेचे दागिने मिळतात **व** बाहेरगांवीं ऑर्डरनें माल पाठविला जातो.

M
A P

P
OO
NA

IRBK-0101518

IRBK-0101518

IRBK-0101518